CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित


**आजचा सामना**




रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु वि. चेन्नई सुपर किंग्ज
वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : एम. चिन्नास्वामी स्टेडियम, बंगळुरू

सोलापूर | शनिवार, ३ मे २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १७४ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



कार्यकर्ता समर्पित मानसिकतेतून तेव्हाच कार्य करू शकतो जेव्हा तो आपल्या पूर्ण कुटुंबाला या विशाल, व्यापक कार्याच्या प्रेरणेने प्रेरित करतो. कार्याची संपूर्ण माहिती, त्याचे महत्त्व आणि सात्विकता याचा पुरेसा परिचय झाल्यानंतर कुटुंबाच्या सर्व घटकांचे कार्यात पूर्ण सहकार्य प्राप्त होते. कार्याचे महत्त्व पटल्यामुळे संपूर्ण कुटुंब कार्याविषयी समरस होऊन जाते.

**- दत्तोपंत ठेंगडी**
संस्थापक, भा. म. संघ

# तोयबा-आयएसआयचे लागेबांधे उघड

**पहलगाम हल्ला प्रकरण**

**एनआयएच्या प्राथमिक अहवालात महत्त्वाची माहिती**



**◆ नवी दिल्ली, २ मे**

जम्मू आणि काश्मीर येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या घटनेचा तपास राष्ट्रीय तपास संस्थेकडून (एनआयए) केला जात आहे. दरम्यान एनआयएच्या पहलगाम दहशतवादी हल्ल्याबाबतच्या प्राथमिक अहवालात पाकिस्तानी गुप्तचर संस्था, इंटर-सर्व्हिसेस इंटेलिजन्स (आयएसआय) आणि दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबा (एलईटी) यांच्या संबंधांबद्दल माहिती देण्यात आली आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

एनआयए सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, २६ जणांचा जीव घेणाऱ्या दहशतवादी हल्ल्याचा कट हा लष्कर-ए-तोयबा अंतर्गत रचण्यात आला, ज्यासाठी कथित रीत्या आयएसआयच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी निर्देश दिले होते. तसेच हा कट लष्कर-ए-तोयबाच्या पाकिस्तानमधील मुख्यालयात रचण्यात आला असल्याचे मानले जाते.

या हल्ल्यात दोन दहशतवाद्यांचा प्रामुख्याने हात होता, हाश्मी मुसा ऊर्फ सुलेमान आणि अली भाई ऊर्फ तल्हा भाई हे दोघे पाकिस्तानी नागरिक असल्याचे उघड झाले आहे. तसेच ताब्यात घेतलेल्या ऑपरेटीव्हजच्या चौकशीत दोन्ही दहशतवादी हे पाकिस्तानातील हँडलर्सशी सतत संपर्कात होते, अशी माहिती समोर आली आहे. तसेच त्यांना हल्ल्याची वेळ, लॉजिस्टिक आणि अंमलबजावणी याबाबत सातत्याने सूचना दिल्या जात होत्या. (वृत्तसंस्था)

### हल्ल्याच्या ठिकाणाचे ३डी मॅपिंग

चौकशीत हल्ला झालेल्या ठिकाणाचे ३डी मॅपिंग देखील करण्यात आले आहे. याबरोबरच खोऱ्यातील जवळपासच्या मोबाईल टॉवरचा डम्प डेटादेखील मिळवण्यात आला आहे. हल्ल्याच्या काही दिवसापर्यंत या भागात सॅटेलाईट फोनच्या हालचाली वाढल्याचे दिसून आले आहे. याबरोबरच बैसरन आणि त्याच्या आसपास किमान तीन सॅटेलाईट फोन कार्यरत होते आणि त्यापैकी दोनचे सिग्नल ट्रेस करून त्यांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

### २८०० जणांची चौकशी

सुरक्षा यंत्रणा आणि एनआयएकडून आतापर्यंत एकूण २,८०० लोकांची चौकशी करण्यात आली आहे. २ मे पर्यंत १५० हून अधिक जण पुढील चौकशीसाठी कोठडीत आहेत. यामध्ये संशयित ओजीडब्ल्यू आणि बंदी घातलेल्या जमात-ए-इस्लामी यासारख्या संघटनांशी संबंधित असलेल्यांचा समावेश आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये छापेमारी करण्यात आली आहे, ज्यामध्ये कुपवाडा, पुलवामा, सोपोर, अनंतनाग आणि बारामुल्लाचा समावेश आहे. तसेच मुश्ताक अहमत झारगर ऊर्फ लाट्रम याच्या घरावर देखील छापा टाकण्यात आला.

# महामार्गावर हवाई दलाचे शक्तिप्रदर्शन

## सुखोई, जॅग्वार, मिराज, राफेलची गर्जना



### गंगा एक्सप्रेसवेवर थरारक सराव

**◆ शाहजहांपूर, २ मे**

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय सैन्य कधीही आक्रमण करू शकते, या भीतीने पाकिस्तानमध्ये घबराट पसरली आहे. भारतीय संरक्षण दलांकडूनही संभाव्य घडामोडी विचारात घेऊन, चोख तयारी केली जात आहे. अशातच शुक्रवारी भारतीय हवाई दलाच्या लढाऊ विमानांनी उत्तर प्रदेशमधील गंगा एक्स्पेस वेवर असलेल्या धावपट्टीवर जोरदार शक्तिप्रदर्शन केले. यावेळी मिराज, राफेल, सुखोई आणि जग्वार विमानांच्या गर्जनेने आसमंत दणाणून गेला होता.

सरावाचा भाग म्हणून गंगा एक्स्पेस वेवर मिराज, राफेलसह इतरही लढाऊ विमाने उतरविण्यात आली. हवाई दलाकडून गंगा एक्स्प्रेस वेवर असलेल्या ३.५ किमी लांबीच्या धावपट्टीवर लढाऊ विमाने उतरण्याचा आणि उड्डाण करण्याचा सराव सुरू आहे. हवाई दलाचे एएन-३२ विमान दुपारी १२:४१ वाजता शाहजहानपूरच्या जलालाबाद येथे बांधलेल्या हवाई पट्टीवर पोहोचले. विमान सुमारे पाच मिनिटे आकाशात घिरट्या मारत होते, त्यानंतर धावपट्टीवर उतरले. यानंतर हरक्यूलिस लढाऊ विमान धावपट्टीवर उतरले. राफेल, जग्वार आणि सुखोई यासारखी विमानांनी आकाशात कलाबाजी केली. आपातकालीन परिस्थितीत सरावाचा भाग म्हणून लढाऊ विमाने गंगा एक्स्प्रेस वेवर उतरली आणि त्यांनी पुन्हा हवेत उड्डाण भरले. विशेष असे की, गंगा एक्स्प्रेस वेवर रात्रीच्या वेळी लढाऊ विमानांच्या उतरण्याची ही पहिलीच वेळ आहे. या काळात कटरा-जलालाबाद महामार्ग काही काळ पूर्णपणे बंद होता. (वृत्तसंस्था)

### ५९४ किलोमीटर लांबीचा मार्ग

शाहजहांपूर जिल्ह्यातील गंगा एक्सप्रेसवे ४४ गावांमधून जातो. त्याची लांबी येथे सुमारे ४२ किमी आहे. जलालाबादमधील पिरू गावाजवळ ३.५ किमी लांबीचा हवाई पट्टी बांधण्यात आली आहे, जिथे हवाई दलाची लढाऊ विमाने फक्त रात्रीच उतरू शकतील. ५९४ किलोमीटर लांबीचा गंगा एक्सप्रेस वे मेरठ ते हापूर, बुलंदशहर, अमरोहा, संभल, बदाऊन, शाहजहांपूर, हरदोई, उन्नाव, रायबरेली, प्रतापगड आणि प्रयागराजपर्यंत बांधण्यात आला आहे.

### सरावात सहभागी लढाऊ विमाने

गंगा एक्सप्रेस वेवर बांधलेल्या हवाई पट्टीवर शुक्रवारी **राफेल, एसयू-३० एमकेआय, मिराज-२०००, मिग-२९, जग्वार, सी-१३०जे सुपर हरक्यूलिस, एएन ३२, एमआय-१७ व्ही ५ हेलिकॉप्टर** या लढाऊ विमानांनी सराव केला.

### चीन सीमेपासून २५० किमी अंतर

- गंगा एक्सप्रेस वेवर बांधलेली ही देशातील **पहिलीच हवाई पट्टी** आहे, जिथे लढाऊ विमाने दिवसा आणि रात्री दोन्ही वेळी उतरू शकतील.
- सुरक्षेच्या दृष्टिकोनातून, धावपट्टीच्या दोन्ही बाजूंना सुमारे **२५० सीसीटीव्ही कॅमेरे** बसवण्यात आले.
- विमानांच्या उड्डाणाची आणि उतरण्याची सोय असलेला हा उत्तर प्रदेशमधील **चौथा एक्स्प्रेस वे** आहे.
- सुरक्षेच्या दृष्टीने ही धावपट्टी खूप महत्त्वपूर्ण आहे कारण **चीन सीमेपासून २५० किमी अंतरावर** ही धावपट्टी आहे.

## महत्त्वाचे

### बाजारात चढ-उतार सुरूच



**मुंबई :** शुक्रवारी देशांतर्गत शेअर बाजारामध्ये तीव्र चढ-उतार दिसून आले. निर्देशांक एका क्षणी ८१ हजारांवर पोहोचला होता तर निफ्टीनेही २४,६०० ची पातळी गाठली होती. नंतर मात्र त्या घसरण झाली. निर्देशांक २५९ अंकांनी वाढून ८०,५०१ वर बंद झाला तर निफ्टी १२ अंकांनी वाढून २४,३४६ वर बंद झाला. दिवसभरातील कारभारात अदानी पोर्टस्ने सर्वाधिक नफा कमावला. चांगल्या तिमाही निकालामुळे अदानी समूहाचे शेअर्स पाच टक्क्यांहून अधिक वाढले. बजाज फायनान्स, इंडसइंड बँक आणि मारूती सुझुकी यांचे शेअर्सही वधारले होते. या चढ-उतारामध्ये बाजार भांडवलाचे ५९,००० कोटी रुपयांचे नुकसान झाले.

### झोमॅटोची १५ मिनिटांत डिलिव्हरी सेवा बंद

**नवी दिल्ली :** फूड डिलिव्हरी प्लॅटफॉर्म झोमॅटोने (इटरनल) त्यांची १५ मिनिटांची जलद डिलिव्हरी सेवा बंद केली आहे. हे फीचर फक्त चार महिन्यांपूर्वीच लाँच करण्यात आले होते. बंगळुरू, गुरुग्राम, हैदराबाद, मुंबईसारख्या महानगरांमध्ये मोठ्या जाहिरातींसह ती सुरू करण्यात आली होती. झोमॅटो क्विकने वापरकर्त्यांना २ किलोमीटरच्या परिघात १५ मिनिटांत तयार जेवणाचे पर्याय दिले होते. कंपनीचे सीईओ दीपिंदर गोयल यांनी अलिकडच्या मुलाखतीत सांगितले होते की, रेस्टॉरंट भागीदारांचा अभाव आणि उत्पादन-बाजारपेठेतील अपुरी तंदुरुस्ती (पीएमएफ) यामुळे जलद वितरण सेवेला आव्हानांचा सामना करावा लागत आहे. यापूर्वी २०२२ मध्ये, झोमॅटो इन्स्टंट नावाची १० मिनिटांची डिलिव्हरी सेवा देखील बंद करण्यात आली होती. त्याची जागा झोमॅटो एव्हरीडेने घेतली.

# परदेशात शिक्षणाचे स्वप्न 'एज्यू सिटी'द्वारे साकारणार

### वेव्हज् परिषदेत आठ हजार कोटींचे करार

**◆ मुंबई, २ मे**

विकसित भारताच्या उभारणीसाठी आखण्यात आलेल्या नवीन शैक्षणिक धोरणामुळे भारताचे दरवाजे जगासाठी खुले झाले आहेत. नवी मुंबईत आकाराला येत असलेल्या 'एज्यू सिटी' मध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची विद्यापीठे येतील आणि परदेशात शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वप्न आता येथेच पूर्ण होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. याशिवाय चित्रपट उद्योग क्षेत्रात झालेले करार चित्रपट निर्मिती क्षेत्राला अधिक उंचीवर नेतील, असेही त्यांनी सांगितले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत वेव्हज् २०२५ परिषदेमध्ये आज आठ हजार कोटी रुपयांचे विविध सामंजस्य करार करण्यात आले. 'एनएसई इंडायसेस लिमिटेड'ने आज मुंबईत आयोजित व्हेव्ज २०२५ या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व्हर्चुअल बेल वाजवून निफ्टी वेव्हज् इंडेक्सचा शुभारंभ केला. 'निफ्टी वेव्हज् इंडेक्स'च्या माध्यमातून या कंपन्यांमध्ये जगभरातील गुंतवणूक होईल. निफ्टी वेव्हज् इंडेक्स मध्ये मीडिया, मनोरंजन आणि गेमिंग क्षेत्रातील ४३ सूचीबद्ध कंपन्या समाविष्ट आहेत.

यावेळी सिडकोमार्फत युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क आणि युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया यांच्याबरोबर प्रत्येकी १५०० कोटी रुपयांचा करार करण्यात आला. तसेच राज्याच्या उद्योग विभागामार्फत प्राईम फोकस कंपनी सोबत ३००० कोटी रुपयांचा आणि गोदरेज सोबत २००० कोटी रुपयांचा सामंजस्य करार करण्यात आला.

मुख्यमंत्री म्हणाले, जगातील दोन सर्वोत्तम विद्यापीठांसोबत सामंजस्य करार होत आहे. नवी मुंबईत सुरू होत असलेल्या 'एज्यू सिटी' मध्ये जगभरातील सर्वोत्तम विद्यापीठे एकाच ठिकाणी येतील. नवीन शैक्षणिक धोरणामुळे भारताचे दरवाजे जगासाठी खुले झाले असून त्यामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या विद्यापीठांत शिकण्याचे येथील युवकांचे स्वप्न प्रत्यक्षात येणार आहे. (वृत्तसंस्था)


# सोलापूर @ ४४.७

## यंदाचे विक्रमी तापमान; चाकरमानी अन् बळीराजा बेहाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

तसंतर १५ एप्रिलपासून सोलापूर शहर-जिल्ह्यात उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना शुक्रवार, २ मे रोजी सोलापुरात यंदाच्या विक्रमी तापमानाची नोंद झाली आहे. शुक्रवारी तापमानाचा पारा ४४.७ अंश होता. गेल्या १५ दिवसांत उन्हाचा पारा ४२ अंशाच्या पुढेच आहे. आजही सूर्यनारायण चांगलेच कोपल्याने रात्रंदिवस नागरिक अक्षरशः घामाघूम होत आहेत. दरम्यान, या उन्हाचा बाजारपेठेवरही परिणाम दिसून आला. इतकेच नाहीतर चाकरमानी आणि शेतकरी, शेतमजुरांची मात्र कडक उन्हामुळे होरपळ होत आहे. पंखे, कुलर देखील क्षमतेने चालत नाहीत तर वीज कंपनीकडून मात्र वीजेचा लपंडाव सुरु असल्याने नागरिकांचाही पारा चढत आहे.





गुरूवारी १ मे रोजी ४४ च्या पुढेच तापमान गेल्याने काल दिवसभर उकाडा जाणवत होता. याचाच परिणाम आज सकाळपासूनच पुन्हा उन्हाचे चटके लागत होते. यामुळे अनेक नागरिकांनी सकाळी १० च्या आत आणि सायंकाळी ५ नंतरच घराबाहेर पडणे पसंद केले. यामुळे सोलापूरच्या बाजारपेठांत दुपारच्या सुमारास मोठी गर्दी दिसून आली नाही. रस्त्यावरही वाहनांची वर्दळ कमीच होती. एप्रिल महिना सुरू झाल्यापासून सोलापुरात पारा सातत्याने वाढत आहे. २३ एप्रिल रोजी तापमानाचा पारा ४३.८ अंशांवर पोहोचला होता. जो यंदाच्या हंगामातील उच्चांक होता. मात्र, बुधवारीही शहराचा तापमानाचा पारा ४३.६ अंशांवर स्थिरावला. यानंतर आज पुन्हा ४४.७ अंश इतक्या तापमानाची नोंद झाल्याने उन्हाच्या झळा तीव्र झाल्या आहेत.

कडक उन्हामुळे शहरातील रस्ते, मुख्य बाजारपेठ दुपारच्या सुमारास ओस पडली होती. यामुळे स्थानिक नागरिकांनीही सायंकाळीच घराबाहेर पडणे पसंद केले. शहरातील विविध एमआयडीसीत काम करणाऱ्यांचे आणि शेतात काम करणाऱ्या शेतकरी, शेतमजुरांचे मात्र या कडक उन्हामुळे बेहाल झाले.

या कडक उन्हामुळे जिल्ह्यातील उजनी प्रकल्प, मध्यम प्रकल्प आणि इतर काही साठवण तलावातील आणि विहिरींचे पाण्याचे मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन होवू लागले आहे. अनेक साठवण, पाझर तलावांनी कडक उन्हामुळे तळ गाठला आहे. यामुळे मे महिन्यात पाणीटंचाईच्या झळा अनेक गावांना लागण्याचे संकेत मिळत आहेत.

### रॉबर्ट वढेरांच्या विरोधात याचिका दाखल

**कानपूर :** पहलगाम हल्ल्यानंतर रॉबर्ट वढेरा म्हणाले होते की दहशतवाद्यांनी नागरिकांना ओळखले आणि त्यांना लक्ष्य केले कारण त्यांना वाटते की भारतात मुस्लिमांना दडपले जात आहे. या विधानावर कानपूरचे राम नारायण सिंह यांनी रॉबर्ट वढेरा यांच्याविरुद्ध खटला दाखल करण्यासाठी सीजेएम न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

# सोनिया-राहुल गांधींना कोर्टाची नोटीस

**नॅशनल हेरॉल्ड प्रकरण**

**◆ नवी दिल्ली, २ मे**

नॅशनल हेरॉल्ड प्रकरणात दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू कोर्टाने सोनिया आणि राहुल गांधींना नोटीस बजावली. या प्रकरणाची दुसरी सुनावणी न्यायालयात झाली.

या प्रकरणात न्यायालयाने सॅम पित्रोदा, सुमन दुबे, सुनील भंडारी, मेसर्स यंग इंडिया आणि मेसर्स डोटेक्स मर्चेंडाईज प्रायव्हेट लिमिटेड यांनाही नोटीस बजावली आहे.

विशेष न्यायाधीश विशाल गोगणे म्हणाले, कोणत्याही स्तरावर ऐकले जाण्याचा अधिकार हा निष्पक्ष खटल्याचा प्राण आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता ८ मे रोजी होईल. २५ एप्रिल रोजी न्यायालयाने सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांना नोटीस बजावण्यास नकार दिला होता. आरोपींची बाजू ऐकल्याशिवाय आम्ही नोटीस बजावू शकत नाही, असे न्यायालयाने म्हटले होते.

विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी २५ एप्रिल रोजी अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) याचिकेवर पहिली सुनावणी घेतली. ते म्हणाले, ईडीच्या आरोपपत्रात काही कागदपत्रेही गहाळ आहेत. ती कागदपत्रे जमा करा. त्यानंतर आम्ही नोटीस जारी करण्याचा निर्णय घेऊ. ९ एप्रिल रोजी, ईडीने नॅशनल हेरॉल्ड वृत्तपत्र आणि एजेएल यांच्याशी संबंधित मनी लॉँड्रिंग प्रकरणात आरोपपत्र दाखल केले होते. (वृत्तसंस्था)

# दिल्लीत अवकाळी पावसाचा धुमाकूळ

**नवी दिल्ली, २ मे**

शुक्रवारी सकाळी राजधानी दिल्लीत जोरदार वादळ आले, ज्यामुळे एक घर कोसळले, त्यात एका महिलेचा आणि तिच्या तीन मुलांचा मृत्यू झाला आणि २०० हून अधिक विमानांना विलंब झाला. पावसामुळे एकूणच शहराचा वेग मंदावला. दरम्यान, उत्तर प्रदेशात चार, छत्तीसगडमध्ये दोन जणांचा पावसामुळे मृत्यू झाला आहे.

मिंटो ब्रिज आणि आयटीओसह अनेक वर्दळीच्या रस्त्यांवर पाणी साचले होते, ज्यामुळे अनेक भागात वाहतूक कोंडी झाली होती. पहाटे ५ वाजण्याच्या सुरास सुरू झालेल्या मुसळधार पावसात शहरात अवघ्या तीन तासांत ७७ मिमी पाऊस पडला. अनेक भागातील झाडे उन्मळून पडली आणि लोक पाण्याखाली गेलेल्या रस्त्यांमध्ये अडकले असल्याचे दिसून आले.

सोशल मीडियावर समोर आलेले व्हिडीओ ज्यामध्ये अर्ध्या पाण्यात बुडालेली वाहने मिंटो रोडवरून चालताना दिसत आहेत. आरके पुरममधील प्रमुख सो नाथ मार्ग, मिंटो रोड आणि खानपूर पावसाचा विशेषतः परिणाम झाला. भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) रेड अलर्ट जारी केला आहे, लोकांना अत्यंत सतर्क राहण्याचे आणि आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.



शहरात पावसासोबत आलेल्या जोरदार वाऱ्यामुळे घरावर झाड कोसळल्याने तीन मुले आणि एका महिलेचा मृत्यू झाला. नजफगडमधील खरकरी नाहर गावात घर कोसळल्याची माहिती आम्हाला सकाळी ५.२५ वाजता मिळाली. आम्ही घटनास्थळी अनेक पथके तैनात केली आणि ढिगाऱ्यातून चार जणांना बाहेर काढण्यात आले, असे दिल्ली अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्याने सांगितले. त्यांना जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले जिथे त्यांना मृत घोषित करण्यात आले, असे ते म्हणाले. आयएमडीच्या आकडेवारीनुसार, गेल्या तीन तासांत, शहराच्या प्राथमिक वेधशाळेतील सफदरजंग हवामान केंद्रात ७७ मिमी पावसाची नोंद झाली. लोधी रोडवर ७८ मिमी, पालमवर ३० मिमी, नजफगडवर १९.५ मिमी आणि पितामपुरात ३२ मिमी पावसाची नोंद झाली.

# चपळगाव येथे ट्रक-कार अपघातात एक ठार तर चार जखमी

## अक्कलकोट तालुक्यातील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि २ मे-**

अक्कलकोटहून तुळजापूरला दर्शनासाठी जाताना भाविकांच्या वाहनास अक्कलकोट तालुक्यातील चपळगाव जवळ ट्रकने जोराची धडक दिल्याने झालेल्या अपघातात एक महिला ठार झाली असून ४ जण जखमी झाल्याची घटना शुक्रवारी घडली.

या घटनेची अधिक माहिती अशी की, दिनांक २ मे रोजी दुपारी दुपारी १.३० वा. चे सुमारास चपळगांव (ता. अक्कलकोट) येथील रॉयल हॉटेल जवळ मुख्य रस्त्यावरून जात असताना ट्रक (एम एच १३- सीयू ५१२८) याचा चालक



ऋषीकेश दत्तात्रय पुरी (रा. आरळी खुर्द ता.तुळजापूर) याच्या ताब्यातील सदरचा ट्रक हयगयीने अविचाराने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगात चालवून टाटा कंपनीची नेक्सॉन मॉडलची कारगाडी (एमएच ४२ बीई ८६८१) तसेच किया कंपनीची सोनेट कारगाडी (एमएच १२- डब्लूयु १२३०) या वाहनांना जोराची धडक दिल्याने त्यात कार (एम एच ४२बीई-८६८१) यामध्ये बसलेली फिर्यादी यांची बहीण चारूशीला अमोल रासकर ( वय- ३६ रा.मांजरी जि.पुणे ) यांच्या मरणास व गाडी (एमएच ४२ बीई ८६८१) आणि गाडी ( एमएच ४२ बीई ८६८१) या दोनही गाडीमधील अमोल विजय रासकर (वय -३६ वर्षे), प्रथमेश अमोल रासकर (वय-१० वर्षे), दोघे रा. मांजरी जि.पुणे तसेच चंद्रमा अभिजीत रासकर (वय ३४ वर्षे) रा. हांडेवाडी जि.पुणे, छाया विठ्ठल गुलदगड (वय ६५ वर्षे) रा.पळशी पो.लोणी भापकर ता.बारामती जि.पुणे हे भाविक जखमी झाले आहेत.

या घटनेची नोंद उत्तर पोलीस ठाण्यात झाली असून पुढील तपास पोहेकॉ शेख करत आहेत.

# महाराष्ट्र, गुजरात जागतिक पटलावर नाव चमकणारी राज्ये

**नवी दिल्ली, २ मे**

भारताला समृद्ध करणाऱ्या तसेच देशाचे नाव जागतिक पटलावर येण्यात अतिशय महत्त्वाची भूमिका निभावणाऱ्या महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांचा आज खास दिवस आहे. या दोन्ही राज्यांना त्यांच्या स्थापना दिवसाच्या शुभेच्छा देत हा प्रवास असाच सुरू राहील, असे प्रतिपादन प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी केले. दिल्लीचे उपराज्यपाल विनय कुमार सक्सेना यांच्या मार्गदर्शनात गुरुवारी सायंकाळी मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांचा राज्य दिवस डीडीए असिता ईस्ट पार्क, विकास मार्ग येथे साजरा करण्यात आला. त्यावेळी गृहमंत्री बोलत होते. ते म्हणाले, गुजरात व महाराष्ट्र यांनी, कोणताही वाद न घालता, एकाच राज्यातून निर्माण झालेली दोन स्वतंत्र राज्ये म्हणून परस्पर सन्मान राखत आणि आरोग्यदायी स्पर्धेच्या माध्यमातून देशाच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे. हे एक उत्कृष्ट उदाहरण ठरले आहे. पंतप्रधान मोदींनी "एक भारत, श्रेष्ठ भारत" या संकल्पनेद्वारे भाषिक व सांस्कृतिक विविधतेतून एकतेचा संदेश दिला असून आज विविध भाषा व संस्कृती एकमेकांना बळ देतात. महाराष्ट्र ही वीर छत्रपती शिवाजी महाराजांची भू़, त्यांनी आणि बाजीराव पेशव्यांसारख्या सेनानींनी मुघल सत्तेचा जबरदस्त प्रतिकार करीत स्वराज्य, स्वधर्म व स्वभाषेचे रक्षण केले.

## महत्त्वाचे...

### इंस्टाग्रामवरील व्हिडीओ काढत नसल्याच्या कारणावरून तरुणास मारहाण

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २ मे -

इंस्टाग्रामवरील व्हिडीओ काढत नसल्याच्या कारणावरून तरुणास मारहाण करणाऱ्या १० जणांविरुद्ध जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आकाश शशिकांत मोहिते (वय ३०, रा. रविवार पेठ, पाणी टाकीजवळ, सोलापूर) याच्या फिर्यादीवरून नागेश दिपक बनसोडे, करण दिपक बनसोडे, सागर हरी पोळ, किरण मधुकर पेठे, अमर ज्ञानेश्वर बनसोडे, सुनिल बनसोडे (रा. जुना बोरामणी नाका, सोलापूर) आणि इतर ४ ते ५ जण यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २८ एप्रिल रोजी सायंकाळी रविवार पेठ पाणी टाकीजवळ आकाश मोहिते हा घरासमोर थांबला होता. त्यावेळी बाबला बँजो पार्टीचे इंस्टाग्राम रिल्स काढून टाकण्यासाठी मोहिते याच्या मोबाईलवर बनसोडे याने फोन केला असता मोहिते याने व्हिडीओ काढत नाही असे सांगितले. त्यावेळी बनसोडे याने तु कोठे आहेस, मी यायलो असे म्हणून शिवीगाळ केली. त्यानंतर अर्ध्या तासाने मोहितेच्या घरासमोर रिक्षामधून येऊन बनसोडे व त्याच्या साथीदारांनी मोहिते यास लाकडी बांबूने मारहाण केली. तसेच विशाल मोहिते यास लोखंडी पाईपने डोक्यात व चेहऱ्यास मारहाण करून जखमी केले. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरिक्षक जाधव पुढील तपास करीत आहेत.

### दहा लाखांसाठी विवाहितेचा छळ करणाऱ्यांविरूद्ध गुन्हा दाखल

सोलापूर - झालेले कर्ज फेडण्यासाठी माहेरून १० लाख रुपये आणावेत म्हणून विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह पाचजणांविरुद्ध एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत कैफिया महंमद सलीम शेख (वय ३०, रा. एम फॅशन हॉल समोर, सिध्देश्वर नगर भाग २, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरून पती सलीम, सासू हवाबी (रा. शिवगंगा नगर, नई जिंदगी, सोलापूर), नणंद शहनाज जकातदार, नंदावा अजीज जकातदार, नणंद रशिदा तारकश (रा. नई जिंदगी, सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ जून २०१५ ते ३० जून २०२० या कालावधीत कैफिया या सासरी नांदण्यास होत्या. त्यावेळी पती सलीम व त्याच्या घरातील लोकांनी मिळून कैफियाचा शारीरिक व मानसिक छळ केला. बांधकाम व्यवसायात तोटा झाला आहे व कर्ज झाले आहे. ते कर्ज फेडण्यासाठी आई वडीलांचे घर विक, नाही तर माहेरून १० लाख रुपये आणून दे असे म्हणून कैफियाला उपाशी ठेऊन तिला त्रास दिला. सलीम याने ७ सप्टेंबर २०२० रोजी मोहमदीया अरबी मदरसा व मस्जिद जमात सिध्देश्वर नगर भाग ४ येथे सना शेख हिच्याशी कैफियाची परवानगी न घेता दुसरे लग्न केले. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार पवार पुढील तपास करीत आहेत.



### पोहताना मोटारीचा शॉक लागून तरुणाचा मृत्यू

सोलापूर - मोहोळ तालुक्यातील टाकळी सिकंदर येथे उजनी डावा कालवा येथे पोहताना पाण्यातील मोटारीचा करंट लागून तरुणाचा मृत्यू झाला. गौसपाक जावीद शेख ( वय २२, रा. कारंबा, ता. उत्तर सोलापूर) असे मृत तरुणाचे नाव आहे. ही घटना गुरुवारी दि.१ घडली. जखमी तरुणाला त्याच्या वडिलांनी पाण्यातून बाहेर काढून उपचारासाठी खासगी हॉस्पिटल येथे दाखल केले. पुढील उपचारासाठी त्याला सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच मयत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

### रस्ते अपघातात जखमीचा उपचारादरम्यान मृत्यू

सोलापूर - मंगळवेढा-पंढरपूर रोड जवळ रस्ते अपघातात जखमी इसमाचा उपचारादरम्यान शुक्रवारी दुपारी मृत्यू झाला. सागर चंद्रकांत महाडिक (वय ४०) असे मृताचे नाव आहे. त्यांच्यावर २७ एप्रिलपासून उपचार सुरु होते. शुक्रवारी त्यांचा उपचारादरम्यान अडीच वाजण्याच्या सुमारास मृत्यू झाला.

### बेशुद्ध अवस्थेत आढळलेल्या तरुणाचा मृत्यू

सोलापूर - सोलापूर मध्यवर्ती बस स्थानकातील मराठवाडा कंट्रोल रूम शेजारी फलट क्रमांक २२ येथे बेशुद्ध अवस्थेत आढळलेल्या अनोळखी ३५ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. त्याला बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच मयत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

### बेशुद्ध अवस्थेत आढळलेल्या इसमाचा मृत्यू

सोलापूर - नई जिंदगी येथे बेशुद्ध अवस्थेत आढळलेल्या इसमाचा मृत्यू झाला. वहिद पाशामिया शेख (वय ४८, रा. महालक्ष्मी नगर, मजरेवाडी (असे मृताचे नाव आहे. त्याला बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच मयत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

### गळफास घेत १६ वर्षीय बालकाची आत्महत्या

सोलापूर - एकता नगर येथे अज्ञात कारणावरून घरातील छताच्या लोखंडी अँगलला दोरीच्या साह्याने गळफास घेत १६ वर्षीय बालकाने आत्महत्या केली. शंकरलाल घनराम देवासी (वय १६, रा. देवासी काबास, अगुलाई गांव, जिल्हा जोधपुर, राज्य राजस्थान सध्या रा. एकता नगर) असे मृत बालकाचे नाव आहे. त्याला बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

### करंट लागल्याने महिलेचा मृत्यू

सोलापूर - भवानी पेठ येथील मराठा वस्ती येथे बाथरूममध्ये आंघोळ करताना करंट लागून महिलेचा मृत्यू झाला. रेणुका जगन्नाथ कनकी (वय ४२, रा. मराठा वस्ती, भवानी पेठ) असे मृत महिलेचे नाव आहे. त्यांना बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच मयत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

### बेशुद्ध अवस्थेत आढळलेल्या वृद्धाचा मृत्यू

सोलापूर - पारशी विहिर नई जिंदगी येथे बेशुद्ध अवस्थेत आढळलेल्या वृद्धाचा मृत्यू झाला. बाबुराव भीमराव साठे (वय ६४, रा. शिवगंगा नगर, मजरेवाडी) असे मृत वृद्धाचे नाव आहे. त्यांना बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

# सेंद्रिय कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करा

## ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे : ग्रामसेवकांनी अभियानात लक्ष द्यावे

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २ मे-

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा २ अंतर्गत ग्रामीण भागात घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. गावातील सेंद्रिय कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करा, असे आवाहन ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

जिल्हा नियोजन समिती सभागृहात एक मे रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून सोलापूर जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत मध्ये स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा २ अंतर्गत कंपोस्ट खड्डा भरू आपलं गाव स्वच्छ ठेवू या अभियानाचा शुभारंभ व लोगोचे अनावरण ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे हस्ते करणेत आले. या प्रसंगी जिल्हाधिकारी आमदार देवेंद्र कोठे, कुमार आशिर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, आयुक्त सचिन ओंबासे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता अमोल जाधव, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव उपस्थित होते.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे म्हणाले, गावा गावात स्वच्छतेच्या सोयी निर्माण करण्यात आले आहेत. त्याचा ग्रामस्थांनी नियमित वापर करावे. कायमस्वरूपी गाव स्वच्छ ठेवावे. गावातील कचरा कमी करणे. सेंद्रिय कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करावे. या साठी कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू हे अभियान आज १ मे पासून सुरु होत आहे. प्रत्येक गावात दि. १ मे ते ३० सप्टेंबर या कालावधीत अभियानाची यशस्वी अंमलबजावणी करण्यात यावी. या अभियानात सर्व लोकप्रतिनिधी, गटविकास अधिकारी, सरपंच, ग्राम सेवक व ग्रामस्थांनी सहभागी होऊन आपले गाव स्वच्छ ठेवावे, असे आवाहन गोरे यांनी केले आहे.



राज्यातील खासदार , आमदार व सरपंच यांना लेखी पत्र लिहुन कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू या अभियानात सहभागी व्हावे असे आवाहन राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी केले आहे. राज्यातील २७ हजार ग्रामपंचायतीचे सरपंच यांना पत्र लिहुन भावनिक साद घातली आहे. शाश्वत स्वच्छतेसाठी पुढे या. गावात ज्या स्वच्छतेच्या सुविधा निर्माण केले आहेत त्या वापरात आणा, असे आवाहन देखील मंत्री पाटील यांनी केले आहे.

### जिल्ह्यात अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद

सोलापूर जिल्ह्यात कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू या अभियानात सरपंच, ग्रामसेवक व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला. येत्या १५ मे पर्यंत कंपोस्ट खड्डे भरण्याची प्रक्रिया सुरू राहणार आहे. गटविकास अधिकारी, बीआरसी सीआरसी, जिल्हा कक्षातील कर्मचारी आज गावपातळीवर या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करताना दिसून येत आहेत.

### जिल्ह्यात ४७७१ नॅडेप कंपोस्ट खड्डे

सोलापूर जिल्ह्यात ४७७१ नॅडेप कंपोस्ट खड्डे आहेत. आज अभियानाची सुरुवात ग्रामविकास मंत्री यांचे हस्ते झाली आहे. तर गावात प्रत्यक्षात कामास सुरुवात करणेत आलेली आहे. गावातील सर्व ओला सेंद्रीय कचरा कंपोस्ट करणार आहोत. या साठी उमेद अभियानातील बचतगटांची नदत घेणेत येणार आहे. स्वच्छ भारत मधून तयार करण्यात आलेले ४७७१ नॅडेप भरून घेणेत येणार असल्याचे सिईओ कुलदीप जंगम यांनी सांगितले.

# अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने लावला गुन्ह्याचा छडा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २ मे-

अल्पवयीन बालिकेस संशयीत आरोपी अभिषेक दत्तात्रय जमादार (रा. जुनी मिल चाळ, मुरारजी पेठ, सोलापूर) याने अमिष दाखवून पळवून नेल्याचा गुन्हा दाखल होता. फौजदार चावडी पोलिसांनी शोध घेतला, मात्र ते पोलिसांच्या हाती न लागल्याने हा गुन्हा अधिक तपासासाठी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे वर्ग केला. तपासीक अधिकारी पोलीस निरिक्षक महादेव पाडुरंग राऊत व त्याचे पथकातील पोलीस अंमलदार यांनी आरोपी अभिषेक दत्तात्रय जमादार व अपहृत मुलीस ३० एप्रिल रोजी भिवंडी येथे ताब्यात घेतले.

फौजदार चावडी पोलीस ठाण्याकडे सन २०२३ चे कलम १३७ (२), १४३ प्रमाणे दिनांक. ०७ जुलै २०२४ रोजी दाखल गुन्ह्यात अपहृत बालिका व आरोपीचा तत्कालीन तपासीक अंमलदार यांनी शोध घेतला, मात्र उभयतांचा शोध न लागल्याने हा गुन्हा पुढील तपासाठी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष येथे ०६ फेब्रुवारी २०२५ रोजी वर्ग करण्यात आला होता. हा गुन्हा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे गुन्हा वर्ग होताच तपासीक अधिकारी पोलीस निरिक्षक महादेव पाडुरंग राऊत व त्याचे पथकातील पोलीस अंमलदार यांनी कौशल्यपुर्वक तपास करून व तांत्रिक माहिती प्राप्त करून घेऊन आरोपी अभिषेक दत्तात्रय जमादार व अपहृत मुलीस ३० एप्रिल रोजी रोजी ठाणे जिल्हा भिवंडीतील गणेश नगरातून ताब्यात घेऊन पुढील कार्यवाहीकरीता फौजदार चावडी पोलीस ठाण्यात हजर केले. ही कामगिरी अनैतिक म नवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पोलीस निरिक्षक महादेव राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडील हवालदार महादेव बंडगर, अ. सत्तार पटेल, महिला कर्मचारी सुजाता जाधव, उषा मळगे, दादा गोरे तसेच सायबर पोलीस ठाणे कडील प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड यांनी केली.

# शस्त्र घेऊन माजवली दहशत! बेळमकर एमपीडीए अन्वये स्थानबध्द

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २ मे -

एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील सागर ऊर्फ मनिष शैलेश बेळमकर (वय-२३ वर्षे, रा. ७९ कुमारस्वामी नगर, एम आयडीसी, सोलापूर) याच्या गुन्हेगारी कृत्यास प्रतिबंध करण्यासाठी पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांनी स्थानबध्दतेचे आदेश दिले. त्यानुसार पोलिसांचे एक पथक सागर यास घेऊन पुण्यातील येरवडा कारागृहाकडे रवाना झाले आहे.

सागर ऊर्फ मनिष बेळमकर हा मागील काही वर्षांपासून सातत्याने घातक शस्त्राने इच्छापूर्वक दुखापत करणे, खुनाचा प्रयत्न, विनयभंग, जबरी चोरी, खंडणी मागणे, गैरकायद्याची मंडळी जमविणे, धाकदपटशा करणे, दगडफेक करणे, घातक शस्त्रांनी धमकविणे अशा प्रकारे गंभीर स्वरुपाचे ५ दखलपात्र व १ अदखलपात्र असे गुन्हे दाखल आहेत.



बेळमकर यास २०२४ मध्ये प्रतिबंधक कारवाई केली होती. तरी त्याने गुन्हेगारी कृत्य चालू ठेवल्याने ही स्थानबध्दतेची कारवाई करण्यात आली. ही कारवाई पोलिस उपायुक्त डॉ. दिपाली काळे, विजय कबाडे, सहायक आयुक्त राजन माने, प्रताप पोमण, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे, प्रमोद वाघमारे, सहायक पोलिस निरीक्षक तुकाराम घाडगे, अंमलदार विनायक संगमवार, सुदीप शिंदे, अक्षय जाधव विशाल नवले यांनी केली.

# शासकीय निवासस्थानांचे वाटप; १४ लाखांचा अपहार

## पीडब्लूडीतील अभियांत्रिकी सहाय्यकावर गुन्हा

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २ मे -

बनावट कागदपत्रे तयार करून शासकीय निवासस्थानांचे बेकायदेशीरपणे वाटप करून अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून आलेल्या अनामत व घरभाड्याच्या १४ लाख २ हजार ६०८ रुपयांचा अपहार करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उत्तर उपविभागातील स्थापत्य अभियांत्रिकी सहायकाविरूद्ध सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत उपकार्यकारी अभियंता मयूर महेंद्र अरोडा (वय २९, रा. तेलंगीपुरा, ता. दिग्रस, जि. यवतमाळ, सध्या रा. प्लॉट नं. २८, निर्मल रेसिडेन्सी, एम आयडीसी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अजय सिद्राम वाघमारे (रा. सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अजय वाघमारे हा सार्वजनिक बांधकाम विभागात स्थापत्य अभियांत्रिकी सहायक म्हणून तर मयुर अरोडा हे उपकार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत आहेत. १ नोव्हेंबर २०२१ ते २० जानेवारी २०२५ या कालावधीत अजय वाघमारे याने पदाचा वापर करून शासनाची दिशाभूल करून कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, उपविभागीय अभियंता श्रीकांत गायकवाड, सहायक संशोधन अधिकारी सेवानिवृत्त अधिकारी राजशेखर जेऊरकर यांच्या पदनामाने कोणतीही मान्यता न घेता ९ शासकीय कार्यारंभ, जिल्हा प्रयोग शाळा, चाचणी अहवाल पैसे भरून घेतल्याचे चलन असे बनावट कागदपत्रे तयार करून त्यावर खोटी स्वाक्षरी व बनावट जावक क्रमांक, दिनांक नमूद असलेले आदेश खासगी ठेकेदार डोंगरेश संजय चाबुकस्वार (रा. ए १, सुमंगल सोसायटी, बालाजी मंगल कार्यालयाजवळ, जुळे सोलापूर) यांना दिले. तसेच शासकीय निवास वाटपाचे बनावट व खोटे कागदपत्रे तयार करून निवासस्थानाचे अधिकारी व कर्मचारी यांना बेकायदेशीर वाटप केले. या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून अनामत व घरभाड्या पोटी मिळालेले १४ लाख २ हजार ६०८ रुपये शासनास जमा न करता स्वतः वापरून त्याचा अपहार केला. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरिक्षक पाटील पुढील तपास करीत आहेत.

# पाण्याचा हौद स्वच्छ करताना २ कामगारांचा मृत्यू

## अक्कलकोट एमआयडीसी परिसरातील घटना

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २ मे -

अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील कारखान्यातील पाण्याचा हौद स्वच्छ करताना दोन सफाई कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी दुपारी पाच वाजण्याच्या सुमारास घडली. हा प्रकार पोमाणी अप्रेल्स कारखान्यात घडला.

या घटनेत सागर नारायण कांबळे (वय २३, रा. स्वागत नगर) व (सिद्धाराम यशवंत चलगेरी वय २९, रा. स्वागत नगर) या दोघांचा मृत्यू झाला आहे.

यातील मयत आणि इतर असे सर्वजण टाकी स्वच्छ करण्याचे काम करतात. त्यांची त्यांनी वेबसाईट तयार केलेली आहे. या वेबसाईटच्या माध्यमातूनच एमआयडीसी परिसरातील कारखानदाराने शुक्रवारी त्यांना त्यांच्या कारखान्यातील टाकी स्वच्छ करण्याकरिता बोलावले होते. यानंतर ते सफाई कर्मचारी एमआयडीसीतील त्या कारखान्यात आले. त्यांनी टाकी स्वच्छ करण्यापूर्वी टाकीतील पाण्यात ॲसिड टाकले त्यानंतर ते चौघे तेथील परिसरातील कॅन्टीन वर नाश्ता करण्यासाठी गेले नाश्ता करून आल्यानंतर यातील एक कर्मचारी टाकीमध्ये उतरला. दरम्यान टाकी धुण्यासाठी ॲसिड टाकल्यामुळे त्या टँकीमध्ये गॅस तयार झाला आणि तो गॅस त्या सफाई कर्मचाऱ्याच्या नाका तोंडात जाऊन तो बेशुद्ध होऊन खाली पडला. टाकीमध्ये उतरलेला कर्मचारी बराच वेळ वर न आल्याने दुसरा कर्मचारी टाकीत उतरला. तोही टाकीमध्ये तयार झालेल्या विषारी वायूमुळे अस्वस्थ झाला हा प्रकार तिसऱ्या कर्मचाऱ्यांच्या लक्षात आला त्याने टाकीतील दोघांना बाहेर काढण्याचा बराच प्रयत्न केला, परंतु त्यांनाही विषारी वायूमुळे अस्वस्थ वाटू लागले. दरम्यान टाकी स्वच्छ करण्यासाठी आत उतरलेल्या दोघांना बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच मयत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिस ठाण्यात झाली आहे. याप्रकरणी संबंधित दोषीवर गुन्हे दाखल झाल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका मृतांच्या नातेवाईकांनी घेतली. तर कारखान्याच्या मालकाच्या वाहनाचेही नातेवाईकांनी नुकसान केले.

# श्री बसवेश्वर सार्वजनिक वाचनालयात महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

सोलापूर, दि. २ मे -

जुळे सोलापूर भागातील वाचकांना घरपोच सेवा देणाऱ्या श्री बसवेश्वर सार्वजनिक वाचनालयात महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.सुरुवातीस संस्थेचे सचिव सदाशिव बेडगे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष ऋषिकेश बेडगे हे होते तर प्रमुख उपस्थिती संगमेश्वर महाविद्यालयाचे प्रा.श्रीपती गोटे यांची होती.यावेळी श्रीपती गोटे यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला यावेळी महात्मा बसवेश्वर यांनाअभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमास ऋषिकेश बेडगे,नागेश जोकार, सदाशिव बेडगे,सौ अनुराधा बेडगे कु. धनश्री बेडगे,अनुजा बेडगे चि.देवाश कोले आनंद कुलकर्णी आदी उपस्थित होते.शेवटी अनुजा बेडगे हिने सर्वांचे आभार मानले.



# ९ लाखांची रोकड चोरणाऱ्या मोलकरनीस अवघ्या तीन तासात अटक

## शहर गुन्हे शाखेची कामगिरी

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २ मे -

मालकाच्या घरातील कपाट बनावट चावीने उघडून ९ लाख रुपयांची घरफोडी केलेल्या करामती मोलकरणीस शहर गुन्हे शाखेचे पोलीसांनी अवघ्या ३ तासात ताब्यात घेऊन गुन्हा उघडकीस आणण्यात यश मिळविले. फराना फारुख शेख असं तिचं नांव आहे. तिच्या राहत्या घरातून ९ लाख रूपयांची रोकड तिच्या घरातून हस्तगत करण्यात आले आहे.



याबाबत स्टील व सिमेंट व्यवसायिक सिध्देश्वर पेठेतील रहिवासी रमिज सलिम साबुनगर (वय ३८ वर्षे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रमिज साबुनगर हे २४ एप्रिल रोजी राहत्या घरास कुलुप लावून लोणावळा येथे त्यांच्या नातेवाईकांकडे गेले होते. २६ एप्रिल रोजी त्यांना शेजाऱ्यांनी, त्यांच्या बंद घरातून, धुर येत असल्याची माहिती भ्रमणध्वनीद्वारे दिली. त्यानंतर, रमिजचे वडील सलिम साबुनगर यांनी घरी भेट देऊन पाहणी केली असता, घराचे मुख्य दरवाजाचे तसेच कम्पाऊंडचे कुलुप जैसे थे होते. लोखंडी अलमारीमध्ये ठेवलेले ९ लाख रुपये त्या ठिकाणी नसल्याचे त्या रात्री घरी परतलेल्या रमिज साबुनगर यांच्या निदर्शनास आले. अज्ञाताने बनावट चावीचा वापर करुन ती रोकड चोरल्याची त्यांची खात्री झाली. त्यांनी मंगळवारी, २९ एप्रिल रोजी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

या गुन्ह्याचा तपास करताना शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी घटनास्थळाचे आजु-बाजुचे सुमारे ०१ किमी परिसरातील सी.सी.टी.व्ही. फुटेजची पाहणी करून, त्याचे तांत्रिक विश्लेषण केले. त्यानंतर तपास पथकाने, रमिज साबुनगर यांच्या घरी काम करणारी मोलकरीण फराना फारुख शेख हिला ताब्यात घेतले. तिच्याकडे सखोल व कौशल्याने तपास करून तिने चोरलेली ९ लाख रूपयांची रोख रक्कम फॉरेस्टमधील लोणावत चाळीतील तिच्या राहत्या घरातून काढून दिल्याने, ती रक्कम जप्त करण्यात आले.

ही कामगिरी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपआयुक्त डॉ. दीपाली काळे, सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अल्फाज शेख, पोलीस अंमलदार बापू साठे, वसिम शेख, सुभाष मुंढे, सैपन सय्यद, महिला अंमलदार निलोफर तांबोळी, सुमित्रा बारबोले, ज्योती लंगोटे, अंमलदार सतिश काटे, सायबर शाखेकडील अंमलदार प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड यांनी केली.

### अशी केली चोरी...

फराना शेख त्या घरात मागील ७ ते ८ वर्षापासून घरकाम करण्याचे काम करीत होती. साबुनगर परिवार दुकानातील व्यवहाराचे पैसे हिशोब करुन, लोखंडी कपाटामध्ये ठेवताना तिने बरेच वेळा पाहिले होते. फराना शेख हिने त्या घरामध्ये काम करत असताना, त्यांच्या घरातील २ चाव्यापैकी एक चावी घरातील लोकांना माहिती न होता चोरी केली होती. त्या दिवशी सलिम साबुनगर दुपारी त्यांच्या दुकानी गेले असल्याचा फायदा घेऊन, मोलकरीण फराना हिने चावी बनवणाऱ्या इसमास फोनव्दारे बोलावून घेतले. तिच्याजवळ असणाऱ्या चोरी केलेल्या चावीच्या आधारे घराचे कुलुप उघडले. त्यानंतर, चावी बनवणाऱ्या इसमास ते, घर तिचे स्वतःचे असून, सामान शिफ्टींग करावयाचे आहे. घरातील एका कपाटाची चावी हरवली आहे, त्याची चावी करावयची आहे अशी थाप मारून त्याच्याकडून कपाटाचे लॉक तोडले. त्यावेळी कपाटाचे लॉक तुटले असून, त्यास नवीन लॉक बसवावे लागेल, असं चावीवाल्याने सांगितले. चावीवाल्यास लॉक आणावयास पाठवून, तिने कपाटातील ९ लाख रुपये रोख रक्कम चोरी केली. तसेच कपाटास अडकवलेल्या कागदपत्रांच्या पिशवीस आग लावून घराचे मुख्य दरवाजा व गेटला कुलुप लावून तेथुन निघून गेली. तिने त्या चावी वाल्याच्या दुकानी जाऊन त्याला २ हजार रुपये मजुरी दिल्याचेही तपासात निष्पन्न झाले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...



### बंगालमधील अत्याचाराबाबत बंगाली प्रकोष्ठच्या पदाधिकाऱ्यांचे राज्यपालांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई, दि.२ मे-**

बंगाली प्रकोष्ठच्या पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची राजभवनात भेट घेऊन बंगाल मध्ये हिंदुंवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी पश्चिम बंगालमध्ये राष्ट्रपती राजवट लावण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. माजी मंत्री विजय गिरकर यांनी शिष्टमंडळाचे नेतृत्व केले. याप्रसंगी प्रदेश कार्यकारणी सदस्य एस.एस.दास, बंगाली प्रकोष्ट चे संयोजक रंजन चौधरी, नाशिक बंगाली प्रकोष्ट चे जिल्हाध्यक्ष डॉ. घोष आदी उपस्थित होते.

### मोदींच्या अभिनंदनाचे ठराव भाजपा राज्यभर घेणार : चंद्रशेखर बावनकुळे

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.. १ मे :**

जातनिहाय जनगणना करण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेला निर्णय क्रांतिकारी व ऐतिहासिक असल्याने महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टीच्यावतीने पंतप्रधान मोदींच्या अभिनंदनाचा ठराव घेण्याची घोषणा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. बुथ,मंडल समित्या व ग्रामपंचायत स्तरावर हे ठराव करण्यात येणार आहेत. महाराष्ट्र दिनाला घोषणा करताना प्रदेशाध्यक्ष बावनकुळे म्हणाले की, या निर्णयाबद्दल महाराष्ट्र भाजपाने राज्यातील एक लाख १८६ बूथ आणि १,२८० मंडल समित्यांसह महाराष्ट्रातील २७ हजार ग्रामपंचायतींमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन ठराव करण्याचा निर्णय घेतला आहे. देशात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक उत्क्रांतीचे नवे पर्व जातनिहाय जनगणनेमुळे सुरू होईल. जातनिहाय जनगणना लोकशाही मजबूत करणारा महत्तम टप्पा असून, पंतप्रधान म ोदींच्या विकसित भारताच्याध्येयपूर्तीची पाऊलवाट अधिक पक्की होईल, ही खात्री आहे. असे सागून ते म्हणाले की, जातीनिहाय जनगणनेसाठी गळा काढणारे शरद पवार साहेब, उद्धव ठाकरे, नाना पटोले आणि विजय वडेट्टीवार आता गप्प का बसलेत? इतके दिवस जातीनिहाय जनगणना करा म्हणून घसा कोरडा करणारे नेते आता मोदी सरकारच्या निर्णयाबद्दल अभिनंदन करण्याचं औदार्य दाखवणार की नाक मुरडत घाणेरडं राजकारण करणार? असा सवाल ही त्यांनी उपस्थित केला.

### अपस्किलिंग, आयपी हक्क आणि शैक्षणिक गुंतवणूक : फडणवीस

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २ मे -**

अपस्किलिंगसाठी विविध इंडस्ट्रीने पाठबळ देणे अपेक्षित आहे. राज्य शासन टाटा स्किल डेव्हलपमेंट युनिव्हर्सिटी आणि कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून पूर्णपणे सहकार्य करत आहे. आयपी (बौद्धिक संपदा) विषयावर जनजागृती करणे देखील गरजेचे आहे. माध्यम व मनोरंजन क्षेत्रासाठी विशेष आर्थिक क्षेत्र तयार करण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल. शूटिंगसाठी एक खिडकी प्रणाली महाराष्ट्रात सुरु केली आहे यामुळे सर्व परवानग्या एका पोर्टलवरून मिळतात. शासकीय ठिकाणी शूटिंगसाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही, असेमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. ओटीटी प्लॅटफॉर्मवर अधिकाधिक मराठी कंटेंट जाण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. मराठी कंटेंट क्षेत्रातील सर्वांगीण विकासासाठी या क्षेत्रातील संबंधित व्यक्ती आणि कंपन्यांनी सहभाग द्या.

# महाराष्ट्र व गुजरात राज्याचा आत्मा एकच : राज्यपाल

### राजभवनात स्थापना दिवस साजरा

**तसा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.२ मे-**

महाराष्ट्र व गुजरात या दोन राज्यांचे देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात आणि जनतेमध्ये राष्ट्रभक्तीची भावना जागविण्यात अनन्यसाधारण योगदान आहे. भाषावार प्रांतरचनेनंतर महाराष्ट्र व गुजरात ही दोन राज्ये निर्माण झाली असली तरी उभय राज्यांचा आत्मा एकच आहे, असे प्रतिपादन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी येथे केले.

केंद्र सरकारच्या 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमांतर्गत महाराष्ट्र तसेच गुजरात या दोन राज्यांचा राज्य स्थापना दिवस राजभवन मुंबई येथे गुरुवारी साजरा झाला. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाचे आयोजन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या सहकार्याने करण्यात आले.



यावेळी राज्यपाल राधाकृष्णन म्हणाले की,' महाराष्ट्र व गुजरात या देशांनी भारताला अनेक महान राष्ट्रपुरुष दिले असून आज त्यांची ओळख त्यांच्या मूळ राज्यापुरती मर्यादित न राहता राष्ट्रव्यापी झाली आहे. महाराष्ट्र भूमीचे सुपुत्र छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण देशाकरिता आदर्श आहेत, तर गुजरातचे सुपुत्र महात्मा गांधी यांचे अहिंसेचे तत्वज्ञान आज संपूर्ण जगाकरिता मार्गदर्शक ठरले आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर नसते तर देशात लोकशाही टिकून राहिली नसती .आज ही दोन्ही राज्ये देशाच्या अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान देत आहेत ,असे सांगून महाराष्ट्र व तामिळनाडूच्या संबंधांचा ऐतिहासिक दाखला देताना राज्यपालांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी तामिळनाडू येथी जिंजी, वेल्लोर येथील किल्ले जिंकले होते तसेच तिरुवन्नामलै येथील शिव मंदिराची प्रतिष्ठापना करून धर्म रक्षणाचे कार्य केले होते, असे सांगितले. तंजावर येथील भोसले राजांनी आपल्या 'सरस्वती महाल' ग्रंथालयात दुर्मिळ असे तामिळ साहित्य जपून ठेवले. या सांस्कृतिक एकीमुळे आज भारत महान राष्ट्र झाले आहे.'विविध धर्म व पंथांचे पंथाचे लोक, विभिन्न भाषा बोलणारे लोक या देशात राहत असून देखील भारत एकसंध राष्ट्र कसे आहे असा अनेक जागतिक नेत्यांना प्रश्न पडतो. परंतु भिन्न भाषा, भिन्न पोशाख व भिन्न खाद्य संस्कृती असली तरी देखील या देशाला धर्म व संस्कृतीचे अधिष्ठान आहे, असे सांगून एकात्मतेचे हे अधिष्ठान जपले तर भारत विकसित राष्ट्र होईल ,असा विश्वास राज्यपालांनी यावेळी व्यक्त केला.

कार्यक्रमाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रकुलगुरु डॉ पराग केळकर, राज्यपालांचे उपसचिव एस राममूर्ती तसेच विद्यापीठाचे व्यवस्थापन समिती सदस्य, कला दिग्दर्शक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# पाकिस्तानचा इतिहास दहशतवादाचाच

### बिलावल भुट्टोंची कबुली

**इस्लामाबाद, २ मे -**

पाकिस्तानचे माजी परराष्ट्र मंत्री आणि पीपल्स पार्टीचे नेते बिलावल भुट्टो यांनी दहशतवादाला पोसल्याची स्पष्ट कबुली दिली आहे. एका वृत्तवाहिनीशी बोलताना बिलावल यांनी कबूल केले की पाश्चात्त्य देशांच्या सहकार्याने पाकिस्तानने दहशतवादी संघटनांना प्रोत्साहन दिले आहे. बिलावल म्हणाले, हा पाकिस्तानचा इतिहास आहे आणि तो कोणापासूनही लपलेला नाही. यामुळे पाकिस्तानचेही नुकसान झाले आहे आणि आम्ही या समस्येला तोंड देण्यासाठी अंतर्गत सुधारणा केल्याचा दावाही त्यांनी केला. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांच्या विधानानंतर बिलावल यांचे हे विधान आले आहे. बिलावल यांच्या आधी आसिफ यांनीही दहशतवादाला प्रोत्साहन दिल्याची कबुली दिली आहे. पाकिस्तानच्या संरक्षणमंत्र्यांनी गेल्या आठवड्यात एका निवेदनात म्हटले होते की, त्यांचा देश



गेल्या ३० वर्षांपासून दहशतवाद्यांना पाठिंबा आणि प्रशिक्षण देत आहे. ते म्हणाले की ते अमेरिका आणि पाश्चात्त्य देशांसाठी हे घाणेरडे काम करत आहेत.

ख्वाजा आसिफ यांनी ब्रिटिश वृत्तपत्र 'द स्काय'ला दिलेल्या मुलाखतीत हे सांगितले होते. ब्रिटिश अँकर याल्दा हकीम यांनी त्यांना विचारले होते की दहशतवादी गटांच्या कारवायांसाठी पाकिस्तान जबाबदार आहे का? यावर त्यांनी म्हटले होते की, जगातील मोठ्या शक्तींनी पाकिस्तानचा वापर स्वतःच्या फायद्यासाठी केला आहे.

## नवनिर्मात्यांना नवनवीन संधी उपलब्ध : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २ मे -**

महाराष्ट्रात व्हिडिओ गेमिंग क्षेत्र विस्तारत असून या क्षेत्रात नवीन कंपन्या गुंतवणूक करत आहेत. या नवीन कंपन्यांमुळे मनोरंजन क्षेत्रातील नवनिर्मात्यांना संधी उपलब्ध होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.जिओ वर्ल्ड सेंटर येथे जागतिक दृकश्राव्य म नोरंजन परिषदेमध्ये भारतीय उद्योग परिसंघ च्या सहकार्याने क्रिअटर आणि प्लॅटफॉर्मस उद्योगातील प्रमुखांशी ते गोलमेज बैठकीत बोलत होते.म हाराष्ट्रात निर्मात्यांना प्रेरक आणि पूरक वातावरण आहे. त्यासोबतच त्यांना चित्रीकरण करप्रणाली सवलती देण्याबाबत केंद्र सरकारशी चर्चा करून सकारात्मक भूमिका घेण्यात येईल, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारतीय पारंपरिक खेळांचे आधुनिक रूपांतर करून त्यांचे आयपी (बौद्धिक संपदा) तयार करणे, आणि त्या आयपीचं संपूर्ण भारतात व जागतिक स्तरावर व्यावसायीकरण करणे ही कल्पना उत्कृष्ट आहे.

# सातबाऱ्यावरील कालबाह्य, निरुपयोगी नोंदी हटवा

### शासनाचे आदेश, ७/१२ मोहिमे'चा दुसरा टप्पा सुरू

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२ मे-**

शेतकऱ्यांना कोणत्याही स्वरूपातील अडचणींना सामोरे जावे लागू नये, यासाठी राज्यातील जमिनींच्या सातबारा उताऱ्यावरील कालबाह्य व निरुपयोगी नोंदी हटवून, त्याऐवजी वास्तवातील नोंदी दाखल करण्यासाठी 'जिवंत ७/१२ मोहीम - टप्पा २' सुरू करण्यात आली आहे.याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला.

या मोहिमेमार्फत अपाक शेरा, तगाई कर्ज, बंडींग बोजे, नजर गहाण, सावकारी कर्ज, भूसंपादन निवाडा, बिनशेती आदेश, पोटखराब क्षेत्र, महिला वारस नोंदी यासारख्या कालबाह्य नोंदी हटवून ७/१२ उतारे अद्ययावत करण्यात येणार आहेत. वारसांची नोंद, जमिनीचे स्वामित्व, भोगवट्याचे प्रकार, आणि स्मशानभूमीसारख्या सार्वजनिक जागांची नोंद अधिकार अभिलेखात समाविष्ट केली जाणार आहे. कालबाह्य नोंदींमुळे शेतकऱ्यांना कर्जप्रकरणे, जमिनीच्या खरेदीविक्री व्यवहारात तसेच शासकीय योजनांच्या लाभात अडचणी येत होत्या. त्यामुळे ही मोहीम



> हा निर्णय देखील शेतकऱ्यांना रोजच्या जीवनपद्धतीत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी घेण्यात आलेला आहे. त्यामुळे अनेक वर्ष रखडलेली प्रकरणे निकालात निघतील
> **- चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री**

शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरणार असून, तलाठ्यांना संबंधित फेरफार नोंदी घेऊन जुने बोजे व शेरे कमी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तालुका आणि मंडळ स्तरावर कॅम्प घेऊन ही कार्यवाही करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी आणि उपविभागीय अधिकारी यांच्यावर देखरेख व अहवाल सादरीकरणाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

# दहशतवादाविरोधात भारताला सहकार्य करा

### अमेरिकेच्या उपराष्ट्राध्यक्षांनी पाकिस्तानला सुनावले

**न्यूयॉर्क, २ मे-**

पहलगाम येथील अतिरेकी हल्ल्याला प्रत्युत्तर देताना भारताने व्यापक प्रादेशिक संघर्ष उद्‌भवणार नाही याची काळजी घ्यावी. पाकिस्तानने त्यांच्या भूमीवर सक्रिय असलेल्या दहशतवाद्यांचा बिमोड करण्यासाठी आक्रमक पावले उचलावी आणि त्यांनी दहशतवाद विरोधात भारताला सहकार्य करावे असे अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे.डी. व्हान्स एका मुलाखतीत म्हणाले.

भारत, पाकिस्तान तणावावर टिप्पणी करताना व्हान्स म्हणाले, पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्या दहशतवाद्यांना शोधण्यासाठी पाकिस्तान भारताला सहकार्य करेल अशी आम्ही अपेक्षा करतो. दोन्ही देश आमचे मित्र असून



तेथील नेत्यांच्या आम्ही संपर्कात आहोत. दोन्ही देश अण्वस्त्रधारी आहेत, त्यामुळे कोणत्याही क्षणी तणाव वाढू शकतो. आम्हाला अपेक्षा आहे की, पाकिस्तान त्यांच्या जबाबदारीनुसार त्यांच्या हद्दीत कार्यरत असलेल्या दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी आणि त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी भारताला सहकार्य करेल.

या कठीण काळात अमेरिका भारतासोबत आहे. हल्ल्यात दहशतवादी संघटनांच्या सहभागाची चौकशी व्हायला हवी आणि त्यासाठी पाकिस्तानने भारताला सहकार्य करावे. (वृत्तसंस्था)

#### तणाव कमी करण्यासाठी प्रयत्न : टॅमी ब्रूस

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान सरकारांशी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सतत संपर्कात आहेत, असे अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाच्या प्रवक्त्या टॅमी ब्रूस यांनी म्हटले. त्या पुढे म्हणाल्या, परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी गुरुवारी परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि पाकिस्तानचे पंतप्रधान शेहबाज शरीफ यांच्याशी चर्चा केली. तणाव कमी करण्याचे आम्ही दोन्ही देशांना आवाहन केले, असे त्या म्हणाल्या.

#### अमेरिकेचा भारताला पाठिंबा

मार्को रुबियो अमेरिकेचे परराष्ट्र व्यवहार मंत्री मार्को रुबियो यांनी भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांच्याशी फोनवर चर्चा केली आणि पहलगाम दहशतवादी हल्याबद्दल शोक व्यक्त केला. रुबियो यांनी म्हटले की, अमेरिका दहशतवादाविरोधात भारताच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आमचा पूर्ण पाठिंबा आहे. दोन्ही देशांनी दक्षिण आशियामध्ये दीर्घकाळ शांतता आणि प्रादेशिक स्थैर्य राखण्यासाठी जबाबदारीने तोडगा काढावा

# अयोध्येच्या १४ किमी परिसरात दारू आणि मांसावर बंदी

**अयोध्या, २ मे**

अयोध्येतील रामपथच्या १४ किलोमीटरच्या भागात दारू आणि मांस विक्रीवर बंदी घालण्यात येणार आहे. याशिवाय पान, गुटखा, बीडी, सिगारेट आणि अंतर्वस्त्र यांच्या जाहिरातींवरही बंदी असेल. शहराची धार्मिक भावना जपण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. अयोध्या आणि फैजाबाद शहरांना जोडणारा रामपथ हा एक महत्त्वाचा मार्ग आहे. अयोध्या म हानगरपालिकेने १४ किलोमीटरच्या परिसरात दारू आणि मांस विक्रीवर बंदी घालण्याचा प्रस्ताव मंजूर केला आहे. अयोध्येतील शरयू नदीच्या काठापासून सुरू होणारा पाच किलोमीटर लांबीचा रामपथ फैजाबाद शहरात येतो. सध्या या भागात मांस आणि दारू विकणारी अनेक दुकाने आहेत. या भागात दारू आणि मांस विक्रीवरील बंदी आणि पान, गुटखा, बिडी, सिगारेट आणि अंतर्वस्त्र यांच्या जाहिरातींवर बंदी घालण्याच्या अंमलबजावणीची तपशीलवार आणि वेळरेषा म हानगरपालिकेकडून लवकरच जाहीर केली जाण्याची अपेक्षा आहे. नव्याने मंजूर झालेल्या प्रस्तावात, फैजाबाद शहरातील काही भागांसह संपूर्ण राम पथावर ही बंदी लागू केली जाईल. याबाबत, अयोध्येचे महापौर गिरीश पती त्रिपाठी यांनी गुरुवारी हा निर्णय जाहीर केला. अयोध्या महानगरपालिकेच्या कार्यकारी समितीने शहराची खरी धार्मिक भावना राखण्यासाठी ही बंदी घालण्याचा ठराव मंजूर केला आहे, असे महापौरांनी म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# नेते मंडळींना लागले सभापतीपदाचे वेध

### मुख्यमंत्र्यांच्या कोर्टात चेंडू

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि. २ मे-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची पंचवार्षिक निवडणूक प्रक्रिया संपन्न झाल्यानंतर आता नेतेमंडळींना सभापती व उपसभापती निवडीचे वेध लागले आहे. सभापती आणि उपसभापतीच्या रेसमध्ये येण्यासाठी नेते मंडळी आपल्या गॉड फादरकडे सेटिंग लावत असल्याचे सांगण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने बाजार समितीचे नवनियुक्त संचालक मंडळ लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी मुंबई दौऱ्यावर जात असून मुख्यमंत्र्यांच्या दरबारातच बाजार समितीचे सभापती व उपसभापतींचे नाव निश्चित होणार असल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत अक्कलकोटचे भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वात माजी आमदार दिलीप माने तसेच राजशेखर शिवदारे, सुरेश हसापुरे यांच्या पॅनलने १८ पैकी १५ जागा जिंकून बाजार समितीवर वर्चस्व प्राप्त केले आहे. या निवडणुकीत भाजप आमदार सुभाष देशमुख यांच्या नेतृत्वातील पॅनलमधून ग्रामपंचायत मतदारसंघात केवळ तीन उमेदवार निवडून आले आहेत. पक्षीय राजकारण बाजूला ठेवून कल्याणशेट्टी यांनी काँग्रेस नेतेमंडळींच्या सहकार्याने ही निवडणूक जिंकल्याने भाजपमधील त्यांचे वर्चस्व आणखी वाढले आहे. मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक लढवून विजय प्राप्त केल्याचे कल्याणशेट्टी यांच्या पॅनलमधील सर्वच नूतन संचालकांनी जाहीरपणे सांगितले आहे. आता सभापतीसाठी दिलीप माने, सुरेश हसापुरे आणि राजशेखर शिवदारे यांची नावे चर्चेत असली, तरी मुख्यमंत्र्यांच्या दरबारात कोणाचे नाव निश्चित होणार, याकडे सर्व नेते मंडळींचे लक्ष लागले आहे. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागणार असून त्याअगोदर भाजप सोलापूर जिल्ह्यातील राजकीय ताकद आणखी वाढवण्याचा प्रयत्न करणार आहे. संचालक मंडळाच्या निवडणुकीत विजयी झालेल्या काँग्रेसमधील राजकीय ताकदीच्या नेत्यांचा भाजपमध्ये प्रवेश घडवून त्यांना सभापती व उपसभापतिपदाची संधी दिली जाणार असल्याची चर्चा बाजार समितीच्या राजकीय वर्तुळात सुरु आहे.

#### माने आणि हसापुरे यांच्यात रस्सीखेच

या निवडणुकीमध्ये सत्ताधारी पॅनलने राज्यातील सत्ताधारी पॅनलला शह देत, पुन्हा बाजार समितीवर आपले वर्चस्व अबाधित ठेवले आहे. परंतु आता विजयी पॅनलमध्येच सभापती व उपसभापती पदासाठी जोरदार रस्सीखेच सुरू झाली आहे. यापूर्वी बाजार समितीचे सभापती हे पद दिलीप माने, राजशेखर शिवदारे यांनी तर उपसभापती म्हणून सुरेश हसापुरे यांनी कामकाज केले आहे. मागील निवडणूक जिंकल्यानंतर माने यांच्या गळ्यात सभापती तर उपसभापती म्हणून श्रीशैल नरोळे यांच्या गळ्यात माळ पडली होती. परंतु काही दिवसांत माने यांच्या जागेवर भाजप आ.विजय देशमुख यांना विराजमान केले होते.



#### सभापती निवडीसाठी ११ मे ला सभा

ही निवडणुक पार पडल्यानंतर सभापती व उपसभापती निवडीसाठी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी ११ मे रोजी सकाळी ११ वाजता बाजार समितीच्या लोकनेते बाबुराव चन्नप्पा चाकोते प्रशासकीय भवन या मुख्य कार्यालयात सभा आयोजित केली आहे. सभेपुढील विषयानुसार निवडीचा संक्षिप्त कार्यक्रम असा :११.१० ते ११.२५ यावेळेत नामनिर्देशन वाटप व स्वीकारणे, ११.३० : नामनिर्देशनपत्र छाणनी, ११.३५ : उमेदवार वैध यादी प्रसिद्ध करणे. ११.४५ : नामनिर्देशन पत्र माघार घेणे, दु. १२ वा.: आवश्यक असल्यास मतदान व निकाल घोषित करणे. गणपुर्तीअभावी सभा तहकूब झाल्यास अर्धा तासाने सभा होईल. तरीही गणपूर्ती न झाल्यास सदरची सभा रद्द करण्यात येईल, असे बाजार समितीचे सचिव तथा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी सभा नोटीसीद्वारे कळविले आहे.

## १०० दिवसाच्या विशेष मोहिमेमध्ये


# एकूण ३ हजार २४७ सनद वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२ मे-**

राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागांसाठी १०० दिवसांचा कृति आराखडा निश्चित करणेत आला आहे. त्याच धर्तीवर क्षेत्रीय कार्यालयांकरीता देखील १०० दिवसांमध्ये नागरिकांच्या काही महत्वाच्या विषयांवर मोहिम घेऊन कार्यवाही करण्याचे निर्देश देणे आवश्यक होते. त्यामध्येच पोटखराब क्षेत्र लागवडीखाली आणले असल्यास त्याप्रमाणे ७/१२ सदरी पोटखराब क्षेत्र कमी करुन लागवडीलायक क्षेत्रात वाढ करणेच्या सविस्तर सूचना दिनांक १३ मार्च २०२५ रोजी परिपत्रक काढून देणेत आले आहेत.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख, पुणे यांचे दिनांक १९ ऑगस्ट २०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार महसुली गावातील जमीनधारकाने पोटखराब वर्ग (अ) ची जम ीन लागवडीखाली आणल्यास अतिरिक्त आकारणी करावयाच्या कार्यपध्दती बाबत निर्देश दिले आहेत. या परिपत्रकानुसार जास्तीत जास्त क्षेत्र लागवडीखाली आणणे हा उद्देश आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडील परिपत्रक दिनांक १३ मार्च २०२५ अन्वये पोटखराब क्षेत्र लागवडीखाली आणणेकामी महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना कार्यपध्दतीबाबत कालबध्द कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे.

पोटखराब वर्ग (अ) मधील क्षेत्र लागवडीखाली आणल्यास अतिरिक्त आकारणी करणेचे अधिकार तहसिलदार यांना प्रदान करणेत आले असून तहसिलदार यांचेस्तरावर तालुकास्तरीय समिती स्थापन करुन विशेष म ोहिम राबविणेबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार संबंधित तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांनी अत्यंत चांगल्या प्रकारे विशेष मोहिम राबवून लागवडीखालील पोटखराब गटाची संख्या ५०८२ (क्षेत्र २४८०.४८ हे.आर) शोध घेवून त्यापैकी २८८८ गट (क्षेत्र १३४०.७७ हे. आर) लागवडीखली आणलेबाबत आदेश पारित केलेले आहेत. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यामध्ये सदर विषयाबाबत अत्यंत चांगले काम झालेले आहे.



ही मोहिम प्रभावीरित्या राबविण्यात आलेमुळे पोटखराब क्षेत्र लागवडीखाली आल्यामुळे लागवडीखालील क्षेत्राच्या आकारणीच्या प्रमाणत वाढ होऊन महसुली उत्पन्नात वाढ होणार आहे. तसेच जमिनीमध्ये सुधारणा केल्यामुळे त्याच्या जमिनीच्या मूल्यात देखील वाढ होण्यास मदत होईल. अंतिम विकास आराखडा DP मंजूर असलेल्या भागामध्ये ४२ प्रमाणे प्रादेशिक व प्रारुप विकास आराखडा मंजूर असलेलया ४२क प्रमाणे व कोणत्याही गावठाणाच्या हद्दीपासून २००मी च्या आतील क्षेत्राकरीता ४२ ड प्रमाणे अकृषिक वापराची सनद देणेत येते.

सदरच्या सनद प्रदान केल्यामुळे संबंधित जमीनधारकांना वेगळयाने अकृषिक परवानगी घेण्याची गरज गहत नाही. शासनाच्या १०० दिवस कृति आराखडा कार्यक्रमा पूर्वी सन २०१७ ते सन २०२४ पर्यंत ४२ब, ४२क व ४२ड मध्ये एकूण १२ हजार २४१ सनद प्रदान करणेत आलेल्या होत्या. शासनाच्या १०० दिवस कृति आराखडा कार्यक्रमामध्ये विशेष मोहिम घेऊन सोलापूर जिल्हयात तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांनी एकूण ४० शिबीर घेण्यात आले. सोलापूर जिल्हयात ४२ब, ४२क व ४२ड च्या १०० दिवसाच्या विशेष मोहिमेम ध्ये एकूण ३ हजार २४७ सनद वाटप करण्यात आले आहे.

सनद प्रदान केलेमुळे जमीन महसूलात वाढ होवून संबंधित मिळकतधारकांना त्यांचे मिळकतीमध्ये अकृषिक वापर सुरु करणेस सुलभ झाले आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आलेली आहे.

## अग्रलेख...

# संधी, क्षमता आणि सिद्धतेची कसोटी

काश्मीरच्या पहलगाममधील भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर देशात साहजिकपणे उसळलेली संतापाची लाट, जनतेमध्ये उफाळलेली बदल्याची भावना आणि काहीही करून आता निर्णायक कारवाई करून पाकिस्तानला कायमचा धडा शिकविण्याच्या भावनेतून वाढत असलेला सामाजिक दबाव यामुळे आता युद्ध हाच एकमेव पर्याय असल्याची चर्चा होत असताना अचानक केंद्रातील मोदी सरकारने देशासमोरील एका जिवंत प्रश्नाला हात घातला. आगामी जनगणनेत जातिनिहाय जनगणनेचा समावेश करण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाच्या राजकीय व्यवहारविषयक समितीच्या बैठकीत बुधवार, ३० एप्रिल रोजी घेण्यात आला.

सन १९३१ नंतर प्रथमच आणि स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच देशात जातिनिहाय जनगणना करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याचे निर्विवाद श्रेय मोदी सरकारच्या खात्यात जमा झाले आहे. कदाचित त्यामुळे आपल्याच दबावापुढे मोदी सरकार झुकले, असा नवा भ्रम माजविण्याचा प्रयत्न काँग्रेस व अन्य काही भाजपाविरोधी पक्षांकडून आता सुरू झाला आहे. मुळात या देशातील समाजघटक, जे जाती-जातींमध्ये विखुरले गेले आहेत; ज्यामुळे सामाजिक वर्गविग्रह निर्माण होऊन विषमतेची बीजे फोफावली आहेत, त्या सर्व समाजघटकांना समानता, समरसतेच्या सूत्रात बांधून एकत्र आणावयाचे असेल, तर जातिभेदाच्या दऱ्या बुजवून टाकल्या पाहिजेत, असा आग्रह गेल्या काही शतकांपासून ज्या देशातील समाजसुधारकांनी केला. त्या समाजसुधारकांना या नव्या निर्णयामुळे काय वाटले असते, हा प्रश्न आता बाजूला ठेवावा लागेल. जातिनिहाय जनगणना ही एक अटळ बाब ठरल्याचे वास्तव मोदी सरकारने स्वीकारले, हे समंजसपणाचे लक्षण म्हणावे लागेल. या निर्णयावर मोदी सरकारला मिळणारा सर्वपक्षीय पाठिंबा आणि समाजाच्या सर्व स्तरांतून जातिनिहाय जनगणनेचे होत असलेले समर्थन पाहता या निर्णयाची कार्यवाही आता फार कालापव्यय न होता तातडीने सुरू व्हावी, ही यापुढील सामाजिक अपेक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी मोदी सरकारवर असेल.

जातिनिहाय जनगणनेचा निर्णय घेण्यासाठी मोदी सरकारने हीच वेळ का निवडली, या शंकेने सध्या अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. उभ्या देशात युद्धज्वर उसळलेला असताना या निर्णयाची चर्चा व्हावी आणि पहलगाम हल्ल्यानंतरच्या कारवाईच्या अपेक्षांची तीव्रता कमी व्हावी, यासाठीच ही वेळ निवडल्याचा जावईशोधही लावला गेला. पण पहलगाम हल्ल्यानंतरच्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय आणि सीमेपलीकडील राजकीय परिणामांबाबत एका बाजूला वेगवेगळ्या कारवाया सुरूच आहेत, त्यासाठी सरकारच्या सर्व संबंधित यंत्रणा आपली सारी नीतिकौशल्ये पणाला लावून योग्य संधी आणि वेळ साधण्यासाठी सारी गणिते बांधत आहेत, याची खात्री अनेकांना असल्यामुळे, जातिनिहाय जनगणनेचा देशाच्या दृष्टीने महत्त्वाचा मुद्दा याच काळात कार्यवाहीकरिता ऐरणीवर आणून देशांतर्गत आणि देशापलीकडील सर्व समस्यांना न्याय देण्याची मोदी सरकारची भूमिका समजून घ्यायला हवी.

गेल्या अनेक दशकांपासून अनेक राजकीय पक्ष या जातिनिहाय जनगणनेचा मुद्दा ठासून मांडत आले आहेत. काही पक्षांनी आपल्या सत्ताकाळात राज्यनिहाय जाती जनगणना केल्याही आहेत; कदाचित आकडेवारीतील अपुरेपणामुळे असेल किंवा राजकीय लाभाच्या गणितास पूरक निष्कर्ष निघत नसल्यामुळे असेल, त्याची आकडेवारी जाहीर करण्यात आली नाही. या देशातील ज्या समाजघटकांचे लोकसंख्येनुसार संख्याबळ अधिक आहे, त्यांना देशातील सर्व संसाधनांचा आणि सुविधांचा लाभ त्यानुसार मिळावयास हवा, त्यांच्या लोकसंख्येनुसार संसाधनांवरील व लाभाच्या निर्णयांवरील त्यांच्या हक्काचा प्राधान्यक्रम ठरवायला हवा, ही त्यामागची भूमिका सर्वमान्य अशीच आहे. मोदी यांच्या भारतीय जनता पक्षाने सत्तेवर असताना आणि विरोधात असतानाही या भूमिकेचे जोरदार समर्थन केले होते. भारतीय जनता पार्टीचे खासदार म्हणून पहिल्यांदाच लोकसभेत दाखल झालेले महाराष्ट्रातील भाजपा नेते गोपीनाथ मुंडे यांनी त्यांच्या कार्यकाळात लोकसभेच्या सदनात या मागणीवर आग्रही भर दिला होता. अशी जनगणना करण्याचा मनसुबा २०११ मध्ये तत्कालीन काँग्रेस सरकारचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांनी जाहीर केला, तेव्हा काँग्रेसमध्ये फारशी सहमती नसतानादेखील, भाजपाच्या सुषमा स्वराज यांनी या कार्यवाहीस संपूर्ण सहमती व सहकार्य देण्याची लेखी ग्वाही पंतप्रधानांस दिली होती. २०११ मध्ये जातनिहाय जनगणना करण्यात आली होती, पण त्या जनगणनेतील आकडेवारी कधी उघड करण्यात आली नव्हती. त्यानंतर २०१८ मध्ये भाजपाचे राजनाथ सिंह यांनी जातिनिहाय जनगणना करण्याकरिता पक्षाची अनुकूलता स्पष्ट केली होती. राज्यांना तसे अधिकार देण्याचा प्रस्तावही भाजपाच्याच पुढाकाराने संमत झाला होता, हा इतिहास फार जुना नाही. त्यामुळे आता श्रेयाच्या लढाईत कोणीही कितीही तलवारी परजल्या, तरी कार्यवाहीच्या मुद्यावर या सरकारलाच निर्विवाद श्रेयाचे धनी ठरवावे लागेल, याची जाणीवही या पक्षांना आहे. हा मुद्दा राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा करण्यात प्रत्येक राजकीय पक्षाचा निवडणुकीच्या राजकारणाचा स्वार्थ आता लपून राहिलेला नाही. कारण जाहीर सभा-संमेलनांत जातिनिर्मूलनाचे कितीही नारे दिले जात असले, तरी जातीच्या आधारावरच मतदारसंघांची, उमेदवारीची आणि मतपेढ्यांची गणिते बांधली जातील, हे या देशाच्या निवडणूक राजनीतीचे कडवट वास्तव आहे. जाहीर सभा-संमेलनांतून जातिव्यवस्थेच्या निर्मूलनाची भाषणे करणाऱ्या अनेक नेत्यांनी जातिआधारित भावनांचा गैरफायदा घेत जाती-जातींमध्ये फूट पाडणारे राजकीय प्रयोग केल्याची अनेक उदाहरणे आसपास सातत्याने सहज दिसतही असतात. जात हे सत्तासंपादनाचे शक्तिशाली साधन असेल, तर जातीचे संख्याबळ कधीच सत्तेपर्यंत पोहोचू शकणार नाही अशा भावनेने काही समाजसमूहांत उदासीनताही दिसून येते. म्हणूनच संधींचे आणि लाभांचेही न्याय्य वाटप हा पर्याय यावरील उपाय ठरत असेल, तर त्यासाठी मागे जाऊन जुन्या आरंभबिंदूपासून सुरुवात करावयास हवी, हीच आजची गरज ठरते. एका दृष्टीने हा प्रकार म्हणजे 'पुनश्च हरिओम' म्हणण्यासारखा ठरेलही, पण वर्तमानातील समाजभान ज्या दिशेने झुकत आहे, ते पुन्हा योग्य स्थानी आणून ठेवण्याकरिता तो गरजेचा असल्याचे वास्तव स्वीकारावे लागेल. सामान्य माणसाच्या दृष्टीने किंवा सामाजिक ऐक्याच्या दृष्टीने जातव्यवस्था ही समाजात दरी निर्माण करणारी, काही ठरावीक समूहांच्या वर्चस्वास प्रेरणा देणारी आणि काही वर्गांच्या सामाजिक उत्कर्षात अडथळे आणणारी व्यवस्था असल्याने ती व्यापक सामाजिक हिताच्या दृष्टीने अन्यायकारच आहे आणि विकासाची सर्व फळे समाजाच्या सर्व घटकांस समान प्रमाणात चाखता यावी, अशी भावना असेल तर ही व्यवस्था मोडीतच काढली पाहिजे, असा गेल्या शतकापासून अधिक काळापासून सुरू असलेला मतप्रवाह सामाजिक मानसिकतेत मूळ धरू पाहात असतानाच पुन्हा एकदा काळाचे काटे उलटे फिरवून त्याच व्यवस्थेस बळकटी देण्याचा तर हा प्रकार ठरणार नाही ना, अशा शंका काहींच्या मनात घर करू लागल्या आहेत. त्या अनाठायी आहेत, असेही म्हणता येणार नाही. पण जातिव्यवस्थेचे निर्मूलन करण्याआधी सर्व जातिसमूहांना सामाजिकदृष्ट्या एका स्तरावर आणून ठेवणे ही त्याआधीची गरज आहे. कोणत्याही शर्यतीसाठी उभे असलेल्या सर्व स्पर्धकांना सुरुवातीस एका रेषेवरच उभे केले जाते. काही जण पुढे, काही जणांना मागे ठेवून शर्यत सुरू केल्यास, ज्यांना सुरुवातीलाच पुढे उभे केले आहे, त्यांनाच जिंकण्याची संधी अधिक असेल, त्यामुळे मागे उभे असलेल्यांना अगोदर एका रेषेवर आणले पाहिजे आणि मगच शर्यत सुरू केली पाहिजे, हे सामाजिक न्यायाचे तत्त्व पाळावयाचे असेल, तर मागे असलेल्या वर्गास शर्यतीत सहभागी होण्याची संधी देण्याआधी त्यांच्यामध्ये तशी क्षमता निर्माण करावीच लागेल. जातिनिहाय जनगणना करून, मागच्या रेषेवर उभ्या असलेल्या समाजघटकांना न्याय्य संधी बहाल केल्यास ती क्षमता निर्माण होईल आणि त्यानंतरची स्पर्धा निकोप असेल. संधींच्या समान वाटपाचे सूत्र म्हणून उचललेल्या या पहिल्या पावलाकडे राजकारणापलीकडे जाऊन समंजसपणे पाहावयास हवे, ते त्यामुळेच!

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# भारतातल्या 'पाकिस्तान'चं काय करायचं?

पहलगाम हल्ल्यानंतर ज्यावेळी मोदी सरकारने भारतातील पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांत भारत सोडून जाण्याचे आदेश दिले तेव्हा अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या. भारतात अनेक पाकिस्तानी नागरिक अनधिकृतरीत्या राहत आहेत. भारतीय मुस्लिम महिला पाकिस्तानी पुरुषांशी निकाह करतात आणि राहतात मात्र भारतात. त्यांची मुले भारतातच लहानाची मोठी होतात. आपल्या भारतात घुसखोरी होते हे माहीत होतं; पण पाकिस्तानी पुरुषांशी विकाह करून भारतात राहण्याचं व मुलांना भारतातच वाढवण्याचं कटकारस्थान या हल्ल्यानंतर उघडे झाले आहे. आता यात कुणाला कटकारस्थान वाटत नसेल तर आपल्याला त्याच्या बुद्धीची कीव करावी लागेल. भारतात मुस्लिमांची जी लोकसंख्या वाढली आहे ती केवळ नैसर्गिक पद्धतीने वाढली नसून अशाप्रकारे कटकारस्थान करून वाढलेली आहे. लक्षात घ्या, ज्या मुलांचे अब्बू हे पाकिस्तानी आहेत, ती मुले भारतात वाढली तर काय होईल? ती मुले मनाने भारतीय बनतील का? नव्हे, ती मनाने पाकिस्तानी बनतील. आपण १९४७ साली कोणतेही नियोजन न करता फाळणी करून किती मोठी चूक केली, हे आता आपल्या लक्षात येत आहे. फाळणी करताना लोकसंख्येची अदलाबदल केली नाही. ज्येष्ठत्व स्वीकारून पाकिस्तानवर वचक ठेवला नाही. त्यांची शक्ती आपल्यापेक्षा सर्वार्थाने कमी; तरी ते आपल्याकडे इतकी वर्षे डोळे वटारत होते. त्यांनी डोळे वटारले की, आपण मान खाली घालून निघून जायचो. ही आपली राजकीय स्थिती होती. मात्र, २०१४ नंतर परिस्थिती हळूहळू बदलू लागली. आज आपण त्यांच्याकडे डोळे वटारून पाहतो. पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय जनतेला असं वाटत आहे की, युद्ध झालं पाहिजे. मात्र, युद्ध हे खर्चिक असतं. त्याचे परिणाम काही वर्षे भोगावे लागतात. आपलं सरकार आणि सैन्य योग्य तो धडा शिकवेलंच पाकिस्तानला. पण मला चिंता सतावतेय ती म्हणजे भारतात असलेल्या पाकिस्तानचं काय करायचं?

जाहिरात विश्वातले सम्राट व नाटककार भरत दाभोळकर यांनी त्यांच्या फेसबुकवर एक धक्कादायक माहिती दिली आहे. त्यांच्या गुजराती नाटकाच्या रिहर्सलला एक मुलगी कांदिवलीवरून येत होती. तिचा नवरा तिला ओशिवरा येथे सोडायला आला. जेव्हा ते मालाडला पोहोचले तेव्हा एका टँकर किंवा मोठ्या टेम्पोने त्यांच्या कारला जोरदार धडक दिली. पोलिस स्टेशनमध्ये त्यांना कळले की, ड्रायव्हरकडे ड्रायव्हिंग लायसन्स नव्हते. त्याने त्याचे नाव 'अफझल' असल्याचे सांगितले, पण त्याच्या आधारकार्डवर त्याचे नाव 'सैफ अली' होते. नंतर कळलं की, तो बांगलादेशी घुसखोर आहे.



पोलिसांनी त्याच्या मालकाशी संपर्क साधला तेव्हा तोदेखील बांगलादेशी घुसखोर निघाला. हा भारतात राहून व्यवसाय करतोय. विचार करा, आपण ज्या मुस्लिम व्यक्तीकडून खरेदी करतो, त्याच्याशी आपला संबंध येतो ती मुस्लिम व्यक्ती मूळची भारतीय आहे की बांगलादेशी व पाकिस्तानी घुसखोर आहे, हेही आपल्याला माहित नसतं. उद्या जर काही वाद झाला, खटके उडाले तर आपलं काय होईल, याची कल्पनाही करवत नाही. याचा अर्थ आपण एका टाईम बॉम्बवर उभे आहोत. हा बॉम्ब कधी फुटेल आणि कधी आपल्या चिंधड्या उडतील, हे आपल्याला कळणारसुद्धा नाही. हे घुसखोर मुस्लिमबहुल विभागात राहतात. म्हणजे या लोकांना आश्रय देणारे स्थानिक आहेत. भारतात होणाऱ्या लहानसहान दंगली या चाचण्या आहेत. ते टेस्ट करीत आहेत की, उद्या जर मोठी दंगल करायची झाल्यास हिंदूंची, पोलिसांची आणि सैन्याची तयारी काय आहे? ही शक्यता नाकारता येत नाही. त्यात हिंदू अजूनही 'स्टॉकहोम सिंड्रोम' या विकारातून मुक्त झालेले नाहीत. स्टॉकहोम सिंड्रोम म्हणजे अत्याचार करणाऱ्याबाबत आपल्या मनात निर्माण झालेली आपुलकीची भावना, प्रेम. हा विकार आपला घात करत आहे. पहलगाम हल्ल्यातील एका पीडितेने स्थानिक काश्मिरींबाबत असं म्हटलं की, 'मी माझे वडील गमावले, पण मला दोन भाऊ भेटले.' कुणीतरी सोशल मीडियावर फोटो व्हायरल केला. त्यात असं लिहिलं होतं की, पाकिस्तानने माझ्या वडिलांचा जीव घेतला नसून युद्धाने त्यांचा बळी घेतला आहे. या हल्ल्यात हुतात्मा झालेले नेव्ही अधिकारी विनय नरवाल यांच्या पत्नीने असं विधान केलं की, 'लोक मुस्लिम आणि काश्मिरींच्या विरोधात जात आहेत ते आम्हाला नकोय. अर्थात आम्हाला न्याय हवाय.' ही सर्व लक्षणे स्टॉकहोम सिंड्रोमची आहेत. कोणत्याही आजाराची, विकाराची सुरुवातीची काही लक्षणे असतात व तो आजार वाढला की, काही वेगळी लक्षणे दिसू लागतात. आता स्टॉकहोम सिंड्रोमची जी लक्षणे दिसत आहेत, ती तीव्र आणि गंभीर आहेत. यावर उपचार कसा करायचा हे आपल्याला माहिती नाही.

आपण आज पाकिस्तानसोबत युद्ध करायच्या गोष्टी करीत आहोत. जर युद्ध झालं तर आपण जिंकूही. पण पाकपेक्षा मोठी समस्या भारतात निर्माण होणाऱ्या पाकिस्तानची आहे. फाळणी व्हायच्या आधी सर सय्यद अहमद खान यांनी द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत मांडला. आज आपण पुन्हा एकदा त्या समीप जात आहोत. म्हणून पाकिस्तानशी आपण युद्ध करू तेव्हा करू. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे दोन गोष्टींवर आपल्याला उपाय शोधून काढावा लागणार आहे.

१) स्टॉकहोम सिंड्रोमने ग्रस्त हिंदूंवर उपचार करणे

२) भारतात निर्माण होणाऱ्या पाकिस्तानचा बंदोबस्त करणे.

या आपल्या समोरच्या दोन मोठ्या अंतर्गत समस्या आहेत. यावर केवळ सरकारनेच नव्हे, तर सज्जन हिंदूंनी काम करण्याची गरज आहे. ज्या महिलांनी पाकिस्तानी पुरुषांशी लग्न केलं आहे, त्यांना कोणतीही दयामाया न दाखवता त्यांच्या मुलांसोबत भारत सोडायला लावलं पाहिजे. आपण भारतात भारताचे शत्रू निर्माण नाही करू शकत. हे आपल्याला परवडणारं नाही तसेच नागरिक म्हणून बांगलादेशी व पाकिस्तानी घुसखोर आणि घुसखोरांना शरण देणाऱ्यांकडून काहीही खरेदी करू नये. आपण त्यांचे ग्राहक होता कामा नये. गणेशोत्सव, नवरात्रौत्सव व इतर राज्यांतील त्या त्या उत्सवांद्वारे हिंदूंमधील स्टॉकहोम सिंड्रोमवर उपचार करणारे कार्यक्रम राबविले पाहिजेत. हिंदूंना समजावून सांगितलं पाहिजे की, हा तुमचा चांगूलपणा नसून ही सद्‌गुणविकृती आहे. ही आत्महत्या आहे. हिंदूंनी आपल्याच हिंदू बांधवांबद्दल द्वेष पसरवणं सोडलं पाहिजे. हिंदू, शीख, बौद्ध, जैन आणि सर्व संप्रदाय व पंथ आपण सारे हिंदू बंधू आहोत. आता वेळ आली आहे हातात हात घालून चालण्याची. समरस होण्याची... सामाजिक समरसता हे खूप मोठे उत्तर ठरणार आहे... खूप मोठी क्रांती ठरणार आहे!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# जल व्यवस्थापन जीवनशैली व्हावी

सध्या अंगाची काहिली करणारे कडक ऊन तापत आहे. बाहेरून घरात आल्यावर पाण्यासाठी जीव कासावीस होतो. थंडगार पाणी प्यावेसे वाटते. अजूनही अनेक गावात पाण्याची टंचाई आहे. तर, अनेक शहर आणि गावात ८ ते १० दिवसाआड पाणी पुरवठा केला जातो. पाण्याच्या वापराबाबत जनजागृतीसाठी जलसंपदा विभागामार्फत अकोला येथे आयोजित जल व्यवस्थापन पंधरवड्याचा समारोप करताना राज्याचे कामगार व अकोला जिल्हा पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी जल व्यवस्थापनाची कृती ही पंधरवड्यापुरतीच मर्यादित न राहता जल व्यवस्थापनाचा अंगीकार जीवनशैली म्हणून झाला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यांची ही अपेक्षा अतिशय योग्य आहे. कारण मानवाने विज्ञानाच्या आधारावर अनेक असाध्य गोष्टी साध्य केल्या आहेत. तरीही माणसाला रक्त आणि पाणी या दोन गोष्टी अजून तरी तयार करता आलेल्या नाहीत. सर्व प्राणिमात्रांना जिवंत राहण्यासाठी रक्त आणि पाणी या दोन गोष्टींची नितांत आवश्यकता असते. राजस्थानात आजही पावसाचे घराच्या छतावर पडणारे पाणी टाक्यामध्ये साठवून ठेवले जाते. त्याचा वापर वर्षभर पिण्यासाठी केला जातो. महाराष्ट्रातही जलयुक्त शिवार योजना राबविण्यापूर्वी अनेक गावांत दरवर्षी उन्हाळ्यात पाणी टंचाईचा सामना करावा लागत होता. जलयुक्त शिवारमुळे टंचाईच्या प्रमाणात घट झाली असली, तरीही संपूर्णपणे पाणी टंचाई दूर झालेली नाही. त्यामुळे पाण्याचा वापर पैशासारखा केला पाहिजे. त्याची उधळपट्टी न करता काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. आपल्या राज्यात धो धो पाऊस पडतो. पावसाचे पडणारे पाणी मोठ्या प्रमाणात नदी-नाल्यात वाहून जाते. तेव्हा, घराच्या छतावर पडणारे पावसाचे पाणी जमिनीत मुरविणे आवश्यक आहे. त्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे गरजेचे आहे. पावसाचे जमिनीवर पडणारे पाणी अडविले पाहिजे. अडविलेले पाणी जमिनीत मुरविले पाहिजे. घराच्या छतावरील पावसाचे पाणी घराच्या बाजूला असलेल्या विहीर किंवा बोअरिंगमध्ये जिरविले पाहिजे. शेतातील वाहून जाणारे पावसाचे पाणी बांध घालून किंवा शेततळे करून अडविले पाहिजे. अडविलेले पाणी जमिनीत मुरेल. शेत किंवा घराजवळील जलस्रोतांच्या जलस्तरात वाढ होईल. हे जलस्तर उन्हाळ्यात आटणार नाहीत आणि आपल्याला पाणी टंचाईचा सामना करावा लागणार नाही.

जलसंपदा विभागाने 'पाण्याचा प्रत्येक थेंब अधिक उत्पादन' या सूत्रानुसार शेती सिंचनासाठी पाण्याचा वापर योग्य प्रकारे करण्याची आवश्यकता व्यक्त करून त्याबाबत जागरुकता करण्यासाठी कार्य करण्याची गरज वर्तविली आहे. शेती सिंचनासाठी आधुनिक पद्धतीचा वापर आवश्यक आहे. इस्रायलसारख्या देशाने ठिबक सिंचनाचा वापर करून शेतीच्या उत्पादनात क्रांती घडविली. त्याप्रमाणे शेतकऱ्यांनी कमी पाण्यात येणाऱ्या वाणांची निवड करून ठिंबक, तुषार पद्धतीने पिकांचे सिंचन करावे. त्यामुळे पाण्याचा प्रत्येक थेंब उपयोगात आणणे शक्य होईल. पाणी शिळे झाले, असे आपण म्हणतो; वास्तविकतः पाणी कधी शिळे होत नाही. आपल्याकडे जर दररोज नळाला पाणी येत असेल तर दुसऱ्या दिवशी आपण शिळे झाले म्हणून पाणी फेकून देतो. एक किंवा दोन दिवसाआड पाणी येत असल्यास दोन दिवसांनी ते पाणी शिळे होते. ८ ते १५ दिवसाआड ज्या ठिकाणी पाणी येते, तेथे १५ दिवसांनी पाणी शिळे होते. धरणामध्ये पावसाचे पाणी साठलेले असते. म्हणजे ते पाणी वर्षभर शिळे होत नसते. नदीतील पाणी वाहते असल्याने ते शिळे होत नसते. याचा अर्थ पाण्याच्या उपलब्धतेवर आपण पाण्याचा शिळे आणि ताजेपणा ठरवितो. पण, पाणी नेहमी शुद्ध असते. ते शिळे होत नाही. तेव्हा, घरात आदल्या दिवशी भरून ठेवलेली सर्व पाण्याची भांडी दररोज रिकामी न करता ज्या भांड्यातील पाणी वापरले गेले असेल तेवढीच नळाला पाणी आल्यावर भरा. प्रातर्विधीसाठी खारे पाणी वापरा. अनेक लोक त्यांची दुचाकी, कार इत्यादी वाहने धुतात. त्यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होतो. वाहने धुण्यासाठी पाईपची धार न उडविता ओल्या फडक्याने वाहने पुसून काढा. त्यामुळे कमी पाणी वाया जाईल. सिंधू नदीचे पाणी पाकिस्तानात जाऊ देणार नाही, असे भारताने म्हटल्याबरोबर पाकिस्तानात हाहाकार माजला. कारण सिंधूच्या पाण्यावरच पाकिस्तानातील शेती आणि जनता अवलंबून आहे. सिंधूच नव्हे, तर कोणत्याही नदीचे पाणी त्यांच्यासाठी आवश्यक आहे. यावरून पाण्याचे महत्त्व आपण समजले पाहिजे. आजपासूनच पाण्याचा वापर अत्यंत जपून करण्याची आपण सर्वांनी शपथ घेतली पाहिजे. जल व्यवस्थापन ही आपली जीवनशैली झाली पाहिजे, असा निश्चय आपण केला पाहिजे!

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# पवार, ठाकरेंचे मौन का?

केंद्र सरकारने सामाजिक-आर्थिक जात जनगणना करण्याचा निर्णय जाहीर केला. त्यानंतर काँग्रेसकडून वरिष्ठ स्तरावर स्वागत करण्यात आले. मात्र, काँग्रेसचे सहकारी असलेले राज्य स्तरावरील महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे प्रमुख शरद पवार, उद्धव ठाकरे यावर काही का बोलले नाही? यांचं ओबीसींच्या प्रश्नावर एवढं सोयीस्कर मौन का? काय समस्या आहे यांची? २०११ साली सोनिया गांधींच्या नेतृत्वातील युपीए सरकारच्या काळात शरद पवार केंद्रीय मंत्री असताना सामाजिक सर्वेक्षण झाले होते. त्याला लागूनच जातींची माहितीदेखील गोळा करण्यात आली होती. एकप्रकारे जातनिहाय जनगणनाच झाली होती. पण ती माहिती काँग्रेस सरकारने जाहीर केली नाही. त्याच्याबद्दल राहुल गांधी आणि शरद पवारांचं काय म्हणणं आहे? जेव्हा यांच्याकडे संधी होती, तेव्हा चुकीचं आणि घाईघाईत बोगस काम काँग्रेसने केलं होतं आणि आता मोदीजींना शहाणपणा शिकवायला निघाले आहेत, काँग्रेसचे युवराज आणि त्यांच्या मांडीवर बसलेले काही लोकं. याचा सरळ अर्थ असा आहे की, काँग्रेस आणि त्याचे सहकारी कधीही ओबीसींच्या प्रश्नांबाबत गंभीर नव्हते. जाती-पातीचं राजकारण करून आपली राजकीय पोळी शेकण्याचं काम आजवर ही मंडळी करत आली. याचं उत्तम उदाहरण म्हणजे आठ-नऊ महिन्यांपूर्वी मराठा आरक्षणाचा मुद्दा ऐरणीवर आल्यानंतर राज्य सरकारने अर्थात मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी एक सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. त्या बैठकीला येण्याचे सर्व विरोधकांनी मान्य केले होते. प्रत्यक्षात एकाही विरोधी पक्षाने हजेरी लावली नाही. यावरूनच विरोधकांची कुटिल मानसिकता लक्षात येते. यावेळी केंद्र सरकारने तब्बल ९४ वर्षांनंतर जातिनिहाय जनगणना करण्याचा एवढा मोठा निर्णय जाहीर केला. पण धार्मिक आणि जातीय रंग देऊन राजकारण करणाऱ्या या मंडळीचे मनसुबे आता फस्त होत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे यावेळी निर्णयाचे स्वागत करता येत नाही आणि विरोध केला तर छुपा अजेंडा उघडा पडेल, अशाप्रकारे 'इकडे आड आणि तिकडे विहीर' अशी स्थिती यांची झालेली दिसते.

काँग्रेसकडून फटाक्यांची आतषबाजी करून हा निर्णय राहुल गांधींचा विजय असल्याचे आणि बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दलाकडून हा आपला आणि लालूप्रसादांच्या प्रयत्नांचा विजय असल्याचे सांगत किमान या निर्णयाचे स्वागत तरी केले. पण महाराष्ट्रात तोंडदेखले का होईना, या निर्णयाचे स्वागत करण्याचे औदार्यदेखील येथील संधिसाधू राजकीय नेतेमंडळी दाखवू शकली नाही. नाही त्या विषयात नाक खुपसणारे ठाकरे आणि गँग आता या सामाजिक कार्यात मात्र मौन बाळगून बसले आहेत. राज्यातले ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पहलगामसारख्या अतिसंवेदनशील विषयावर असंवेदनशीलच का होईना, पण वक्तव्य केले. मात्र, बहुजनांच्या विषयावर ते मूग गिळून बसले आहेत. एवढेच नव्हे, तर गद्दे, टिकली, साडी, पदर यांसारख्या विषयात हिरीरीने तोंड मारणाऱ्या सुप्रियाताईदेखील कुठेही दिसल्या नाहीत. त्रिभाषा सूत्रानुसार हिंदी ही तिसरी भाषा अनिवार्य करण्याच्या राज्य सरकारने जारी केलेल्या परिपत्रकावर भडकणारे 'हिंदू आहोत हिंदी नाही' म्हणत तत्काळ प्रतिक्रिया देणाऱ्या राज ठाकरेंना आता यावेळी केंद्र सरकारने हिंदू, मराठी ओबीसींच्या बाबतीत घेतलेल्या निर्णयावर तोंड उघडायला काय झालं असेल बरं? का देशातला आणि महाराष्ट्रातला ओबीसी हिंदू किंवा मराठी नाहीत?



मुळात जातीय जनगणना करण्यास भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विरोध असल्याचा दुष्प्रचार करण्यात सारे विरोधक नेहमीच एक पाऊल पुढे राहिले आहेत. प्रत्यक्षात १९७८ मध्ये जनता पार्टीच्या समर्थनाने मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वातील पहिले गैरकाँग्रेसी सरकार देशात आले. त्या सरकारने मंडल आयोगाची स्थापना केली होती. १९८० मध्ये आयोगाने आपला अहवाल सरकारला सादर केला. मात्र, दुर्दैवाने तोपर्यंत देशात काँग्रेसचे सरकार आले होते. यातली महत्त्वाची बाब म्हणजे काँग्रेसने यावर कुठलीही कारवाई शेवटपर्यंत केली नाही. त्यानंतर इंदिरा गांधींनी 'ना जात पर ना पात पर, इंदिराजी की बात पर, मुहर लगेगी हाथ पर'चा नाराच दिला होता. त्यानंतर राजीव गांधींनीदेखील याचीच री ओढली. आणि या सर्व प्रकाराच्या फार पूर्वी म्हणजे देश स्वातंत्र्य झाल्यानंतर पहिल्यांदा जनगणना करण्याचा निर्णय १९५१ मध्ये झाला. तेव्हा जातनिहाय जनगणना करण्याचा विरोध स्वतः जवाहरलाल नेहरूंनी केला होता. जातनिहाय गणना करू नये या नेहरूंच्या विरोधामुळे २०११ पर्यंत अशा पद्धतीने जातीय गणना झालीच नाही. त्यावेळी राममनोहर लोहिया यांनी आम्ही ६० टक्के असल्याने आम्हाला तेवढा वाटा सत्ता आणि संपत्तीत मिळाला पाहिजे, अशी मागणी लावून धरली होती. मात्र, काँग्रेसचं राजकीय मॉडल हे ओबीसी विरोधी होतं. यांचं महाराष्ट्रातील राजकारण दलित १३ टक्के, मुस्लिम १२ टक्के आणि मराठा ३२ टक्के असे मिळून ५७ टक्क्यांचे होतं. असंच विविध राज्यात यांनी राजकारण केलं. उत्तर प्रदेशात दलित, मुस्लिम, ब्राह्मण, तसंच कुठे दलित, मुस्लिम, जाट, कुठे दलित, मुस्लिम, रेड्डी अशा पद्धतीचं बेरजेचं राजकारण काँग्रेसने दीर्घकाळ केलं. एवढ्यावर बहुमत मिळवायचं आणि राज्य करायचं हे काँग्रेसचं धोरण होतं. मग बाकी कोणाचं कामही नव्हतं आणि त्यांच्या मागण्यांकडे लक्ष देण्याची गरजदेखील नव्हती. त्यामुळे सातत्याने ओबीसींची उपेक्षा काँग्रेस आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केली. आता यानिमित्ताने भाजपा आणि आरएसएसला बदनाम करण्याचं यांचं षडयंत्र उघड पडलं आहे.


आता जाती-धर्मात तणाव निर्माण करून, विष कालवून राजकारण करणं यापुढे अवघड होईल, याची कुणकुण या संधिसाधू लोकांना लागली असावी. त्यामुळे या विषयावर यांचं मौन आहे का, असा प्रश्न यानिमित्ताने निर्माण झाला आहे.

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### वाहनांचे प्रखर एलईडी हेडलाईट

नागपूर शहरात रात्रीच्या वेळी कार चालवणे कठीण होत चाललं आहे. सिग्नल तोडणे, वेगाची मर्यादा ओलांडणे, वाहतुकीचे नियम न पाळणे आणि चुकीच्या मार्गाने वाहन चालवणे यासोबत अत्यंत प्रखर हेडलाईट ही समस्या जाणवू लागली आहे. पारंपरिक पिवळसर दिवे एलईडीमुळे कमी होत आहेत.



एलईडी दिवे टिकाऊ असल्याने पाच वर्षांपर्यंत टिकू शकतात. ते शुभ्र पांढरा प्रकाश निर्माण करतात जो वाहनचालकाच्या डोळ्यांसाठी उत्तम असतो. एलईडी दिवे धुक्याच्या किंवा पावसाळी रात्री वाहन चालवण्यासाठी अत्यंत सोयीचे ठरतात. त्यांना कमीत कमी पॉवरची गरज असते. या दिव्यांचा प्रखर प्रकाश समोरून येणाऱ्या वाहनाच्या चालकासाठी त्रासदायक ठरतो. बहुसंख्य चालक वाहनाचे लाईट डिप्परऐवजी अप्पर ठेवून रात्रीच्या वेळी वाहन चालवतात. एलईडी हेडलाईटची प्रकाशकिरणे सरळ समोरून येणाऱ्या वाहनचालकाच्या डोळ्यात शिरतात आणि डोळे दिपल्याने त्याला काहीही दिसत नाही. वाहनाची गती कमी करावी लागते किंवा वाहन थांबवावे लागते. एलईडी लाईटच्या प्रखर प्रकाशकिरणांनी डोळ्यातील रेटिनाचं पण नुकसान होऊ शकतं. वाहनचालकाला काहीही दिसत नसल्याने अपघाताची शक्यता वाढते. काही हौशी वाहनचालक बेकायदेशीरपणे जास्त पॉवरचे एलईडी लाईट वापरतात. वाहतूक विभागाने अशा बेजबाबदार वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करावयास हवी.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

### पहलगाम येथे स्मारक उभारा

पाकिस्तान कित्येक वर्षांपासून दहशतवादी कारवायांसाठी विशेषतः भारतविरोधी दहशतवादी कारवायांसाठी संपूर्ण जगात बदनाम आहे. याच बदनामीला साजेसा बदनामीचा कळस गाठणारा दहशतवादी हल्ला काश्मिरात अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथे जमलेल्या पर्यटकांना त्याचे नाव व धर्म विचारून व हिंदू असलेल्या निष्पाप निरपराधी पर्यटकांना गोळ्या घालून ठार करण्यात आले. मानवाधिकाराची हत्या करण्यात आली. पर्यटकांच्या निर्दोषपणाचा कसलाही विचार न करता हिंदू म्हणून हत्या करण्यात आली. बिच्चारे २६ पर्यटक नाहक मारले गेले. काश्मिरात विकास होतोय. पर्यटक निर्धास्तपणे काश्मिरात येत आहेत. फिरत आहेत. काश्मिरातील लोकांना पर्यटनामुळे भरपूर उत्पन्न मिळते आहे. लोक केंद्र सरकारचे गोडवे गात आहे हे पाहून पाकिस्तानचा जळफळाट झाला आणि आपली भडास काढण्यासाठी हा मानवतेला काळिमा फासणारा भ्याड दहशतवादी हल्ला घडवून आणला. त्यामुळे काश्मिरातील मुस्लिम बांधवांची कोंडी झाली, हे दहशतवादी विसरले. देशभरातील सर्व मुस्लिम हिंदू एकत्र येऊन देशभर पाकिस्तानविरोधी निदर्शने करीत आहेत, याची कल्पनाही पाकिस्तानने केली नसेल. दहशतवादी हल्ल्यात भारतातील निरनिराळ्या राज्यातील जे २६ लोक मारले गेले त्या निरपराध लोकांसाठी पहलगाम येथे लवकरात लवकर ठळक असे स्मारक उभारावे; ज्यामुळे काश्मिरात येणाऱ्या भविष्यातील देश-विदेशी पर्यटकांना पाकिस्तान सरकार पुरस्कृत या काळ्या दहशतवादी कृत्यांची इत्थंभूत माहिती या स्मारकाने मिळेल व पाकिस्तानची घृणास्पद दहशतवादी हल्ल्याची जगभर आपोआप नेहमीकरिता निंदानालस्ती होईल. केंद्र सरकारने मनावर घेऊन हे स्मारक वर्षभराच्या आत पूर्ण करावे, ही समस्त भारतीयांची इच्छा असेल.

**प्रा. अनिल पळणीटकर**/९३७३२१३६१०

### काश्मिरातील अस्थिरता चिंताजनक

पृथ्वीवरील स्वर्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जम्मू-काश्मीरचे खोरे पहलगाममध्ये पाकिस्तानी दहशतवाद्यांनी पर्यटकांवर अंदाधुंद केलेल्या गोळीबाराने २७ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना अत्यंत चिंताजनक आणि संतापजनक ठरते. संपूर्ण देशवासीयांचे मन गहिवरले आहे. आजपर्यंत दहशतवाद्यांनी काश्मीर खोऱ्यात अनेक हल्ले केले आणि हजारोंच्यावर निष्पाप लोकांचे तसेच देशाचे संरक्षण करणाऱ्या सैनिक तसेच अधिकाऱ्यांवर हल्ले केले. मात्र पहलगाममधील छोटे स्वित्झर्लंड म्हणून पर्यटकांसाठी प्रसिद्ध असलेले बैसरन भागात दहशतवाद्यांनी मोठा रक्तपातच घडवला आहे. या अगोदर नाव आणि धर्म विचारून हिंदू धर्मीय पर्यटकांना गोळ्या घातल्या. पुलवामा हल्ल्यानंतर ज्याप्रमाणे जशास तसे उत्तर दिले गेले, त्याचप्रमाणे अधिक कठोरतेने आता पहलगामनंतरही पाकिस्तानला अखेरचा निर्वाणीचा निरोप देण्याची वेळ आलेली आहे. पाकिस्ताने आपला विनाश ओढवून घेण्याला एक प्रकारे आमंत्रण दिलेले आहे, ही बाब स्पष्ट होते. पाकिस्तानची ही उरलीसुरली खुमखुमी संपुष्टात आणण्याची हीच योग्य वेळ आहे. या पर्यटकांनी काश्मीरमध्ये जाऊन तिथल्या बदललेल्या परिस्थितीचा आनंद घेण्याचा प्रयत्न केला होता. आपल्याच देशाच्या अत्यंत निसर्गरम्य जम्मू-काश्मीर राज्यात त्यांचे जाणे म्हणजे काश्मीरबरोबरचे संबंध दृढ करण्यासारखे आहे. म्हणून या पर्यटकांचे हौतात्म्य वाया जाऊ नये.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

महत्वाचे...



## कुमठे जैन मंदिरावर पंचधातूचा झेंडा अर्पण

**सोलापूर, दि. २ मे-**

कुमठे येथील अतिशय क्षेत्र १००८ श्री चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिर समितीच्या वतीने कुमठे येथील चंद्रप्रभू जैन मंदिराच्या शिखरावर पंचधातूच्या भव्य झेंडा बसवण्याचे आयोजन केले होते हा झेंडा कुमठे येतील संमती मेटलचे संचालक वैभव पाटील व त्यांचे वडील विजय पाटील यांनी हा झेंडा कोठे जैन मंदिर मंदिरास अर्पण केला. प्रारंभी या परिवाराच्या वतीने या झेंड्याची पूजन करून झेंडा शिखरावर लावण्यात आला. या झेंड्या विषयी बोलताना पंडित डॉ. महावीर शास्त्री म्हणाले मंदिरास पूर्वी ध्वजपट होता .मंदिरात ताई स्वरूप यावे मंदिराच्या अनुषंगाने समाजाचे तसेच संपूर्ण गावचा विकास होऊन समृद्धीच्या दृष्टीने मंदिरावर पंचधातूचा भव्य ध्वज स्थापन करण्यात आला. कार्यक्रमास मंदिर समितीचे अध्यक्ष श्याम पाटील सचिव वालचंद पाटील उपाध्यक्ष नितीन कासार, पंडित अक्षय शहा, प्रथमेश कासार, सचिन कासार, अनिल पाटील, अशोक पाटील, युवराज लोखंडे, अमोल पाटील, भाग्येश पाटील, संजय पानपट, महावीर पानपट, संदीप पानपट, रवी कासार, रोहित कासार, मनोहर कासार, शितल कासार, देवेंद्र कासार, अभिषेक कासार, आनंद पाटील, सागर पाटील, अजित पाटील, सचिन पाटील, ओम पाटील आदीं कार्यक्रमास उपस्थित होते.

## भटके विमुक्त समाजातील लाभार्थ्यांना जातीच्या प्रमाणपत्राचे रविवारी वितरण

**पुणे, दि. २ मे-**

महाराष्ट्र शासन व भटके विमुक्त विकास परिषदेच्या संयुक्त विद्यमाने पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातील ॲम्फी थिएटर सभागृह येथे रविवार, दि. ४ मे रोजी पुणे महानगर व ग्रामीण भागातील भटके विमुक्त समाजातील लाभार्थ्यांना जातीचे प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम सकाळी ११ वाजता संपन्न होत आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी तसेच भटके विमुक्त विकास परिषदेचे अध्यक्ष उध्दव काळे, कार्याध्यक्ष डॉ. संजय पुरी आणि कार्यवाह नरसिंग झारे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमामध्ये लाभार्थ्यांना जातीचे दाखले वितरण तसेच राजे उमाजी नाईक शासकीय कागदपत्रे वाटप अभियान या विषयावर एका पुस्तिकेचे विमोचन बावनकुळे यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती अटके विमुक्त विकास परिषदेचे प्रांत संयोजक स्वामी धनगर यांनी दिली.



## लेखक आसिफ इक्बाल यांना पीएचडी पदवी प्रदान

**सोलापूर, दि. २ मे-**

सोलापूर सोशल असोसिएशन आर्टस् अँड कॉमर्स कॉलेजमधील उर्दू रिसर्च सेंटरचे विद्यार्थी संशोधक, प्रसिद्ध उर्दू कवी नया अस्मान या काव्यसंग्रहाचे निर्माते आणि सोलापूर सोशल असोसिएशन उर्दू प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक आसिफ इक्बाल अब्दुल सत्तार शेख यांनी संशोधन मार्गदर्शक प्रा. डॉ. गौसअहमद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी पदवी पूर्ण केली. बालसाहित्याच्या प्रचार आणि प्रसारात गुलबुटे मासिकाच्या योगदानाचा आढावा या विषयावर आपला शोधनिबंध पूर्ण केला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे मानवविद्या शाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. वसंत कोरे यांच्या अध्यक्षतेखाली पीएचडी मौखिक परीक्षा आयोजित करण्यात आली होती. यावेळी इतिहास अभ्यासक सर्फराज अहमद, प्रा. आयेशा पठाण, मुश्ताक गडवाल, शेख मोईज अहमद, इरफान पटेल, आकीद शेख, निखत शेख, तस्किन कलबुर्गी, रेहाना शेख, कुदसिया मनियार, शबाना काझी, रिजवाना प्यारे, फबिहा मुंडेवाडी, जुबेर शेख, मौलाना ए. मनमोह शेख, प्रा तस्लीम वडो, अल्ताफ कुडले, सय्यद शाह वाईज, अली हसन, महंमद मोआज, अब्दुल्ला शेख, अब्दुल रहमान शेख, सफा शेख आदी उपस्थित होते. या यशाबद्दल सोशल कॉलेज संशोधन केंद्रातर्फे सत्कार करुन प्र. प्राचार्य डॉ इ. जा. तांबोळी, डॉ. जैनोद्दीन मुल्ला, डॉ. आस्मा खान, जैनोद्दीन पटेल यांनी शुभेच्छा दिल्या.

## जिल्हा उपनिबंधक कार्यालयातून प्रमाणपत्र तसेच गुणपत्रिका घेऊन जाण्याचे आवाहन

**सोलापूर, दि. २ मे-**

सहकार विभागामार्फत माहे मे २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या जी.डी.सी.न्ड ए. व सी.एच.एम. परिक्षार्थीचे प्रमाणपत्र व गुणपत्रिके सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयाकडून जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर या कार्यालयास प्राप्त झालेले आहेत. तरी संबंधित परिक्षार्थिंनी गुणपत्रिका व प्रमाणपत्र घेणेसाठी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांचे कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय ईमारत, ई ब्लॉक, पहिला मजला, जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधुन प्राप्त करुन घेण्यात यावे असे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, किरण गायकवाड यांनी कळविले आहे.







# पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

महाराष्ट्र राज्याच्या ६६ व्या स्थापना दिनानिमित्त पोलीस परेड ग्राउंड येथे आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण प्रसंगी विविध विभागांतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांना पुरस्कार जाहीर झालेले होते त्या पुरस्काराचे वितरण पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, सोलापूर महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

### विविध विभागातील पुरस्कार्थी असे

**महसूल विभाग :** मोहोळ तालुक्यातील सावळेश्वर येथील ग्राम महसूल अधिकारी सतीश शिवाजी बीजले (आदर्श तलाठी पुरस्कार), प्रज्ञा सतीश मठ, ज्ञानेश्वर रावसाहेब इनामदार, अनिल माळी, अनुसया सदानंद खराडे, श्रीमती उमा भारत जाधव, उमेश सिद्धेश्वर कुंभार, विजया शशिकांत भालुदे, शौकत बोगे (उपविभागीय अधिकारी सोलापूर क्रमांक एक प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे योजना अंतर्गत घरकुलासाठी पात्र लाभार्थ्यांना शासकीय जागा वाटप आदेश गतिमान पद्धतीने प्रदान केल्याबद्दल)

**शहर पोलीस :** पोलीस निरीक्षक संगीता तुळशीदास पाटील, पोलीस उपनिरीक्षक नागनाथ सुधर्म कानडे, मकरंद उद्धव कुलकर्णी, विलास हनुमंत इंगळे, शैलेंद्र भालचंद सातपुते, दिलीप निवृत्ती किर्दक, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सिद्धू विश्वनाथ थोरात, महंमद करणाचे, राजेंद्र मारुती बंडगर, गुरुसिद्धआप्पा महादेव इंगळे, पोलीस हवालदार विजय आनंद पोळ, दीपक सुदाम चव्हाण, दीपक कमलाकर डोके, दादासाहेब हरीकांत सरवदे (महासंचालक यांचे सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र)

**सोलापूर ग्रामीण :** पोलीस उपअधीक्षक भागवत पाटील, पोलीस उपनिरीक्षक विनोद घाटे, सहाय्यक पोलीस उपनिरक्षक चंद्रकांत बाबुराव पवार, पोलीस उपनिरीक्षक सुभाष शंकर शेंडगे, पोलीस हवालदार संतोष सत्यवान गायकवाड, उत्कृष्ट पथसंचालक परेड कमांडर राहुल महादेव मडावी.

**आरोग्य विभाग :** पृथ्वीवर वटे व शुभम बिराजदार यांच्या नातेवाईक. (छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय यांच्याकडून मृत्यू समयी अवयव दान करणारे)

**क्रीडा विभाग :** प्रसाद श्रीहरी खोबरे (जिल्हा युवा पुरस्कार)

### पतंजली योगपीठाचे

## स्वामी आदित्यदेव ६ मेपासून तीन दिवस सोलापूर दौऱ्यावर

**सोलापूर, दि. २ मे-**

हरिद्वार येथील पतंजली योगपीठाचे योगऋषी स्वामी रामदेवबाबा यांचे परमशिष्य स्वामी आदित्यदेव हे सहा मेपासून तीन दिवस सोलापूर दौऱ्यावर येत आहेत, अशी माहिती पतंजली युवा भारतचे मधुकर सुतार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मंगळवार दिनांक ६ मे रोजी दुपारी १ वाजता स्वामी आदित्यदेव यांचे सोलापूर शहरात आगमन होणार आहे.युवा पिढीला भारतीय संस्कृतीचे महत्त्व पटवून देणे, त्याचप्रमाणे भारतीय शिक्षण पध्दतींचा प्रचार व प्रसार करणे, युवा पिढीला व्यसनापासून व मोबाईलच्या अतिवापरापासून लांब ठेवणे, युवा पिढी योगाच्या माध्यमातून आदर्श पिढी निर्माण करण्यासाठी वेगवेगळ्या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी स्वामी आदित्यदेव ३ दिवस सोलापूर शहर व जिल्ह्यात प्रवास करणार आहेत. बुधवार दिनांक ७ मे रोजी पहाटे ५.३० ते ७.३० या वेळेमध्ये शेळगी येथील मातोश्री मंगल कार्यालयाच्या समोरील मैदानात नागरिकांसाठी ते योगशिबीराच्या माध्यमातून योगाचे धडे देतील. त्यानंतर सकाळी १०.३० ते १२.३० या वेळेमध्ये पंढरपूर येथे रखुमाई सभागृह येथे युवकांशी संवाद साधतील. त्याच दिवशी सायंकाळी ठीक ४.३० वाजता मंगळवेढा येथील इंग्लिश स्कुल, बस स्टॉपसमोर यशवंत मैदान विद्यार्थी, युवकांशी व नागरिकांशी संवाद साधतील.

गुरुवार ८ मे रोजी पहाटे ५.३० ते ७.३० या वेळेत शेळगी येथे शिबीर,त्यानंतर १०.३० ते १२.३० लोकमंगल कॉलेज, वडाळा येथील विद्यार्थ्यांशी संवाद साधतील. दुपारी ४ ते ६ यावेळेत दयानंद कॉलेज येथील आर्य समाजाच्या कार्यक्रमामध्ये सहभागी होतील. शुक्रवार, दि. ९ मे रोजी पहाटे ५.३० ते ७.३० योगशिबीर, त्यानंतर भेटीगाठी, पतंजलीच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करुन पुण्याकडे प्रस्थान करतील. पुज्य स्वामी आदित्यदेव हे पतंजली योगपीठ येथील युवा भारत संघटनेचे केंद्रीय प्रभारी म्हणून कार्यरत आहेत. हरिव्दार येथील गुरुकुलामध्ये प्राचार्य म्हणून सेवा देतात. सूर्यनमस्काराबाबत तीन गोल्डन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड पुज्य स्वामींच्या नावावर आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ युवक युवतींनी आवश्य घ्यावा, असे आवाहन सोलापूर जिल्हा पतंजली परिवार व पतंजली परिवाराच्या मुख्य मार्गदर्शिका सुधा आळ्ळीमरे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेला सुरेंद्र पिसे, रघुनंदन भुतडा, बसवराज उंबरजे, नागेश्वर कन्ना, रजनी अवसेकर, शोभा तोरणगी उपस्थित होते.



## मूकबधिर विद्यालयात महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

येथील रोटरी नॉर्थराधाकिशन फोमरा मूक बधिर विद्यालयात महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शंतनु गुंजोटीकर उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापिका क्षितिजा गाताडे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रगीत आणि राज्यगीत सादर करण्यात आले. यावेळी क्लबच्या अध्यक्षा डॉ जानवी माखिजा यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी शाळेतील विशेष शिक्षक गजानन गडगे यांच्या सेवा निवृत्ती निमित्त शाळेचे सचिव सुनील दावडा यांच्या हस्ते शाल पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास आसावरी सराफ, रेणुका पसपुले, संध्या चंदनशिवे, विजया पिताळकर, योगिता बोधले, गजानन गडगे, नागनाथ बसाटे, सोमनाथ ठाकर, दिनेश ताटे, सकलेन बडेखान, आनंद पारेकर, चिदानंद बेनुरे, गंगाधर मदभवी, साहेब गौडा पाटील, अजित पाटील, सोमनाथ थोरात, बाबासाहेब पवार, शबाना शेख उपस्थित होते. आभार शाळेचे सचिव सुनील दावडा यांनी केले तर सूत्रसंचालन अजित पाटील यांनी केले.

## आपत्तीच्या प्रसंगी किशोरवयीन मुला, मुलींना प्राधान्याने सेवा द्यावी : जयेश पटेल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

सोलापूर शहरात मुला मुलींचे लैंगिक आरोग्य व अधिकार याकडे आपत्तीच्या काळात दुर्लक्ष होत असते. अशा वेळी त्यांना आवश्यक त्या सेवा त्वरित उपलब्ध व्हाव्यात. हा त्यांचा मानवी हक्क आहे असे प्रतिपादन रोटरी क्लबचे नियोजित प्रांतपाल तथा इंडियन रेड क्रॉस सोसायटी शाखा सोलापूरचे सचिव जयेश पटेल यांनी केले.



ते फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा संचलित स्प्रिंट फोर ह्युमॅनिटेरियन प्रकल्प, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सोलापूर व इंडियन रेडक्रॉस सोसायटी सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने सरकारी डॉक्टर, परिचारिका, युवा प्रतिनिधी व स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींकरिता एडोलोसंट सेक्श्युअल हेल्थ राईट्स इन इमर्जन्सीज या विषयावरील दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अधिकारी शक्तीसागर ढोले, इंडियन रेड क्रॉस सोसायटी सोलापूर शाखेचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान, अक्कलकोट पंचायत समिती आरोग्य विभाग विस्तार अधिकारी महेश भोरे, डॉ. गौरी कहाते, युवा प्रतिनिधी साक्षी सर्वगोड, सुगतरत्न गायकवाड आदी होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते. अध्यक्षीय समारोप करताना डॉ. येळेगावकर यांनी केले. याप्रसंगी सुगतरत्न गायकवाड व वीरेंद्र परदेशी SHRiE या सत्रातील इतर विषयांवर मार्गदर्शन केले. प्रारंभी डॉ. गौरी कहाते यांनी स्वागत केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार मनीषा चव्हाण यांनी मानले.

## अंतिम संस्कारासाठी लाकडाऐवजी गोवऱ्या वापरा

### गोशाळा चालकांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ मे-**

ग्रीन क्रेडीट प्रोग्राम अंमलबजावणी नियम २०२३ अंतर्गत कार्बन क्रेडीट कार्यक्रम सोलापूर शहर व जिल्ह्यांतर्गत असणाऱ्या गोशाळा चालकांना आर्थिक सहाय्य मिळावे यासाठी सोलापूर महानगरपालिका अंतर्गत असलेल्या स्मशानभूमीच्या दर्शनी भागामध्ये गोवऱ्या विक्रीस उपलब्ध करून देणाऱ्या गोशाळेशी संपर्क साधून अंतिम संस्कारासाठी लाकडांऐवजी गोवऱ्यांचा वापर करावा, असे आवाहन गोशाळा चालकांनी केले आहे. दरम्यान, यासाठी सोलापूर महापालिकेलासुध्दा त्यांनी पत्रव्यवहार केला आहे.



विविध गुन्हयात जप्त केलेली जनावरे गोशाळामधे दाखल केली जातात; गोवंशाचा ओघ मोठ्या प्रमाणावर गोशाळांकडे वाढला असून गोशाळांना आर्थिक ताण मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. सदरची जनावरे संपूर्ण भाकड असतात. या गोमातेचे रक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे असून जिक्रीचे बनले आहे. महाराष्ट्र शासन महाराष्ट्र प्राणी कल्याण कायदा संनियंत्रण समिती व जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंध समिती सदस्य केतन शहा यांच्या पुढाकाराने गोशाळेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर देशी राज्यगोमाताचे गोकाष्ट व देशी गोवरी विक्रीसाठी उत्पादन सुरु केले आहे.

Classifieds

**नोकरीविषयक**

सिक्युरिटी गार्ड भरती चालू आहे. महिला व पुरुष ८ व १२ तासासाठी सोलापूर शहर व ग्रामीणमध्ये
संपर्क : ९८५०७०२१७०

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**IDFC FIRST Bank Limited**
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)
CIN : L65110TN2014PLC097792
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (यापूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड हे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)** कडून खाली नमूद केलेले सुरक्षित कर्ज घेतले. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी)** यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 106570950 | मालमत्तेवर कर्ज | १. शरद महादेव शिंदे<br>२. विद्या शरद शिंदे | 05/04/2025 | रुपये 5,45,818.88/- |
| **मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायतीचा संपूर्ण तुकडा आणि पार्सल मिळकत क्रमांक ३३४ब, एकूण क्षेत्रफळ ६९८ चौरस फूट ग्रामपंचायतीच्या हद्दीत स्थित : नारी, उपविभाग : बार्शी, विभाग : सोलापूर, महाराष्ट्र-४१३४०४, आणि **पूर्वेकडील सीमा :** भाऊ शिंदे, **पश्चिम :** विष्णू कदम, **उत्तर :** ग्रामपंचायत रस्ता, **दक्षिण :** अरुण बडाले. | | | | | |

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**

**दिनांक : ०३/०५/२०२५**
**ठिकाण : सोलापूर**

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगर पालिका हद्दवाढ भागातील कसबे सोलापूर येथील हैद्राबाद रोड वरील पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ यांचे जुळे सोलापूर भाग-२, विडी घरकुल योजनेतील जे ग्रुप मधील घरकुल गाळे नं. २८३४ याचे क्षेत्र ४९.५० चौ. मीटर व त्यावर या मंडळाकडून बांधून देण्यात आलेले लोडबेअरींग बांधकाम क्षेत्र १८ चौ. मीटर इतकी आहे. यासी चतुःसीमा :-पूर्वेस : गाळा नं.२८३३, दक्षिणेस : ६.० मी. रुंद रस्ता, पश्चिमेस : गाळा नं.३८३५, उत्तरेस : गाळा नं.२८२५.

येणेप्रमाणे चतुःसीमेतील घरकुल गाळा, त्यातील तदंगभुत वस्तूंसह, सोयी सुविधांसह, मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्कासह. ही मिळकत घरकुल गाळे विठाबाई नारायण जालगी, रा.२८३४, विडी घरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची असून त्यांचेकडून ही मिळकत आमचे अशिल हे खरेदीने घेणार आहेत. तरीही वर नमूद मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून दोन दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपूर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल ठरल्यानुसार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि. ०२/०५/२०२५

**सही/-**
**अशिलातर्फे ॲड. राजरतन द. श्रीराम**
**ऑ. १६२१/१/१, कुचन नगर, सोलापूर-५**
**मो.नं. ९८८१२४०५१६**

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :** डि व सब डी सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ भागातील प्रताप नगर येथील गट नं. १३/१ यांसी क्षेत्र ८१५५.११ चौ.मी. यापैकी क्षेत्र २२६५.00 चौ.मी. इतके असून यावर बांधण्यात आलेल्या प्रकृती बिल्डींग अपार्टमेंट मधील दुसऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. २०९ यांसी क्षेत्र ३७.४८ चौ.मी. असून यांसी चतुः सिमा : पूर्वेस- कॉमन पॅसेज, पश्चिमेस बिल्डींग साईड मार्जिन, दक्षिणेस बिल्डींग रेअर मार्जिन, उत्तरेस ओपन डक्ट/फ्लॅट नं. २१० वर नमूद केलेली फ्लॅटजागा त्यातील स्वतंत्र व सामाईक वहिवाटीच्या हक्कासह व इतर तदंगभूत वस्तुंसह. वर नमुद फ्लॅटजागा हि **सौ. विजयालक्ष्मी महेश कुर्ले आणि श्री. महेश बसवराज कुर्ले** यांचे मालकीची आहे. त्यांनी वर नमुद फ्लॅटजागा आमचे अशिल **श्री. आदित्य शशांक शहा** यांना विक्री करण्याचे ठरवून इसारापोटी रक्कम स्विकारुन तशी इसारापावती लिहून दिलेली आहे. तसेच सदरील मिळकत हि निर्वेध व निजोखमी असल्याचे खात्री व हमी आमचे अशिलांस दिलेली आहे. तरी वर नमुद मिळकतीवर कोणाचाही, कसल्याही प्रकारचे गहाण, दान, लिज, भाडे, लिव्ह ॲण्ड लायसन्स, बक्षीस, साठेखत पोटगी, टाच, जप्ती (right of intrest) व इतर कोणत्याही स्वरुपाचा बोजा, हक्क, हितसंबध असल्यास अथवा सदर मिळकती संबंधी कोणाचेही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाले पासून सात (७) पासून दिवसाचे आत खालील पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत घ्यावी, कोणाचेही, कसलीही तक्रार व हरकत न आल्यास ते सदरची मिळकत हि संपूर्ण निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे असे गृहित धरुन आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. तद्नंतर कोणाचेही हरकत आल्यास ते आमचे अशिलांवर व सदर मिळकती वर बंधनकारक राहणार नाही. ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली दि. ०२/०५/२०२५.

**सही/-**
**मीरा कैलाश प्रसाद (ॲडव्होकेट) बी.ए., एल.एल.बी.,**
**पत्ता - फ्लॅट नं. १०२, निर्माण गॅलेक्सी अपार्टमेंट,**
**नविन आर.टी.ओ. ऑफिस रोड, महालक्ष्मी नगर,**
**चौडेश्वरी मंदीराजवळ, विजापूर रोड, सोलापूर**
**मो. नं. ९०२८८३२४५५**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**अशिल- श्री. आदित्य शशांक शहा**

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### दुखापतग्रस्त पुथूरच्या जागी मुंबई इंडियन्समध्ये रघु शर्मा

**मुंबई** : दुखापतीमुळे टाटा इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२५ च्या उर्वरित सामन्यातून बाहेर पडलेल्या विघ्नेश पुथूरच्या जागी मुंबई इंडियन्सने लेग-स्पिनर रघु शर्माला करारबद्ध केले आहे.



११ मार्च १९९३ रोजी पंजाबमधील जालंधर येथे जन्मलेला रघु शर्मा हा उजव्या हाताचा लेग-ब्रेक गोलंदाज आहे. त्याने स्थानिक क्रिकेटमध्ये पंजाब आणि पुडुचेरीचे प्रतिनिधित्व केले आहे. ११ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये शर्माने १९.५९ च्या सरासरीने ५७ बळी टिपले आहेत, यात ५६ धावांत ७ बळी अशी त्याची सर्वोत्तम गोलंदाजी आकडेवारी आहे. लिस्ट ए क्रिकेटमध्ये त्याने ९ सामन्यांमध्ये १४ बळी टिपले आहेत, यात ३७ धावांत ४ बळी अशी सर्वोत्तम कामगिरी आहे. त्याने ३ टी-२० सामन्यांमध्येही ३ बळींची नोंद केली आहे. आयपीएलमध्ये शर्माचा हा पहिलाच कारकिर्द आहे. तो आरएपीपी यादीतून ३० लाख रुपयांच्या मूळ किमतीवर मुंबई इंडियन्समध्ये सहभागी झाला होता.

### सोलापुरात चार ठिकाणी बुद्धिबळ प्रशिक्षण शिबिर ५ मे पासून

**सोलापूर, दि. २ मे -**

सोलापूर चेस अॅकॅडमीच्या वतीने सोलापुरात ५ ते १० मे दरम्यान सकाळी ९ ते ११ व सायं. ५ ते ७ या वेळेत जुळे सोलापुर, एम्प्लोयमेंट चौक, अशोक चौक व बाळीवेस अशा शहरातील विविध ठिकाणी बुद्धिबळ प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. राज्य व राष्ट्रीय खेळाडूंसाठी तसेच चार वर्षापासून पंधरा वर्षापर्यंतचे नवोदित व उदयोन्मुख खेळाडूंकरिता शिबीर होणार आहे. शिबिरात सहभागी होणाऱ्या खेळाडूंसाठी स्पर्धेत प्रथम येणाऱ्या तीन खेळाडूंना आकर्षक मेडल देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी खेळाडूंनी अॅकॅडमीचे मुख्य व राष्ट्रीय प्रशिक्षक सुमुख गायकवाड (मो. क्र. ८८३०४३२१८४) व उदय वगरे (मो. क्र. ८८८८०४५३४४) यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते-पाटील व अॅकॅडमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर यांनी केले आहे.

### सुवर्ण स्पोर्टस् अकादमीचे विविध खेळांचे प्रशिक्षण शिबिर सुरू

**सोलापूर, दि. २ मे-**

येथील सुवर्ण स्पोर्टस् अॅकॅडमीच्या वतीने १ मे पासून रूपाभवानी मंदिर , भवानी पेठ येथील अॅकॅडमीच्या मैदानावर विविध खेळांचे उन्हाळी क्रीडा शिबिर आयोजित केले आहे. ४ ते १९ वयोवर्ष गटातील मुला/मुलीं करिता सकाळी ७.३० ते ९.०० व सायंकाळी ०५. ते ७.०० या वेळेत हे क्रीडा शिबिर २० दिवसांचे असून या मध्ये प्रामुख्याने फिजिकल फिटनेस, सूर्यनमस्कार, योगासन, रोप क्लाइंबिंग, लाठी काठी, दांडपट्टा या सारख्या शारीरिक उपयुक्त असे व्यायाम प्रकाराचे आधुनिक व तांत्रिक प्रशिक्षण तज्ञ प्रशिक्षकांकडून मिळणार असून, क्रिकेट, टेनिक्काईट, चेस, बॉल बॅडमिंटन, थलेटिक्स, कॅरम, सायकलिंग सह. इतर अनेक मैदानी खेळांचे आधुनिक व तांत्रिक पद्धतीचे कोचिंग तसेच विविध मनोरंजनात्मक खेळांचे सहभागी खेळाडूंना प्रशिक्षण मिळणार आहे. इच्छुकांनी अॅकॅडमीच्या मैदानावर प्रमुख योगेश इंडी यांच्याशी ९९२२१५६११५ अथवा ७९७२७९११५१ संपर्क करावा, असे अॅकॅडमीचे संस्थापक चन्नेश इंडी यांनी कळविले आहे.

### पार्थ पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आंबे येथे क्रिकेट स्पर्धा आजपासून

**करकंब, दि.२ मे-**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवानेते पार्थ अजित पवार यांच्या ३५ व्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस पंढरपूर शहर व तालुका यांच्यावतीने मौजे आंबे ता.पंढरपूर येथे ३ व ४ मे रोजी भव्य हाफ पिच टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धांचे स्पर्धेचे आयोजन केले आहे. या क्रिकेट स्पर्धांचे उद्घाटन राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष समाधान काळे, चंद्रभागा सहकारी साखर कारखान्याचे संचालक आण्णामामा शिंदे यांच्या हस्ते तर मोहोळचे माजी आमदार यशवंत माने आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रांतिक सदस्य कल्याण काळे यांच्या उपस्थितीत हस्ते ४ मे रोजी सायं ६ वा.बक्षीस वितरण समारंभ संपन्न होणार आहे, असे आवाहन राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष साहिल शेख यांनी कळविले आहे.

# चेन्नईला विजयाची अपेक्षा

## कोहली-धोनी यांच्यात भावनिक सामना ● प्ले-ऑफच्या शर्यतीत बंगळुरू आघाडीवर

◆ **बंगळुरू, २ मे**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात शनिवारी एम. चिन्नास्वामी स्टेडियम येथे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि चेन्नई सुपर किंग्ज (सीएसके) यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. विराट कोहली व महेंद्र सिंह धोनी या दोन दिग्गजांना एकमेकांविरुद्ध आपला अखेरचा साखळी सामना खेळताना बघण्याची संधी मिळणार आहे. आरबीसी प्लेऑफच्या शर्यतीत आघाडीवर आहे, परंतु सीएसकेला मनोबल उंचावणाऱ्या विजयाची आवश्यकता आहे.

सध्या आयपीएल गुणतालिकेत मुंबई इंडियन्स व आरसीबीचे प्रत्येकी १४ गुण असून सरस धावगतीच्या आधारावर आरसीबी दुसऱ्या स्थानावर आहे. पंजाब (१३) तिसऱ्या, तर प्रत्येकी १२ गुण असणारे गुजरात टायटन्स व दिल्ली कॅपिटल्स अनुक्रमे चौथ्या व पाचव्या स्थानावर आहेत.

चेन्नईने मात्र १० सामन्यांपैकी केवळ २ सामने जिंकले व ८ सामने गमावले. चेन्नई केवळ ४ गुणांसह दहा संघांच्या गुणतालिकेत एकदम तळाशी आहे.





राजस्थान व गत वर्षीचा उपविजेता हैदराबादचे प्रत्येकी ६ गुण असून ते अनुक्रमे आठव्या व नवव्या स्थानावर आहेत. गत वर्षीचा विजेता कोलकाता नाईट रायडर्स ९ गुणांसह सातव्या स्थानावर आहे.

आरसीबीने सीएसकेविरुद्ध विजय नोंदवल्यास त्यांची गुणसंख्या १६ पर्यंत वाढू शकते. ही एक अशी स्थिती जिथून ते पात्रता फेरीच्या शर्यतीत तीन सामने शिल्लक असताना डगमगू शकत नाहीत.

आधी प्ले-ऑफच्या शर्यतीतून बाहेर झालेला सीएसके विजयी झाल्यास त्यांना गुणतालिकेत मध्यभागी दिलासादायक स्थान मिळू शकते, जेणेकरून पाच वेळच्या विजेत्या सीएसके आपली बदनामी टाळू शकतात.

या प्रत्येक ध्येयाचा जवळचा संबंध कोहली व धोनीच्या स्वरूपाशी आहे. हे दोघेही भारतीय क्रिकेटमधील सर्वात तेजस्वी व्यक्तिमत्व आहे. पण चिन्नास्वामी स्टेडियमवर ते एकमेकांविरुद्ध पूर्ण ताकदीने खेळतील. कोहलीने गत पाच डावात चार अर्धशतके झळकावून आणि ऑरेंज कॅपसाठी ४४३ धावा केल्या. विराट आरसीबीला प्ले-ऑफ स्थानाच्या जवळ पोहोचण्यास मदत करण्यासाठी आणखी एक छोटासा शैलीदार खेळ करण्यास उत्सुक असेल. देवदत्त पडिक्कलने तिसऱ्या क्रमांकावर त्याला भक्कम पाठिंबा दिल्यास आनंद होईल. देवदत्तने आपल्या शेवटच्या दोन डावात दोन अर्धशतके झळकावली. पण कोहलीला त्याचा सलामीचा जोडीदार फिल सॉल्टकडून अधिक योगदान मिळावे अशी अपेक्षा असेल. आरसीबी कर्णधार रजत पाटीदारला आयपीएलच्या सुरुवातीच्या काळात त्याचा स्मूथ-हिटिंग फॉर्म परत मिळवताना पाहण्यास उत्सुक असेल. तथापि, तो वेगवान गोलंदाज खलील अहमद व फिरकी गोलंदाज नूर अहमद वगळता कमी दर्जाच्या सीएसके गोलंदाजी विभागाचा फायदा घेण्याचा विचार करू शकतो. आयुष म्हात्रे, सॅम करन, देवाल्ड ब्रेव्हिस आणि शिवम दुबे सारखे फलंदाज धोनीला डावाच्या शेवटी आपले काम करण्यासाठी मदत करतील अशी चेन्नई सुपर किंग्जला आशा आहे. (वृत्तसंस्था)

### आजचा सामना

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु वि. चेन्नई सुपर किंग्ज**
**स्थळ** : एम. चिन्नास्वामी स्टेडियम, बंगळुरू
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# मुंबई इंडियन्सची जोरदार मुसंडी

## सलग सहाव्या विजयासह अव्वल स्थानी झेप

### कर्ण शर्मा, ट्रेंट बोल्टची प्रभावी गोलंदाजी

### राजस्थान रॉयल्सवर १०० धावांनी विजय

◆ **जयपूर, २ मे**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामाच्या प्रारंभी पराभवांचा सामना करणाऱ्या मुंबई इंडियन्सने अलीकडे जोरदार मुसंडी मारत सलग सहावा विजय नोंदवत गुणतालिकेत अव्वल स्थानावर झेप मारली. मुंबईने राजस्थानवर १०० धावांनी विजय नोंदवला. गुरुवारी रियान रिक्लेटन (६१) व रोहित शर्माच्या (५३) अर्धशतकांसह सूर्यकुमार यादव (नाबाद ४८) व कर्णधार हार्दिक पांड्याच्या (नाबाद ४८) दमदार फलंदाजीच्या जोरावर २ बाद २१७ धावा उभारल्यानंतर मुंबईने राजस्थान रॉयल्सला १६.१ षटकांत ११७ धावांवर गुंडाळले. २०१२ नंतर मुंबई इंडियन्सने पहिल्यांदाच जयपूरमध्ये राजस्थान रॉयल्सला पराभूत केले. रिक्लेटन सामनावीर ठरला.



रियान रिक्लेटनची तडाखेबंद फलंदाजी

विजयाच्या मोठ्या फरकामुळे मुंबईचा नेट रन रेट १.२७४ झाला आहे. हा नेट रन रेट सर्व संघांमध्ये सर्वोत्तम आहे. दुसरीकडे, या पराभवामुळे राजस्थान रॉयल्स आता आयपीएल २०२५ मधून बाहेर झाला आहे.

गत सामन्यात ३५ चेंडूत शतक ठोकणारा युवा खेळाडू वैभव सूर्यवंशी व वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह यांची जुगलबंदी रंगणार असे वाटत असताना दीपक चहरने वैभवला आपल्या फिरकीच्या जाळ्यात ओढले. वैभवने दोन चेंडूत शून्य धावा काढल्या.

यशस्वी जयस्वालने ट्रेंट बोल्टला दोन षट्कार मारले, परंतु त्याच षटकात जयस्वाल बाद झाला. नितीश राणा, रियान पराग, शिमरॉन हेटमायर, शुभम दुबे, ध्रुव जुरेल व जोफ्रा आर्चर हे सुद्धा राजस्थानला विजय मिळवून देण्यास असमर्थ ठरले. (वृत्तसंस्था)



# मास्टर्स व एनजीसीए अकादमीची विजयी सलामी

## उदगीरी चषक १४ वर्षांखालील क्रिकेट : बोमरा, कांबळे सामन्याचे मानकरी

**सोलापूर, दि. २ मे-**

उदगीरी चषक १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत मास्टर्स व एनजीसीए क्रिकेट अकादमीने विजयी सलामी दिली. रणबीरसिंह बोमरा हुच्चेश्वर कांबळे सामन्याचा मानकरी ठरले.

मास्टर्स अकादमी आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा क्रिकेट संघटना निवड समिती अध्यक्ष राजेंद्र गोटे यांनी केले. यावेळी डॉ. हर्षद वागज, राकेश उदगिरी, चंद्रशेखर उदगिरी, सुमित अंकाराम, श्री.हिरापुरे, निलेश डागा, स्नेहल वडेराव, राजेश येमुल व दत्तात्रय बडगू आदी उपस्थित होते. सलामीच्या सामन्यात एनजीसीए संघाने उस्मानाबादवर १५४ धावांनी विजय मिळविला. दुसऱ्या सामन्यात मास्टर्स संघाने विहान अकादमीवर १ गडी राखून मात केली.

**संक्षिप्त धावफलक : एनजीसीए** :३० षटकात ५ बाद २३९ (रणबीर सिंह बोमरा ८७, रूगवेद पाटीलने ३८, सरवेश गाडे २-३०) वि. वि. **उस्मानाबाद** : २५.४ षटकात ८५ ( अनूज वाल्मिकीने ४-१९ ).

**विहान अकादमी** : ३० षटकात १५५ (राजवीर हिरेहब्बू ५२) पराभूत विरुद्ध **मास्टर्स संघ** : ९ बाद १५८ धावा (उच्चेश्वर कांबळेने ५२).

# सोलापूरच्या ‘रुद्र’ ला पाच सुवर्ण, एक रौप्य व दोन कास्य पदके

## राज्य कलरीपयत स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

नांदेड येथील गुरु गोविंद सिंह स्टेडियम मध्ये झालेल्या तिस-या महाराष्ट्र राज्य कलरीपयत स्पर्धेत सोलापुर शहरातील रुद्र ऑकॅडमी ऑफ मार्शल आर्टस व योग संस्थेच्या कलरीपटूंनी पाच सुवर्ण, एक रौप्य व दोन कास्य पदके जिंकून राज्य संघात स्थान मिळवले.

कलरीपयत असोसिएशन सोलापूर तर्फे सहभागी झालेल्या वरिष्ठ मुले गटात समिहान कुलकर्णी याने कायपोरु (ओपन हँड फाईट) व हाय कीक या दोन्ही प्रकारात तर वरिष्ठ मुलींच्या गटात संस्कृती देशपांडे हिने कायपोरु प्रकारात सुवर्णपदके पटकावली. कनिष्ठ मुले गटात संस्कार कदमने हाय कीक प्रकारात तर कनिष्ठ मुली गटात वैष्णवी नरोटे हिने चुवाडक्कल (काल्पनिक आक्रमण - प्रतिक्रमण रचना ) प्रकारात सुवर्णपदकांची कमाई केली.

कनिष्ठ मुले गटात हृषिकेश डोके याने रौप्य तसेच कनिष्ठ मुले गटात चुवाडक्कल प्रकारात अंश सोलसकर व कनिष्ठ मुली गटात मृणाल महामुरे यांनी कास्य पदके मिळवली. अपूर्वा व अभिराम कुलकर्णी यांना उत्तेजनार्थ बक्षिस देण्यात आले.

सर्व विजेते ३० मे ते २ जून पर्यंत त्रिवेंद्रम येथे होणा-या राष्ट्रीय कलरीपयत स्पर्धेत निलेश वाळिंबे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा प्रमुख दशरथ काळे यांच्या सहकार्याने सहभागी होतील. सर्व यशस्वींना भुवनेश्वरी व मिहिर सुरेश जाधव यांचेकडून प्रशिक्षण, आकाश झळकेनवरु यांचे समन्वयन व रुद्र संचालिका संगीता सुरेश जाधव यांचे मार्गदर्शन लाभले आहे.



### अनुष्का पल्लीची खेलो इंडिया युथ गेमसाठी निवड

बिहार येथे होणा-या खेलो इंडिया युथ गेम्स साठी रुद्र ची ‘‘अनुष्का पल्ली‘‘ ही कलरीपटू कनिष्ठ मुलींच्या गटात ‘‘हाय कीक‘‘ प्रकारात महाराष्ट्र राज्य संघाचे प्रतिनिधित्व करेल.

# पदम-कर्णिक नगर बास्केटबॉल संघाचा वर्धापन दिन उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

पदमनगर-कर्णिक नगर बास्केटबॉल संघाचा १६ वा वर्धापन दिन गुरुवारी १ मे संध्याकाळी ६.३० वाजता दैनिक तरुण भारतचे वृत्तसंपादक अजितकुमार संगवे, सेंट जोसेफ हायस्कूलचे सेवानिवृत्त क्रीडाशिक्षक राजेंद्र गोटे सुयश गुरुकुलचे श्री खांडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. कर्णिक भागातील सामाजिक कार्यकर्ते सुशील नाटकर, डी. आर श्रीराम इंग्लीश स्कूलचे श्री परांडकर, पालक प्रतिनीधी अश्वीन येदूर, श्रीधर ताटीपामूल, विशाल बनसोडे, प्रशिक्षक श्रीधर गायकवाड हे उपस्थित होते.

यावेळी बीबीदारफळचे मुख्याध्यापक श्रीशैल गुरव यांना राष्टीय स्तरावरील आदर्श मुख्याध्यापकाचा पुरस्कार गोवा येथे मिळाल्याबददल सत्कार करण्यात आला. त्यानंतर वर्धापन दिनाचा केक मान्यवरांच्या व बास्केटबॉल संघातील ज्युनिअर खेळांडूच्या उपस्थीतीत कापण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद वल्लाकाटी यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशीक्षक प्रबुध्द चिंचोलीकर, अंजली वल्लाकाटी, तेजश्री मसरे, श्रीधर ताटीपामूल, विशाल बनसोडे यांनी परीश्रम घेतले.

# बार्शीची सोलापूर स्पोर्टस्वर मात

▶▶ रेल्वेची ७८वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा
▶▶ भगवंत अदलिंगे सामन्याचा मानकरी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिट्युटचा ७८व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेतील अ गटाच्या सामन्यात शुक्रवारी बार्शीच्या बीटीसीए संघाने सोलापर स्पोर्टस्चा ५ गडी राखून पराभव केला.

येथील रेल्वे मैदानवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेत प्रथम फलंदाजी करणाऱ्या सोलापूर स्पोर्टस्चा डाव बार्शीने १०७ धावांत गुंडाळला. विजयी १०८ धावांचे लक्ष्य बार्शीने ५ गडी गमावित गाठले. नाबाद ४३ धावा व १ बळी टिपणारा भगवंत अदलिंगे सामन्याचा मानकरी ठरला. पीडब्लूआय अधिकारी महिंद्रकर यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. प्रत्येक सामनावीरचे पुरस्कार सुदेश व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहेत. पंच म्हणून दयानंद नवले व नितीन गायकवाड तर गुणलेखक म्हणून सचिन गायकवाड यांनी काम पाहिले.

### संक्षिप्त धावफलक

**सोलापूर स्पोर्टस्** : २९ षटकांत सर्व बाद १०७ (निखिल दोरनाल ३३, समर्थ दोरनाल १५, विवेक दुगम ३ बळी, अमर शेंडगे व पार्थ लोंढे प्रत्येकी २ बळी, सचिन घाडगे, भगवंत आदलिंगे, रेहान शेख प्रत्येकी १ बळी) पराभूत विरुद्ध **बीटीसीए बार्शी** : २६.२ षटकांत ५ बाद १०९ (भगवंत आदलिंगे नाबाद ४३, प्रतीक चव्हाण १८, प्रणव ठोंगे १४ धावा, निखिल दोरनाल ३ बळी, साई इराबत्ती १



# राज्य शालेय युनिफाईट स्पर्धेत सोलापूर शहर व जिल्ह्याला 13 पदके

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

राज्यस्तर शालेय युनिफाईट स्पर्धेमध्ये सोलापूर शहर व जिल्ह्यातील खेळाडूंनी तेरा पदकांची कमाई केली

जिल्हा क्रीडा कार्यालय, युनिफाईट वेल्फेअर असोसिएशन सोलापूर व महाराष्ट्र युनिफाईट वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने राजवैभव सांस्कृतिक भवन, नातेपुते (ता. माळशिरस) येथे झालेल्या या स्पर्धेतील विजयी खेळाडूंना मुख्य प्रशिक्षक भीमराव बाळगे, इकबाल शेख यांचे मार्गदर्शन लाभले. संघ प्रशिक्षक म्हणून मनोज बाळगे व संघ व्यवस्थापक प्राची जोगदांडे यांनी काम पाहिले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी राज्य युनिफाईट अध्यक्ष संतोष खंदारे, राज्य सचिव मंदार पनवेलकर, स्पर्धा संयोजक मनोज राऊत व तालुका क्रीडाधिकारी सुप्रिया गाढवे यांनी परिश्रम घेतले.

विजयी खेळाडूंचे जिल्हा किकबॉक्सिंग संघटनेचे अध्यक्ष महादेव चाकोते,जिल्हा युनिफाईट वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष महेश इंगळे, राज्य किकबॉक्सिंग उपाध्यक्ष मनीष सुरवसे, जिल्हा शिकाई अध्यक्ष मुकुंदराव जाधव व शिवकुमार पाटील यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

### कामगिरी केलेले खेळाडू -

**सुवर्ण** : १९ वर्षाखालील मुली : ४१ किलो- नक्षत्रश्र भोसले, ५६ किलो- श्रावणी डांगे (दोघी सिद्धेश्वर कन्या प्रशाला), ५० किलो- संस्कृती अंजीखाने, ५३ किलो- पौर्णिमा पुजारी (दोघी संगमेश्वर महाविद्यालय), मुले : ५० किलो- श्रावण वालीकर, ५३ किलो- संगमेश्वर शिरोळकर (दोघे संगमेश्वर महाविद्यालय).

**रौप्य** : १९ वर्षाखालील मुली : ३८ किलो- संस्कृती सातपुते, ५६ किलो- जिक्रा शेख (दोघी सिद्धेश्वर कन्या प्रशाला). १७ वर्षाखालील मुली : ३३ किलो- मानसी टंगसाळी, ३६ किलो- ऋतुजा भास्कर, ३९ किलो- तपस्या सारंगमठ, ५१ किलो- श्रावणी लामजणे (सर्व सिद्धेश्वर कन्या प्रशाला), ४५ किलो- मधीन बसरी (हिंदुस्थान स्कूल)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्वाचे...



### बोलेरो जीपसह अवैध दारूचे बॉक्स जप्त; सांगोला पोलिसांची कामगिरी

**सांगोला, दि. २ मे-**

बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार सांगोला पोलीस ठाणेकडील डी.बी.पथकाने दोन ठिकाणी केलेल्या कारवाईत एक बोलेरो जीपसह अवैध दारूचे बॉक्स जप्त करण्यात आले असल्याची माहिती सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी दिली. सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांना दि.३० एप्रिल रोजी बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार सांगोला पोलीस ठाण्याकडील डी.बी.पथकाने पहिल्या कारवाईत सांगोला शहरालगत असलेल्या पंढरपूर ते सांगोला रोडवरील नॅशनल हायवे क्र.१६६ च्या ब्रिजखाली रोडच्या बाजूला प्रकाश चुडाप्पा शिंदे, वय-४३, रा.मेडशिंगी, ता.सांगोला यास १ लाख ७२ हजार ७५४ रुपयांचे देशी विदेशी कंपनीची अवैद्य दारुचे बॉक्ससह ४ लाख ५० हजार पांढ-या रंगाची एक बोलेरो जीप असा एकूण ६ लाख २२ हजार ७५४ रुपयाचा मुद्देमाल पंचासमक्ष आरोपीसह ताब्यात घेतला. दुसऱ्या कारवाईत नाझरा येथील भाळेवाडी येथे पत्राशेड मध्ये सतिश सदाशिव आदट, वय-४३, रा.नाझरा, ता.सांगोला यास २ लाख ५८ हजार ७२० रुपयांचे देशी विदेशी कंपनीचे अवैद्य दारुचे ७७ बॉक्स पंचासमक्ष आरोपीसह ताब्यात घेतला. सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, मंगळवेढा उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड यांचे मार्गदर्शनाखालील सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे, पोसई.हणमंत हिप्परकर, पोकॉ.सद्दाम नदाफ, पोकॉ. धुळदेव चोरमुले यांनी केली आहे. सदाम नदाफ यांनी सरकार तर्फे कायदेशीर फिर्याद दाखल केली आहे. पुढील तपास हणमंत हिप्परकर करीत आहेत.



### महाराष्ट्र दिनानिमित्त प्रचंडे प्रशालेत ध्वजारोहण

**अक्कलकोट, दि. २ मे-**

नागणसूर (ता.अक्कलकोट) येथील प्रचंडे प्रशालेत महाराष्ट्र दिनानिमित्त प्राचार्य शंकर व्हनमाने यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. प्रा.ईरण्णा धानशेट्टी, प्रा. अनिल इंगळे यांनी प्रतिमापूजन केले. अध्यक्षस्थानी सुनिता आलूरकर होत्या. प्राचार्य व्हनमाने, आलूरकर व प्रा. चिदानंद मठपती यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. प्रशांत नागूरे, शरणप्पा मणूरे, बसवराज कोळी, सूर्यकांत कडबगांवकर, बसवराज धानशेट्टी, सोमशेखर कळसगोंडा, अजय पाटील, थावरू चव्हाण, चनवीर कल्याण, वृषाली जगताप, प्रीती प्रचंडे, प्रमिला विभुते, शिक्षिका प्रचंडे, सागर पोद्दार, माणिक किणगी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन विश्वनाथ वाघमोडे पाटील यांनी केले तर संजय गंगदे यांनी आभार मानले.

### टिपरे यांचा गुणवंत तांत्रिक पुरस्काराने सन्मान

**पिलीव, दि. २ मे-**

महावितरण पिलीव शाखा कार्यालयातील कर्मचारी वैभव नारायण टिपरे यांना बारामती परिमंडळ चे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांच्या हस्ते गुणवंत तांत्रिक कर्मचारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त महावितरण बारामती परिमंडळातील कर्मचाऱ्यांना २०२४-२५ वर्षात केलेल्या कामगिरीचा गौरव म्हणून गुणवंत तांत्रिक पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन बारामती येथे करण्यात आले होते .यामध्ये अकलूज विभागातील शाखा कार्यालयाचे तंत्रज्ञ वैभव टिपरे यांना गुणवंत तांत्रिक पुरस्कार देण्यात आला. याबद्दल अकलूज विभागाचे कार्यकारी अभियंता अण्णासाहेब काळे, वेळापूरचे प्र. उपकार्यकारी अभियंता संदीप डोळे व पिलीव शाखा कार्यालयाचे सहाय्यक अभियंता प्रदीप थोरात यांनी अभिनंदन केले.



## निधन वृत्त...

### तहेलील बेगम खतीब



**सोलापूर, दि. २ मे-**

दक्षिण कसबा येथील रहिवाशी तहेलील बेगम खतीब हज्जन (वय ८५) यांचे निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, मुलगी, जावई, सून, नातवंडे असा परविार आहे. सोमपा सेवक अनवर हुसेन खतीब यांच्या त्या मातोश्री होत.

### सिंधू क्षीरसागर



**वैराग, दि. २ मे-**

श्रीमती सिंधू मारुती क्षीरसागर (वय ७८ वर्ष) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्या पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळातून मुख्याध्यापिका म्हणून सेवानिवृत्त झाल्या होत्या. कमलाकर क्षीरसगर यांच्या त्या आत्या होत्या.

### निर्मलाबाई कुलकर्णी



**अकलूज, दि. २ मे-**

अकलूज येथील ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते, शिवसेना नेते प्रमोद कुलकर्णी यांच्या मातोश्री श्रीमती निर्मलाबाई दिनकरराव कुलकर्णी यांचे आज वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ८७ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना नातवंडे व पतवंडे असा परिवार आहे.

### कमलबाई लोखंडे



**सोलापूर, दि. २ मे-**

विजापूर रोडवरील पापाराम नगर येथील जैन कासार समाजातील कमलबाई वसंतराव लोखंडे (वय ८०) यांचे निधन झाले. त्यांच्यावर पाटकुल येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे त्या जिल्हा परिषद उत्तर सोलापूर मधील सीमा लोखंडे यांच्या मातोश्री होत्या.

# सामाजिक बांधिलकीतून मंदिर परिसरात स्वच्छता मोहिम

## जेऊरवाडीच्या योद्धा करिअर अॅकॅडमीचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२ मे-**

चिखलठाण (ता. करमाळा) कोटलिंग यात्रेनंतर अस्वच्छ झालेल्या कोटलींग मंदीर परिसराची जेऊरवाडी येथील योद्धा करिअर अर्कॅडमीच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी साधत श्रमदानातून स्वच्छता केली.

बाहेगावचे लोक स्वच्छता करत असलेले पाहून यात्रा समितीचे सदस्य व ग्रामस्थांनीही हातात झाडू घेत या स्वच्छता मोहीमेत सहभाग घेतला. या स्वच्छतेसाठी चाळीस ते पन्नास हजार रुपयांचा खर्च नेहमी येतो. परंतू श्रमदानातून ही स्वच्छता मोहीम राबवून योध्दा अॅकॅडमीच्या या उपक्रमाने समाजापुढे एक आदर्श निर्माण केला आहे. करमाळा तालुक्यातील चिखलठाण येथील कोटलिंग यात्रा ही तालुक्यातील सर्वात मोठी यात्रा समजली जाते. या यात्रेला दोन लाखापेक्षा जास्त भाविक येतात. चार दिवस चालणाऱ्या या यात्रेमध्ये पाळणे, रसवंती ग्रह, हॉटेल्स, खेळणी, विविध खाद्यपदार्थ व शीतपेयांचे स्टॉल अशा व्यावसायिकांनी आपली दुकाने थाटलेली असतात. मोठी उलाढाल या काळामध्ये होते. मात्र उजनी धरण काठावर असलेल्या या ६० ते ७० एकर मोकळ्या मैदानात यात्रेनंतर



मोठी अस्वच्छता जाणवते. यात्रेमधील शिल्लक राहिलेले खराब झालेले खाद्यपदार्थ, प्लास्टिकच्या बॉटल्स, कॅरीबॅग, कागद अशा विविध वस्तू सर्वत्र अस्ताव्यस्त पडलेल्या असतात. त्याची दुर्गंधी सर्वत्र सुटलेली असते. अशावेळी या परिसराची स्वच्छता करणे मोठे जिकिरीचे होते. रोजंदारीवर मजूर लावूनही चांगली स्वच्छता होत नाही परंतु करमाळा तालुक्यातील शेटफळ येथील सुभेदार मेजर विलास नाईकनवरे व हांबिराव नाईकनवरे यांनी जेऊरवाडी येथे सुरू केलेल्या योद्धा करिअर अर्कॅडमीच्या १२७ विद्यार्थ्यांनी यात्रेनंतर दोन दिवसांनी या ठिकाणी येऊन या परिसराची स्वच्छता करण्यास सुरुवात केली. अॅकॅडमीचे मार्गदर्शक नवनाथ नाईकनवरे, शिक्षक निलेश कदम, सागर जावरे, अमित पाटील, राहुल कावळे, वैभव नाईकनवरे यांच्या मार्गदर्शनाखाली हातात झाडू घेऊन स्वच्छता सुरू झाल्यानंतर येथील यात्रा कमिटी व ग्रामस्थांनीही या स्वच्छता मोहिमेत आपला सहभाग नोंदवला. चार ते पाच तास श्रमदान करून पंधरा ते वीस ट्रेलर कचरा गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावली या संपूर्ण परिसराची त्यांनी स्वच्छता केली. यात्रा कमिटीच्या वतीने श्रमदानासाठी आलेल्या सर्वांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली भोजनानंतर उजनी धरणामध्ये जलविहार करून निसर्गाच्या सानिध्यात जल पर्यटनाचाही आनंद या विद्यार्थ्यांनी घेतला यानंतर कोणत्याही यात्रेत किंवा सार्वजनिक ठिकाणी गेल्यानंतर तेथे अस्वच्छता करताना आपण दहा वेळा नक्कीच विचार केला पाहिजे ही शिकवण आजच्या स्वच्छता उपक्रमातून मिळाल्याचे या विद्यार्थ्यांनी आवर्जून सांगितले.

> कोटलिंग यात्रा झाल्यानंतर रोजंदारीवर मजूर लावून आम्ही चार पाच दिवस या परिसराची स्वच्छता करून घेत होतो. एरव्ही चाळीस ते पन्नास हजार रुपये खर्च करून होऊ न शकणारी स्वच्छता योद्धा अर्कॅडमीच्या विद्यार्थ्यांनी तीन ते चार तासात केली ग्रामस्थांचाही याच्यामध्ये सहभाग होता या उपक्रमाच्या माध्यमातून त्याची खरी सेवा काय असते याचा आदर्शच या अर्कॅडमीच्या विद्यार्थ्यांनी घालून दिला आहे.
>
> **- चंद्रकांत सरडे, माजी सरपंच, चिखलठाण.**

> कोटलींग यात्रा कालावधीमध्ये दर्शनासाठी कडमीमधील चार पाच विद्यार्थ्यांबरोबर आम्ही कोटलिंग मंदिरावर आलो होतो यावेळी सहज उजनी धरण काठावरील या निसर्ग रम्य परिसरामध्ये या यात्रेमुळे फारच अस्वच्छता होत असल्याचे आम्हाला दिसले यावेळी या ठिकाणच्या स्वच्छतेचा विषय निघाला आल्यानंतर आपण त्या ठिकाणी स्वच्छतेसाठी येऊ असे आम्ही ठरवले होते त्यानुसार आम्ही या ठिकाणी आलो ग्रामस्थ व यात्रा समितीच्या वतीने आम्हाला यासाठी सहकार्य मिळाले यामुळे हा उपक्रम अत्यंत यशस्वी झाला.
>
> **- नवनाथ नाईकनवरे, मार्गदर्शक, योद्धा करिअर अर्कॅडमी.**

# सार्वजनिक सेवांबाबत वेताळ परिवाराचा आंदोलनाचा इशारा

## १९ मे पासून करणार ठिय्या आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.२ मे-**

मोडनिंब (ता.माढा) येथे ऐन उन्हाळ्यात चार दिवसांआड पाणी पुरवठा होत आहे. केंद्र शासनाच्या जलजीवन मिशनअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या १२ कोटी ६५ लाख रुपयांच्या योजनेची कामे दोन वर्षांनंतरही संथ गतीने सुरू आहेत. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत असून, वेताळ परिवाराने धरणे आंदोलनाचा इशारा दिला आहे.

गावासाठी येवती ते मोडनिंब पाणीपुरवठा पाइपलाइन, येवती येथे नवीन विहीर व सौरऊर्जेवर चालणारा पंप बसविणे, गावातील नव्या वसाहतीसाठी जलकुंभ व अंतर्गत पाइपलाइन या कामांसाठी मोठा निधी मंजूर झाला आहे. मात्र अद्याप पाणीपुरवठा सुरळीत झालेला नसल्यामुळे नागरिकांना उन्हाळ्यात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करणे अत्यंत गरजेचे आहे, अन्यथा परिस्थिती आणखी गंभीर



होण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर वेताळ परिवाराने जलजीवन प्राधिकरणाच्या कार्यकारी अभियंत्यांना लेखी निवेदन सादर करून १५ मे पर्यंत कामे करण्याची मागणी केली आहे. अन्यथा १९ मे पासून संबंधित विभाग, ग्रामपंचायत कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. यासाठी प्रकाश गिड्डे, हनुमंत कुंभार, चंद्रकांत गिड्डे, राजू निंबाळकर, रमेश शिरसट, शंकर कोठावळे, अजित खडके आणि ऋषिकेश कोठावळे यांनी समर्थन दिले आहे. प्रशासनाकडून त्वरित कार्यवाही न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. वेताळ परिवाराच्या वतीने जल जीवन प्राधिकरण कार्यकारी अभियंता, एसटी विभाग व रेल्वे विभाग यांना लेखी निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात या कामांच्या गतीला चालना देण्याची मागणी केली आहे.

# पोलीस उपनिरीक्षक जालिंदर जाधव यांना पोलीस महासंचालक पदक

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२ मे-**

केमचे सुपूत्र कोल्हापूर पोलीस दलातील पोलीस उपनिरीक्षक जालिंदर जाधव यांना पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह व पदक मिळाले आहे. १मे महाराष्ट्र दिनी पालक मंत्राच्या हस्ते हे पदक त्यांना प्रदान करण्यात आले.



२००६ साली पुणे ग्रामीण पोलीसात भरती झाल्यावर जुन्नर, बारामती इंदापूर, येथे सेवा बजावली. त्यांची २०१८ साली महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून पोलीस उपनिरीक्षक म्हणून नेमणूक झाली.सांगली जिल्हातील कडेगाव, विटा, खानापूर, येथे सेवा बजावली आता ते स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा कोल्हापूर येथे कार्यरत आहेत. पोलीस दलात १९ वर्ष सेवा बजावून उत्कृष्ट गुन्हे तपास केल्याबद्दल कोल्हापूरचे पोलीस अधीक्षक महेंद्र पाटील, अप्पर पोलीस आधिक्षक निकेश खाटमोडे यांनी अभिनंदन केले आहे. माजी सरपंच अजितदादा तळेकर, सद्दिप तळेकर, सागर दौड, तंटामुक्ती अध्यक्ष अच्युत पाटिल, माजी पंचायत समिती सदस्य विष्णू पारखे, आदिनाथ जाधव, हरिदास मोळीक, माजी चेअरमन आनंद शिंदे, बाळासाहेब देवकर, दीलीप दौड, चेअरमन दत्ता बिचितकर, बापुराव धाडस, मेजर सोमा गरदडे, योगेश जाधव, सागर तळेकर, ओंकार जाधव, लक्ष्मण सुरवसे,राजेंद्र तळेकर यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



# प्रा. औदुंबर माळी यांचा पीएच.डी. पदवीने सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२ मे-**

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे (ता. सांगोला) येथील प्रा. औदुंबर दिगंबर माळी यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर यांनी औषधनिर्माणशास्त्र क्षेत्रांतील त्यांच्या संशोधनास पीएचडी पदवी देऊन सन्मानित केले. त्यांनी फॉर्मुलेशन अँड इव्यालुएशन ऑफ ब्रेन टार्गेटेड ड्रग डिलिव्हरी सिस्टिम ऑफ कार्मुस्टीन हा शोधनिबंध सादर करून पीएचडी पदवी प्राप्त केली. त्यांना हा शोधनिबंध पूर्ण करण्यासाठी कॉलेज ऑफ फार्मसी, अकलूजचे प्राचार्य डॉ.अनिल भानवसे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी पूर्व पीएच.डी. परीक्षेत ७७.४० टक्के गुण मिळवून विद्यापीठात द्वितीय क्रमांक पटकावला. त्यांनी आपला हा शोधनिबंध सात नामांकित राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय जर्नल्समध्ये मध्ये प्रकाशित केला. तसेच चार राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिसंवादामध्ये सादर केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. दिलीपकुमार इंगवले, प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी प्रा.औदुंबर माळी यांनी डॉ.इंगवले व डॉ. पाटील यांचे सहकार्य लाभल्याचे सांगितले.

# बसवेश्वरांनी १२ व्या शतकात केली अनुभव मंटप संसदेची स्थापना

## सृष्टी लिगाडे : सांगोल्यात उत्सव मंडळातर्फे व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२ मे-**

महात्मा बसवेश्वर महाराजांनी समाजात समता नांदावी, जातिभेद दूर व्हावा, अंधश्रद्धा, कर्मकांड, अस्पृश्यता या सर्व गोष्टी नष्ट करण्यासाठी सर्व शिवशरणार्थी एकत्र करून अनुभव मंटप नावाने एक संसद स्थापन केल्याचे सृष्टी लिगाडे हिने सांगितले.

येथील बसवेश्वर जयंती उत्सव मंडळाच्यावतीने बसवेश्वर महाराजांचे जीवनकार्य या विषयावर आयोजित व्याख्यानात ती बोलत होती. यावेळी व्यासपीठावर मंडळाचे अध्यक्ष संदेश पलसे, उपाध्यक्ष नितीन बुंजकर, सचिव प्रतिक कळसे, खजिनदार संतोष गुळमिरे, मनोज उकळे, आनंद घोंगडे, संतोष महिमकर, काशिनाथ ढोले, सुनील डिगोळे, सुनील लिगाडे उपस्थित होते. पुढे बोलताना सृष्टी लिगाडे म्हणाली, जनसामान्यांबद्दलचा बसवेश्वर महाराजांचा उमाळा अतिशय उत्कट व आर्द्र होता. जाती-पाती, पंथ, स्त्री-पुरुष उच्चनीच या सर्व भेदांना संपवून माणसांचा 'वीरशैव' व्हावा म्हणून बसवेश्वर महाराजांनी १२व्या शतकाच्या मध्यकाळात कार्य केले त्याला तोड नाही. यावेळी हर्षदा गुळमिरे यांनी बसवेश्वर महाराजांच्या जीवन चरित्रावर स्वरचित कविता सादर केली. लिंगायत समाजाचे ज्येष्ठ मार्गदर्शक सिद्धेश्वर झाडबुके यांनीही बसवेश्वर महाराजांविषयी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुपमा गुळमिरे यांनी केले.





# १ मे कामगार दिन श्रमिकांच्या रक्ताने रंगलेला

## प्रा. तानाजी ठोंबरे : आयटक व भाकप तर्फे कामगारदिन कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२ मे-**

एक मे कामगार दिन हा श्रमिकांच्या रक्ताने रंगलेला आहे, या रक्ताची लालीच कामगार कायद्यांची मोडतोड थांबवेल, पुढील काळात जनता मार्क्सवाद लेनिन वादाच्या विचाराने उभी राहील असे प्रतिपादन प्रा. तानाजी ठोंबरे यांनी केले.

एक मे कामगार दिनाच्या मिरवणुकीतील सभेत ते बोलत होते. आयटक कामगार केंद्र व भारतीय कम्युनिस्ट पक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने बार्शीत कामगारांची मिरवणूक काढण्यात आली. यशवंतराव चव्हाण सभागृहापुढे येताच तेथे सभेत रुपांतर झाले. यावेळी कश्मीरमधील अतिरेकी हल्ल्याचा निषेध करुन मृतांना तसेच एक मे शहिदांना कामगारांना तसेच असंयुक्त महाराष्ट्रातील हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी विविध घोषणा मिरवणुकीत देण्यात आल्या. यावेळी ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे कॉ. ए.बी. कुलकर्णी, रशीद इनामदार, रवींद्र लाटे, डॉ. जगदाळे मामा हॉस्पिटल श्रमिक संघाचे कॉ. लहु आगलावे, भारती मस्तुद, आनंद गुरव, अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचर कर्मचारी संघटनेचे कॉ. प्रवीण मस्तुद, बांधकाम कामगार संघटनेचे अनिरुद्ध नकाते, बालाजी शितोळे, घरेलू कामगार संघटना व बार्शी नगरपालिका कंत्राटी सफाई कामगार संघटनेचे शौकत शेख आदी उपस्थित होते.

# महापुरुषांचे विचार आचरणात आणणे गरजेचे : आ. सोपल

**तभा वृत्तसेवा**
**वैराग, दि.२ मे -**

थोर महापुरुषांचे मार्गदर्शक विचार व त्यांनी घालून दिलेला आदर्श सर्वांनी आपल्या आचरणात आणल्यास खऱ्या अर्थाने त्यांची जयंती साजरी केल्याचे सार्थक ठरेल असे मत आमदार दिलीप सोपल यांनी वैराग येथे व्यक्त केले.

येथे ३० एप्रिल रोजी मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन आमदार सोपल व अन्य मान्यवरांच्या हस्ते झाले. यावेळी तथागत गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे



पूजन आमदार दिलीप सोपल व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक कुंदन गावडे, रीलस्टार मोहिनी मस्के, उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार पत्रकार संघांचे अध्यक्ष बलभीम लोखंडे, उपाध्यक्ष रामदास पवार,कालिदास देवकते, आण्णा कुरुलकर, प्रभाकर क्षीरसागर या सर्वांना आमदार दिलीप सोपल यांच्या उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. त्यानंतर विविध क्षेत्रातील व्यक्तींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर, पोलीस निरीक्षक कुंदन गावडे, माजी जिल्हा परिषद सभापती मकरंद निंबाळकर, रील स्टार मोहिनी मस्के, नगरसेवक शाहूराजे निंबाळकर, श्रीशैल भालशंकर , वैजिनाथ आदमाने , उमेश क्षिरसागर ,अरुण सावंत, मध्यवर्ती जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष विजय बापू वाघमारे, अमोल वाघमारे,विजय दत्तात्रय वाघमारे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत भालशंकर यांनी केले. मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्या वतीने डॉ . बाबासाहेब आंबेडकर व रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमेला सजविण्यात आले होते. संपूर्ण वैराग शहरात आनंदी वातावरणात मिरवणूक काढण्यात आली. लहान बालगोपाळा पासून वयोवृद्ध व्यक्तींनी देखील यात सहभाग घेतला. यासाठी मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## महत्वाचे...



### उपमुख्यमंत्री अजित पवार यांना महाराष्ट्र दिनी इच्छा भगवंताची परिवाराच्यावतीने शुभेच्छा


**सोलापूर, दि. २ मे-**

१ मे कामगार दिन आणि महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने ईच्छा भगवंताची मित्र परिवाराच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पुणे येथील विमानतळावर भेट घेऊन कामगार चळवळींमध्ये सर्वात मोठे योगदान असणारे भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे माझी आत्माकथा पुस्तक तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन चरित्रावरील फकीरा पुस्तक भेट देत गुलाब पुष्प देऊन ईच्छा भगवंताची परिवाराचे मार्गदर्शक तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी त्यांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी माणिक कांबळे महादेव राठोड आनंद गाडेकर आदींची उपस्थिती होती.

### कमला को-ऑप बँकेच्या चेअरमनपदी यादगिरी कोंडा, शहा व्हाईस चेअरमन

**सोलापूर, दि. २ मे-**

कमला बँकेची पंचवार्षिक संचालक मंडळ निवडणूक जी. टी. वडेकर सहा. उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर यांच्या अधिकारात बिनविरोध झाली. बँकेच्या चेअरमनपदी यादगिरी नारायण कोंडा व व्हा. चेअरमनपदी तिलोकचंद ना. शहा यांची सर्वसंमतीने निवड करण्यात आली. सदर संचालक मंडळ




सभेस निवडणूक निर्णय अधिकारी जी. टी. वडेकर, संचालक मंडळ सदस्य किशोर कटारे, विजयभाई पटेल, विलास शेंडगे, सुरेश डांगे, शकुंतलाबाई कटारे, विद्यावती कटारे तसेच नवनिर्वाचित संचालक मधुसुदन तोष्णीवाल, राहुल तोष्णीवाल, कमल कटारे, सुनिता तोष्णीवाल व व्यवस्थापक जगन्नाथ कल्याणशेट्टी हे उपस्थित होते.

### जुळे सोलापूरातील बँक कॉलनीत सुविधांची मागणी

**सोलापूर, दि.२ मे -**

जुळे सोलापूरातील ज्ञानेश्वर नगर परिसरातील बँक कॉलनीत महापालिकेने नागरिकांना मुलभूत सुविधा न दिल्याने त्या देण्याची मागणी होत आहे. या परिसराती सर्वात जुनी वसाहत असूनही येथील सुविधांकडे आमदार, नगरसेवक तसेच महापालिका अधिकारी यांचे दुर्लक्ष आहे. त्यामुळे नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे. याबाबतचे अनेक वेळा निवेदन दिले आहे मात्र दुर्लक्ष होत आहे.

# ‘ज्ञानप्रबोधिनी’च्या युवकांची पर्वतारोहणातून हिमालयाशी गट्टी



■ २६ जणांची वीरव्रताची सहल
■ रामायणातून वीरतेची प्रेरणा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

येथील ज्ञानप्रबोधिनीतर्फे दहावी-बारावीची परिक्षा दिलेल्या २६ जणांनी वीरव्रत सहलीद्वारे पर्वतारोहणाचा थरार अनुभवला. रामायणातून वीरतेची प्रेरणा घेत मुलांनी उन्हाळ्याच्या सुट्टीत हिमलयाशी गट्टी केल्याचे दिसून आले.

वार्षिक परिक्षा झाल्यानंतर उन्हाळी सुट्टीतील मज्जा अनेक प्रकारांने मुले घेतात. ज्ञानप्रबोधिनी संस्थेने मात्र या मुलांना एक वेगळा अनुभव देत थेट हिमालयाची भेट घडवली. अयोध्येत श्रीरामप्रभूच्या दर्शनातून रामायणातील वीरव्रताची प्रेरणा घेत या मुलांनी सलग तीन दिवस पर्वतारोहणाचा थरार अनुभवला. ज्ञानप्रबोधिनी संस्थेने वार्षिक परीक्षा दिलेल्या दहावीतील १४, बारावीतील ६ तसेच अन्य ६ अशा २६ जणांना दिल्ली, अयोध्या, नैनिताल व आग्रा येथे वीरव्रत सहल घडवली.

### हत्ती आले अंगावर...

दि.२८ एप्रिलला जीम कॉर्बेट पार्कमध्ये उघड्या जीपमधून आम्ही वन्यजीव पाहण्यासाठी गेलो होतो. हत्तीचा कळप रस्ता पार करत होता. म्हणून आमची एक जीप थांबली. पण त्यातील एका हत्तीला काय वाटले कुणास ठाऊक, तो आमच्या जीपकडे वळाला. जीपवाल्याने सावकाश जीप मागे घेतली. तो आणखी चार पावले पुढे आला. परंतु सुदैवाने मागच्या कळपाच्या जोरामुळे तो रस्ता पार करून गेला आणि आम्ही हुश्श केल्याचा अनुभव सहल प्रमुख आयुष चोरमोले यांनी सांगितला.

दि.२३ ते २८ एप्रिल दरम्यानच्या या सहलीची सुरवात नवी दिल्लीच्या संसद भवनापासून झाली. याबाबत माहिती देताना सहलप्रमुख आयुष चोरमोले म्हणाले, दि. २३ एप्रिलला दिल्ली येथे मोराच्या थीमवर असलेले भव्य लोकसभा गृह, कमळाच्या थीमवर असलेले राज्यसभा गृह आणि भारतीय संस्कृतीची ओळख करून देणारे दालन पाहून आमचा ऊर अभिमानाने भरून आला. दि. २४ एप्रिलला अयोध्या येथे प्रभू श्रीराम यांचे मंगलमय व चित्तप्रचोदित करणारे दर्शन झाले. तोच धागा धरून सहकार्यवाह डॉ. अमोल गांगजी यांनी श्रीराम व श्रीहनुमंतांच्या कथांमधून जीवनमूल्ये व वीरत्वाची प्रेरणा देणारी सत्रे सहलीमध्ये घेतली. दि.२५,२६,२७ एप्रिल या तीन दिवसात नैनितालला बारा पत्थर येथे पर्वतारोहणाचे प्रशिक्षण होते. खाचा शोधत केवळ हाताच्या बोटांच्या आणि पंजाच्या साहाय्याने शिळा चढून जाण्याचा व रॅपलिंगचा अनुभव रोमांचकारी होता. युवकांचे कौशल्य, ताकद व साहस पणाला लागले. शिळा चढताना खाली खोल दरी व वर जाताना निसटता आधार ही कसरत करत पर्वतावर पोचणे हे प्रशिक्षण युवकांचे धाडस वाढवणारे ठरले. तसेच खडा चढ चढत गिरीभ्रमण करणे हे शारीरिक क्षमता ताणणारे होते.

## ‘मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा’ स्पर्धेत सिंहगड स्कूल प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' टप्पा क्रमांक दोनमध्ये माध्यमिक गटात केगाव येथील सिंहगड पब्लिक स्कूलने प्रथम क्रमांकाचा तीन लाखांचा पुरस्कार मिळवला. पहिल्यांदाच या स्पर्धेत भाग घेऊन सिंहगड पब्लिक स्कूलने हे यश मिळवले.



उत्तर सोलापूर पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने बुधवारी (ता. ३०) सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळेस हा पुरस्कार शिक्षणाधिकारी कादर शेख, गटविकास अधिकारी बाळासाहेब पाटील, उपशिक्षणाधिकारी स्वाती हवेली, राष्ट्रीय महासंघाचे सचिव म.ज. मोरे, जिल्हा शिक्षक संघटनेचे अनिरुद्ध पवार, वडाळ्याचे सरपंच जितेंद्र साठे यांच्या उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण झाले. यावेळी सिंहगड इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर संजय नवले, प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, प्रबंधक डॉ. दत्तात्रय नवले उपस्थित होते. संस्थेचे सहसचिव संजय नवले यांच्या नेतृत्वाखाली प्राचार्या शाहीन शेख यांच्या मार्गदर्शनाखाली सिंहगड पब्लिक स्कूलने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमांमध्ये सहभाग घेऊन प्रथम क्रमांक पटकाविला. या अभियानास विद्यार्थी व शिक्षकांबरोबरच विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक व शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

## उबाठाला झटका देत उत्तर सोलापूर तालुका प्रमुख शेकडो कार्यकर्त्यांसह शिंदे गटात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**



शिवसेना मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कामावर विश्वास ठेवून शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल बापू शिंदे यांच्या माध्यमातून राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते युवासेना उत्तर सोलापूर तालुका प्रमुख कोंडी गांवचे युवानेते धनाजी भोसले, अमर भोसले, समाधान सावंत, अशोक भोसले, स्वप्नील गव्हाणे, ज्ञानेश्वर कवडे, अमर पाटील, गणेश रणदिवे, देवा पवार, तौफिक शेख, आदित्य मोरे यांच्यासह आपल्या शेकडो शिवसैनिकांसह शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. काँग्रेस पक्षातून दक्षिण सोलापूर मधून अरुणाताई बेंजरपे यांच्यासह असंख्य महिला पदाधिकाऱ्यांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला.कोंडी गांवचे सुपुत्र असलेले धनाजी भोसले यांना नुकताच कोंडी गांवच्या प्रवेशद्वारात स्व खर्चातून छत्रपती शिवाजी महाराज यांचा आश्वारूढ पुतळा बसविल्यामुळे त्यांची खूप लोकप्रियता आहे. याचा आगामी काळात पक्षाला खूप फायदा होईल असे मत व्यक्त करण्यात आले. याप्रसंगी माजी आमदार शहाजी बापू पाटील, माजी आमदार उत्तमप्रकाश खंदारे, मनोज शेजवाल, अमर पाटील, सागर पिसे, सुजित खुर्द, समर्थ मोटे, मुबीना मुलाणी, रविना राठोड, संजय सरवदे, राजकुमार शिंदे, जयश्री पवार, पंकज वालावलकर, अनिता गवळी, नवनाथ चव्हाण, अश्विनी भोसले, पूजा चव्हाण, ब्रम्हदेव गायकवाड, रुपराणी चौहान, मनीषा नलावडे, एजाज शेख, सुनंदा साळुंके, गफूर शेख, प्रभाकर गायकवाड, अनिकेत राठोड, आकाश गजघाटे, आणप्पा सतुबर, जावेद पटेल, यांच्यासह आदी पदाधिकारी व असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

## डेव्हलपर्स निर्मिती लँडमार्कला ग्राहकांचा प्रतिसाद

### प्रमुख व्यवस्थापक प्रभाकर क्षीरसागर यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

येथील बांधकाम क्षेत्रातील अत्यंत नावाजलेल्या निर्मिती डेव्हलपर्स यांच्या निर्मिती लँडमार्क मध्ये अगदी मोजकेच फ्लॅट शिल्लक असून ग्राहकांनी त्यांच्या आवडीच्या फ्लॅट मध्ये राहण्यासाठी त्वरित बुकिंग करावी, असे आवाहन प्रमुख व्यवस्थापक प्रभाकर क्षीरसागर यांनी व्यक्त केले.



विजापूर रोड येथील इंदिरानगर (रामलिंग नगर) परिसरात अगदी अल्पवधीतच ग्राहकांमध्ये प्रसिद्ध झालेल्या निर्मिती डेव्हलपर्स यांच्या निर्मिती लँडमार्क मध्ये मोजकेच टू आणि थ्री बीएचके शिल्लक असल्याचे त्यांनी सांगितले. अत्याधुनिक जीवनशैली व अत्याधुनिक अम्युनिटीज देऊन एक सुंदर असा ग्रहप्रकल्प निर्मिती डेव्हलपर्सने राबविला असल्याचे अनेक ग्राहकांनी आपले मत व्यक्त केले. कारण भरपूर पार्किंग स्पेस लाईट व्यवस्था पाणी व्यवस्था तसेच सर्वत्र हिरवेगार झाडी यामुळे या परिसरातील एक चांगले प्रकल्प म्हणून निर्मिती लँडमारकडे ग्राहक पाहत आहेत. या निर्मिती लँडमार्क प्रकल्पामध्ये प्रीमियम ऑटो व थ्री बीएचके मोजकेच शिल्लक आहेत तसेच आपल्या व्यवसाय याची मुहूर्तमेढ करण्याकरिता चांगले व सुसज्ज असे शॉप्स देखील कमीत कमी उपलब्ध आहे. त्यामुळे सोलापूर शहर व परिसरातील ग्राहकांनी आपल्या स्वप्नातील घर किंवा व्यवसाय वृद्धी करण्याकरिता एक वेळी या प्रकल्पाला अवश्य भेट द्या, असे आवाहन जितेश पाटील यांनी केले आहे.

## बसव सेंटरच्या पुरस्कारांचे उद्या वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

लिं. राजशेखर मडकी संस्थापित बसव सेंटरतर्फे रविवार दिनांक ४ मे रोजी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना पुरस्कार देण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र मायनाळ यांनी दिली.

रविवारी सायंकाळी ६ वाजता हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. पूज्य श्री.ष. ब्र. श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी यांच्या हस्ते व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी अक्कलकोटच्या खेडगी महाविद्यालयातील कन्नड प्रा. डॉ. गुरुलिंगप्पा धबाले यांना बसवभूषण, सिद्धार्थ सर्जे यांच्या सिद्धार्थ फाउंडेशनला आदर्श संस्था पुरस्कार, ज्येष्ठ साहित्यिक व मनोरमा बँकेचे चेअरमन श्रीकांत मोरे यांना बसवरत्न, पत्रकार संजय जाधव यांना आदर्श पत्रकार, वीरेश्वर लिंगायत प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राजशेखर विजापुरे यांना बसवश्री, आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल परशुराम लांबतुरे यांना बसव तत्वश्री, उद्योजिका व सामाजिक कार्यकर्त्या धनश्री मणुरे यांना कायकयोगी पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. रविवारी होणाऱ्या कार्यक्रमात संस्थेतर्फे आयोजित वचन पाठांतर स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस संस्थेचे कार्याध्यक्ष बाबासाहेब कुलकर्णी, नीलकंठ कोनापुरे, सचिव प्रा. मल्लिनाथ पाटील आदी उपस्थित होते.



### ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत मोरे यांचा समावेश

ज्येष्ठ अर्थतज्ञ श्रीकांत मोरे हे सध्या मनोरमा बँकेचे चेअरमन असून, मसाप पुणे शाखा पश्चिम सोलापूरचे ते अध्यक्ष आहेत. १९८१ मध्ये मोरे यांनी कोपरगाव (ता. कोळपेवाडी) येथून शिक्षक म्हणून करिअरला सुरुवात केली. १९८४ ते १९८९ पर्यंत महाराष्ट्र शासन वित्त लेखाधिकारी म्हणून मुंबई येथे, तर १९८९ पासून सहकार खात्यात जिल्हा उपनिबंधक, जानेवारी २०१६ मध्ये वर्ग १ पदावरून सेवानिवृत्त. साहित्य व निसर्गाच्या सहवासातून १९७४ पासून काव्य लेखनास सुरुवात. आजपर्यंत त्यांची २८ पुस्तके प्रकाशित झाली असून, २१ कवितासंग्रह, दोन कथा संग्रह, पाच ललित लेखसंग्रह प्रसिद्ध झाली आहेत. आणखी काही पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

## शासनाच्या १०० दिवसांच्या उपक्रमांत सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलिस चौथ्या स्थानावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे -**

राज्यातील सर्वच शासकीय विभागात शंभर दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमाचे भारतीय गुणवत्ता परिषदतर्फे अंतिम मूल्यमापन करण्यात आले. त्यामध्ये सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलिस दलाचे अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी ६४ गुण मिळवित राज्यात चौथा क्रमांक मिळविला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिक्षक कुलकर्णी व त्यांच्या कार्यालयाचे अभिनंदन केले आहे.

सन २०२४ मध्ये राज्यात नवनियुक्त सरकार स्थापित झाल्यावर राज्याचे माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनात सुधारणा व कार्यशिलता वाढविण्यासाठी १०० दिवसाचा उपक्रम जाहीर केला होता. त्यामध्ये कार्यालयीन सुधारणा यामध्ये प्रलंबित प्रकरणांची निर्गती, स्वच्छता, अभ्यागताना सुविधा वगैरे ७ मुद्द्यावर सुधारणा करण्यासाठी सूचित केले होते. सोबतच सूचीबद्ध उपक्रम दिला होता. या उपक्रमामध्ये पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सहभाग घेतला होता. पोलीस अधीक्षक यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यास भेटी देऊन यामध्ये सहभाग घेऊन कार्यालयीन सुधारण्यासाठी मार्गदर्शन केले होते. आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार व पाठपुरावा केला होता. त्यामधून जिल्ह्यातील पोलीस ठाणेस फर्निचर उपलब्ध करून दिले. इमारतींना रंगरंगोटी केली. तक्रारदारांसाठी कायम स्वरूपी मोबाईल क्रमांक, प्रलंबित गुन्हे/ अर्ज /मुद्देमाल, आरोपी दत्तक योजना तसेच स्मार्ट पोलीस आदि विषय हाती घेऊन नियोजित कार्यक्रम आखून दिला. जिल्ह्यातील उद्योजक यांचेशी संवाद साधला. त्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या. राज्यात आयोजित करण्यात आलेल्या शंभर दिवसाच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमाचे भारतीय गुणवत्ता परिषदेतर्फे अंतिम मूल्यमापन करण्यात आले आहे. या निकालानुसार वेबसाइट सुधारणा कार्यालयीन सोयीसुविधा, तक्रार निवारण, सुलभ जीवनमान, तंत्रज्ञानाचा वापर आदी दहा मुद्द्यांवर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कार्यालयाचे मूल्यमापन करण्यात आले आहे. यामध्ये सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी राज्यात चौथा क्रमांक पटकावला आहे. या विशेष कामाबद्दल अधिक्षक अतुल कुलकर्णी यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



### सहकारी पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मदतीमुळे चांगली कामगिरी

सहकारी पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मदतीमुळे चांगली कामगिरी करता आली आहे. मागील अनेक दिवसांपासून विविध महत्त्वपूर्ण सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जात होते. या पुढच्या काळातही नागरिकांना सुलभसुविधा देण्यासाठी पोलिस प्रशासन प्रयत्नशील असणार असल्याचे पोलिस अधिक्षक कुलकर्णी यांनी सांगितले.

## शिक्षण विभागाच्या विरोधात ‘पद्मशाली’च्या शिक्षकांचे उपोषण

### आश्वासनानंतर उपोषण स्थगित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

पद्मशाली शिक्षण संस्था सोलापूर भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था असणाऱ्या पद्मशाली शिक्षण संस्था संचलित सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील शिक्षकांचे विविध मागण्यासाठी आमरण उपोषण सुरू होते. या उपोषणाची दखल घेत माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी आंदोलनस्थळी भेट दिली. प्रलंबित माध्यमिक शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यतेला मंजुरी आणि शालार्थ खाऊ योजनेसाठी शिफारस करणार असल्याचे आश्वासन दिले. त्यामुळे त्यांनी आमरण उपोषण तात्पुरते स्थगित केले.



प्राथमिक शाळेचे मान्यता न मिळालेले शिक्षकांना १५ दिवसात मान्यता न दिल्यास मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ समोर १५ दिवसांनंतर आमरण उपोषण करण्याचे ठरले. माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी शिफारस केलेल्या शालार्थ आयडीबद्दल मान्यता न दिल्यास शिक्षण उपसंचालक कार्यालय पुणे येथील कार्यालयासमोर शालार्थ आयडी न मिळालेल्या शिक्षकांचे आमरण उपोषण करण्याचे ठरले. याप्रसंगी पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप, विश्वस्त विजयकुमार गुल्लापल्ली, प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर,पर्यवेक्षक मल्लिकार्जुन जोकारे, सौ भु.म.पुल्ली कन्या प्रशाला कनिष्ठच्या प्राचार्या गीता सादुल, उपप्राचार्य बाळकृष्ण गोटीपामूल, उप मुख्याध्यापक तुकाराम श्रीराम, जे. जे. बिटला प्रशालेच्या मुख्याध्यापिका शारदा गोरट्याल तसेच रा.ना. बोमड्याल प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक व्यंकटेश पोटाबत्ती, रा. न. ईप्पाकायल प्राथमिकचे मुख्याध्यापक नागेश खुणे, नारायणराव कुचन प्राथमिकचे मुख्याध्यापक पुलकेशी संगा उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# वडार समाजातील १६ जोडपी अडकले विवाहबंधनात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

मी वडार महाराष्ट्राचा, वडार ज्ञाती संस्था, सोलापूर शहर-जिल्हा वडार युवक संघटना, महिला संघटना, विद्यार्थी संघटना, श्री रुपाभवानी खाण क्रशर मोटार मालक संघटना, जिल्हा वडार समाज खाण कामगार समाजसेवा मंडळ, श्री विष्णू तरुण मंडळ वडार समाज, न्यू विजय भवानी नवरात्र महोत्सव मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने भवानी पेठ परिसरातील हनुमान गड येथे आयोजित केलेल्या सामुदायिक विवाह सोहळ्यात वडार समाजातील १६ जोडपी विवाह बंधनात अडकले. या विवाह सोहळ्याचे यंदाचे २५वे वर्ष आहे. या विवाह सोहळ्यासाठी भव्य शामियाना उभारण्यात आला होता. वधू-वरांना लग्नाचे कपडे, मंगळसूत्र, जोडवी, संसारोपयोगी साहित्य आणि वऱ्हाडी मंडळींना मिष्टान्न भोजन देण्यात आले. पद्मशाली पुरोहित संघम्चे गड्डम पंतुलु आणि वडार समाजाचे रवी देवकर यांनी मंगलाष्टके म्हटले. राजू निंबाळकर व दिलीप भांडेकर यांनी सूत्रसंचालन केले. विष्णू चौगुले यानी आभार मानले. यावेळी आमदार विजयकुमार देशमुख, देवेंद्र कोठे, समाधान आवताडे, माजी आमदार दिलीप माने, मी वडार महाराष्ट्राचा युवा आघाडीचे अध्यक्ष ममित चौगुले, माजी नगरसेवक प्रथमेश कोठे, डॉ. किरण देशमुख, गुरुशांत धुत्तरगांवकर, विजयकुमार विटकर, लक्ष्मण विटकर, नागनाथ बंदपट्टे, संजय चौगुले, मनोहर इरागोटे, सिध्दू लिंबोळे, अनिल चौगुले, दशरथ दांडेकर, हिरालाल पवार, रवी मुधोळकर,, अरुण धोत्रे, मनोज अलकुंटे, लहु, गोविंद, भीमा बंदपट्टे उपस्थित होते.

## ▶▶ महत्वाचे...

### नववी ते बारावी विद्यार्थ्यासाठी करिअर मार्गदर्शन कार्यशाळा

**सोलापूर, दि. २ मे-**

द मुंबई आंध्र महासभा व जिमखाना यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य पद्मशाली शिक्षण विभाग संघम्च्या वतीने राज्यभरातील नववी ते बारावीपर्यतच्या विद्यार्थ्यांसाठी रविवार, ४ मे रोजी करिअर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र राज्य पद्मशाली शिक्षण विभाग संघम्चे अध्यक्ष रविंद्र कमटम यांनी दिली.या कार्यशाळेच्या माध्यमातून अभियांत्रिकी, वैद्यकीय, सीए, सीएस, कायदा, डिझाईन, पार्मसी, पायनान्स, जेईई, नीट, एम एचटी-सीईटी, एनडीए, जीआरई, जीएमएटी, एनएटीए, आयपीएमएटी, सीएलएटी, आयआयएम एस यांसह भारतातील व आंतरराष्ट्रीय नामांकित विद्यापीठांमधील प्रवेश आर्दीविषयी मार्गदर्शन केले जाणार आहे. मुंबई बाहेरील विद्यार्थ्यासाठी ऑनलाईन तर मुंबई येथील विद्यार्थ्यांसाठी ऑपलाईन स्वरुपात ४ मे रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १.३० यावेळेत ही कार्यशाळा घेण्यात येणार आहे. लिंकद्वारे जे विद्यार्थी नोंदणी करतील त्यांना वषभर मोपत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी सोलापुरातील यशवंत इंदापुरे यांच्याशी संपर्क साधावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

### भद्रावती पेठेत गाव वस्ती अभियान

**सोलापूर, दि. २ मे-**

भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश शाखेच्या सूचनेनुसार आमदार देवेंद्र कोठे यांच्या मार्गदर्शनाखाली, पद्मशाली ज्ञाती संस्थचे माजी सरचिटणीस तथा माजी नगरसेवक अनिल पल्ली यांच्या नेतृत्वाखाली प्रशांत पल्ली व प्रसाद पल्ली यांनी भद्रावती पेठेतील दुस्सा वाडा येथे गाव वस्ती अभियानचे आयोजन करण्यात केले हाते. मन की बात आणि लाभार्थी सन्मानच्या अनुषंगाने भाजपाचे मध्य पूर्व अध्यक्ष अक्षय अंजीखाने यांच्या हस्ते लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी मीनाक्षी नाडगम, मीना चौगुले यांच्यासह विश्वनाथ प्याटी यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सिध्दाराम ख्याडे, साईनाथ आंदोल, सुनील घाटे, राजू भंडारे, नीलेश यलसंगी, सुनील यलसंगी, मोतीलाल गोने, श्रीनिवास म्हेत्रे, विशाल आंकद, कृष्णा म्याकल आदी उपस्थित होते.

### 'जांबमुनी मोची'च्या सोहळ्यात १८ वधूवरांनी बांधली रेशीमगाठी

**सोलापूर, दि. २ मे-**

येथील श्री जांबमुनी मोची समाज सेवा मंडळ-लष्करच्या वतीने आयोजित केलेल्या सामुदायिक विवाह सोहळ्यात समाजील १८ वधू-वरांनी रेशीमगाठी बांधली. श्री जांबमुनी मोची समाजाच्या वतीने गेल्या ३१ वर्षापासून या सोहळ्याचे आयोजन करण्यात येत आहे. विवाह सोहळ्यात सामील झालेल्या वधूंना मंगळसूत्र, जोडवे, कानातले पुल, साडी, परकर, ब्लाउज तर वरांना कपडे, टोपी, टॉवेल आणि प्रत्येकी पाच भांडी तसेच वह्-हाडी मंडळींना भोजन देण्यात आले. विवाह सोहळ्यासाठी भव्य मंडप उभारण्यात आला होता. बापूजी नगर येथील श्री मारुती मंदिर पटांगण येथे झालेल्या या सोहळ्यास आमदार देवेंद्र कोठे, माजी महापौर संजय हेमगड्डी, स्थायी समितीचे माजी सभापती देवेंद्र भंडारे, मंडळाचे अध्यक्ष करेप्पा जंगम, सेक्रेटरी सागर शिंगे, जॉन पुलारे, नागेश म्हेत्रे उपस्थित होते.

### 'पद्मशाली'च्या सोहळ्यात नऊ जोडपी विवाहबध्द

**सोलापूर, दि. २ मे-**

पद्मशाली युवक संघटनेच्या वतीने अककलकोट रोडवरील बोमड्याल मंगल कार्यालय येथे आयोजित केलेल्या पद्मशाली समाजातील गरीब उपवर वधू-वरांच्या मोपत सामुदायिक विवाह सोहळा अंतर्गत एकूण नऊ जोडपी विवाहबध्द झाली. पद्मशाली पुरोहित संघम्च्या नेतृत्वाखाली पद्मब्राम्हणांनी विवाह सोहळ्याचे विधी पार पाडले. या विवाह सोहळ्यात सहभागी झालेल्या वधूस मंगळसूत्र, जोडवे, साडी, परकर, ब्लाउज तर वरास कपडे, टोपी, टॉवेल आणि वन्हाडी मंडळींना भोजन देण्यात आले. या विवाह सोहळ्यात प्रियांका अशोक चिलवेरी व अंबादास रमेश मामड्याल, दिव्या देवीदास आरकाल व पवन विजय गुडा, अश्विनी राम गुंडेटी व अंबादास लक्ष्मण बेत, अंबिका विठ्ठल आडम व यल्लप्पा शिवाजी कल्याण, राणी अंबादास कडदास व शिवराज भद्रय्या गड्डम, लावण्या राजू नल्ला व अरविंद हरिदास शेरला, अनुराधा अंबादास कनकी व गणेश पुंडलिक भंडारी, अंजली विजय गवंडी व श्रीकांत नागनाथ चिलकामारी असे एकूण आठ जोडपो विवाहबध्द झाली.

## दहा तासांचे शर्थीचे प्रयत्न

# अख्खी विहीर उपसली अन् दोन विद्यार्थ्यांचे मृतदेह सापडले

### बोरामणी येथील घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ मे -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी गावातील एका शेतात विहीर अंगावर पडल्याने पोहत असलेले दोन चिमुकले विद्यार्थी ढिगाऱ्याखाली दबले होते. महाराष्ट्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभाग, अग्निशामक दल विभागाच्या अथक प्रयत्नानंतर त्या दोन चिमुकल्या विद्यार्थ्यांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. विहिरीमधील संपूर्ण पाणी बाहेर काढून, ढिगाऱ्याखाली दबलेल्या दोन चिमुकल्यांना बाहेर काढले. दोघांना शासकीय रुग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. सोलापूर जिल्ह्याचे ग्रामीण पोलीस प्रशासन,आणि दक्षिण सोलापूर तालुक्याचे तहसीलदार किरण जमदाडे हे तळ ठोकून गुरुवारी रात्री उशिरापर्यंत बसले होते. शुक्रवारी सकाळी दोन्ही चिमुकल्यांच्या मृतदेहावर पोस्टमार्टम करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.

भीमरत्न हरीचंद्र राजगुरू(वय १४ वर्षे,रा बोरामणी, ता दक्षिण सोलापूर), नैतिक सोमनाथ माने (वय





१५ वर्षे, रा. बोरामणी, ता दक्षिण सोलापूर) असे मृत मुलांची नावे आहेत.

सोलापूर शहरापासून अगदी हाकेच्या अंतरावर असलेल्या बोरामणी गावातील शेळके यांच्या विहिरीत गुरुवारी दुपारी शालेय मुलं पोहायला गेली होती. साडेबाराच्या सुमारास मुलं पोहत असताना, विहिरीचा कठडा घसरला आणि विहीर अंगावर पडली.दगड आणि मातीचा ढिगारा पोहत असलेल्या मुलांवर कोसळला.भीमरत्न राजगुरू आणि नैतिक माने ही दोन्ही मुलं ढिगाऱ्याखाली दबली गेली. बाकीची चार ते पाच मुलं कशीबशी बाहेर आली. वाचलेल्या मुलांनी आरडाओरडा करून आजूबाजूच्या शेतकऱ्यांना बोलावून घेतले.

### रात्री दोन्ही मृतदेह बाहेर काढले

घटनेची माहिती मिळताच ताबडतोब प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. विहिरीतील पाणी आणि ढिगारा बाहेर काढल्याशिवाय पर्याय नसल्याने दिवसभर विहिरीमधील पाणी बाहेर काढण्यात आले. च्या साह्याने विहीरीमधील माती बाहेर काढण्यात आली. गुरुवारी (१ मे) रात्री उशिरापर्यंत काम सुरू होते. मध्यरात्रीच्या सुमारास भीमरत्न राजगुरू आणि नैतिक माने यांचा मृतदेह समोर आला. पोलिसांनी मृतदेह बाहेर काढून शासकीय रुग्णालयात दाखल केले. शुक्रवारी सकाळी डॉक्टरांनी त्या दोन चिमुकल्यांना मृत घोषित केले आणि पोस्टमार्टम करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिले. विहीर अंगावर कोसळून दोन शालेय विद्यार्थ्यांना जीव गमवावा लागला, त्यामुळे बोरामणी गावात शोककळा पसरली आहे. दरम्यान, याबाबत सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पोलिस पुढील तपास करीत आहेत.



## तापमान वाढलेल्या सोलापुरात पेट्रोल पंपावरच स्कॉर्पिओ जळून खाक

### सुदैवाने मोठा अनर्थ टळला

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ मे -**

एकीकडे कडक उन्हाच्या झळांनी लक्ष वेधललेल्या सोलापुरात पेट्रोल पंप परिसरात स्कॉर्पिओ गाडीला भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सोलापूर-मंगळवेढा महामार्गवरील देगाव जवळील पेट्रोल पंपावरील ही घटना असून सुदैवाने मोठी दुर्घटना टळली.

स्कॉर्पिओला नेमकी कशामुळे आग लागली हे अद्याप गुलदस्त्यात आहे. मात्र, या घटनेनंतर पेट्रोल पंपावरील कर्मचारी व स्टाफही काही काळ घाबरुन गेला होता.

स्कॉर्पिओ आग दुर्घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, गाडीत डिझेल भरल्यानंतर चालकाला शंका येताच त्याने गाडी बाजूला घेत प्रसंगावधानता दाखवली. ड्रायव्हरने गाडी बाजूला घेताच अचानक गाडीत लागलेल्या आगीने रौद्र रूप घेतलं, त्यानंतर ड्रायव्हर गाडी सोडून दूरवर गेला होता. दरम्यान अग्निशमन दल आणि पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांनी आग आटोक्यात अतोनात प्रयत्न केल्याने मोठी घटना टळली विशेष म्हणजे गेल्याच महिन्यात सोलापुरात एसटी बसही जळून खाक झाल्याची दुर्घटना घडली होती. त्यामुळे, एकीकडे उन्हाचा पहार वाढत असताना दुसरीकडे अशा दुर्घटना घडत असल्याने पुन्हा तापमानाचीच चर्चा होत आहे.

## जातनिहाय जनगणना केंद्राचा क्रांतिकारी निर्णय : नरेंद्र काळे

### भाजपा सोलापूर शहरच्यावतीने जल्लोष



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

भारताच्या वाटचालीला गती देण्यासाठी जातीनिहाय जनगणना करण्याचा ऐतिहासिक निर्णयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्र सरकार यांचे आभार व्यक्त करत भाजपा शहराच्या वतीने भाजपा शहर कार्यालय येथे जल्लोष करण्यात आला.

शहराध्यक्ष नरेंद्र काळे म्हणाले, जातनिहाय जनगणना करण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने घेतलेला दुरगामी परिणाम करणारा निर्णय म्हणावा लागेल. १९३१ नंतर प्रथमच अशी जनगणना होणार असल्याने हा क्रांतिकारक निर्णय आहे. समाजातील एक उपेक्षित वर्गाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांची गणना होणे गरजेचे आहे, ही बाब लक्षात घेऊन केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे आता विरोधकांची बोलती बंद झाली आहे. खरं तर काँग्रेसने त्यांच्या सत्ताकाळात हा निर्णय घेण्याची हिंमत दाखवली नव्हती. काँग्रेस सरकारने जातनिहाय जनगणनेचा विरोध केला आहे. त्यामुळेच, १९४७ पासून देशात जातनिहाय जनगणना करण्यात आली नाही. जात जनगणना करण्याऐवजी जात सर्वेक्षण करण्यात आले. त्यामुळे राहुल गांधींना यावर टीका करण्याचा अधिकार पोहोचत नाही; परंतु समाजातील विशिष्ट समूहांना आपल्याकडे ओढण्यासाठी राहुल गांधी यांच्या काँग्रेस पक्षाने जातनिहाय जनगणनेचा मुद्दा उचलून धरला होता.

यावेळी माजी अध्यक्ष रामचंद्र जन्नू, सरचिटणीस विशाल गायकवाड, उपाध्यक्ष जय साळुंखे, प्रशांत फत्तेपूरकर, श्रीनिवास करली, राम वाकसे, मंडल अध्यक्ष नागेश सरगम, नागेश खरात, अक्षय अंजिखाने, अर्जुन जाधव, महेश देवकर, देविदास बनसोडे, दत्तात्रय बडगू, चिटणीस सावित्री पलाटी, बजरंग कुलकर्णी, मोहन डांगरे, राजू माने, दिलीप शिंदे आदी उपस्थित होते.

# जिल्ह्यातील एकही बेघर लाभार्थी वंचित राहू नये याची दक्षता घ्या

### पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे निर्देश

### जिल्ह्यात ६२ हजार ९५० घरकुले मंजूर

### पालकमंत्र्यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे सर्वांसाठी घर हे स्वप्न आहे. हे स्वप्न साकार करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याला २० लाख घरकुलाचे उद्दिष्ट प्राप्त करून घेतले आहे. सोलापूर जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजनेचा टप्पा- २ सुरू झालेला असून, चालू आर्थिक वर्षात या योजनेतून ६२ हजार ९५० घरकुले मंजूर केलेली आहेत. बेघर लाभार्थ्यांचा आवास प्लस २०२४ चे सर्वेक्षणाचे कामही सुरू आहे. तरी जिल्ह्यातील एकही बेघर लाभार्थी सर्वेक्षणापासून वंचित राहणार नाही याची दक्षता सर्वांनी घ्यावी, असे आवाहन ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६६ व्या वर्धापन दिनानिमित्त पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते सकाळी ८.०० वाजता पोलीस परेड ग्राउंड, पोलीस आयुक्त मुख्यालय, सोलापूर येथे मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ संपन्न झाला, याप्रसंगी ते मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलिस आयुक्त एम. राजकुमार, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, आमदार देवेंद्र कोठे, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, उपजिल्हाधिकारी महसूल संतोषकुमार देशमुख, पोलिस उपायुक्त अजित बोराडे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. गोरे पुढे म्हणाले की, साहित्याच्या वाढत्या किमतीमुळे घरकुल लाभार्थ्यांना निधीची कमतरता भासत होती अशा वेळेस मुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रयत्नाने घरकुल लाभार्थ्यांना राज्य हिस्स्यामधून ५० हजार रुपयांची अतिरिक्त वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये ३५ हजार रुपये घरकुल बांधकामासाठी व १५ हजार रुपये प्रधानमंत्री सूर्यघर योजनेसाठी अशी तरतूद करण्यात आलेली आहे. २ लाख ८ हजार अनुदान स्वरूपात देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या सूचनेप्रमाणे १०० दिवस कृती आराखडा अंतर्गत जिल्हा प्रशासनाने सात कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी केलेली आहे. या आराखड्याचा दुसरा टप्पा अंतर्गत सर्व प्रशासकीय यंत्रणांनी केलेल्या कामाची त्रयस्थ संस्थेकडून तपासणी लवकरच सुरू होत आहे. परंतु प्रशासनाने शंभर दिवस पूर्ण झाल्यानंतरही याच पद्धतीने लोकांना उत्कृष्टपणे सेवा देण्याचे निर्देश पालकमंत्री श्री. गोरे यांनी दिले. जिल्ह्यातील बचत गटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी सोलापूर शहरात मध्यवर्ती ठिकाणी उमेद मॉल उभारण्यात येणार आहे, त्यासाठी राज्य शासनाने २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात निधीची तरतूद केली आहे.

# विकसित भारताच्या लक्ष्यपूर्तीत सहकाराचा सिंहाचा वाटा

### सी.ए. मिलिंद काळे आणि डॉ. उदय जोशी यांच्या व्याख्यानातील सूर

### सोलापूर जनता सहकारी बँकेच्या हीरक महोत्सवी वर्षास उत्साहात प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

विकसित भारत हे समस्त भारतवासीयांचे ध्येय आहे. विकसित भारताच्या लक्ष्यपूर्तीत सहकार क्षेत्राचा सिंहाचा वाटा राहणार आहे, असा सूर सी.ए. मिलिंद काळे आणि डॉ. उदय जोशी यांच्या व्याख्यानातून उमटला. सोलापूर जनता सहकारी बँकेच्या हीरक महोत्सवी वर्षास बुधवारी उत्साही वातावरणात प्रारंभ झाला. त्यानिमित्त हुतात्मा स्मृती मंदिरात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स अँड क्रेडिट सोसायटीज लिमिटेडचे उपाध्यक्ष सी.ए. मिलिंद काळे



आणि सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी यांच्या हस्ते भारतमाता पूजन आणि दीपप्रज्वलन करून हीरक महोत्सवी वर्षाचा प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे, उपाध्यक्ष ड. मिलिंद कुलकर्णी, संचालक प्राचार्य गजानन धरणे, ड. प्रदीपसिंग राजपूत, मुकुंद कुलकर्णी, सी. ए. गिरीश बोरगावकर, राजेश पवार, पुरुषोत्तम उडता, वरदराज बंग, विनोद कुचेरिया, जगदीश भुतडा, संचालिका चंद्रिका चौहान, संचालक रवींद्र साळे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनय दुनाखे, सरव्यवस्थापक प्रदीप बुट्टे आणि विभागप्रमुख उपस्थित होते. सी.ए. मिलिंद काळे म्हणाले, भारत तिसरी जागतिक अर्थव्यवस्था होण्यासाठी सर्वसामान्य माणूस समृद्ध झाला पाहिजे. त्याकरिता सहकार हा सर्वोत्तम मार्ग आहे. अमूल कंपनी हे त्याचे मोठे उदाहरण आहे. सहकाराशी भारतीय संस्कृतीची नाळ जोडली आहे. सहकारातला पैसा गरजवंतांपर्यंत नक्की पोहोचतो. ग्राहकांनी आपला पैसा सत्कारणी लागण्यासाठी सहकार क्षेत्राशी जोडले राहणे आवश्यक आहे, असेही श्री. काळे यांनी याप्रसंगी सांगितले.डॉ. उदय जोशी म्हणाले, सहकारी संस्थांनी आजवर केलेले रचनात्मक आणि प्रामाणिक कार्य पाहता सहकारी संस्थांना निर्बंधमुक्त काम करण्यासाठी कायदे करण्याची गरज आहे. सोलापूर जनता सहकारी बँकेने सहकाराची मूल्ये जपत एकनिष्ठ ग्राहक वर्ग तयार केला आहे. तसेच उत्तम व्यवस्थापनाचे सातत्य राखत विश्वासार्हता जपली आहे, असेही डॉ. जोशी याप्रसंगी म्हणाले.

बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे म्हणाले, सर्व ग्राहक, सभासद, ठेवीदारांच्या विश्वासाच्या बळावर बँकेने यश मिळवले आहे. ग्राहकाभिमुख सेवा तंत्र कुशलता, कालानुरूप केलेले बदल यामुळे सोलापूर जनता सहकारी बँकेने २९७८ कोटी रुपयांचा व्यवसाय केला आहे. तसेच गेल्या चार वर्षात १०० कोटी रुपयांचा निव्वळ नफाही प्राप्त केला आहे, असेही अध्यक्ष श्री. पेंडसे यांनी सांगितले. बँकेचे उपाध्यक्ष अ‍ॅड. मिलिंद कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. प्रेषिता चपळगावकर आणि वसंत पोतदार यांनी सूत्रसंचालन तर संचालिका चंद्रिका चौहान यांनी आभार मानले. बालाजी यल्ला यांनी वैयक्तिक गीत तर शाखाधिकारी शैलेश मारा यांनी पसायदान सादर केले.

### एस.जे.एस.बी. हीरक कर्ज योजनेचे लोकार्पण

हीरक महोत्सवी वर्ष प्रारंभानिमित्त एस.जे.एस. बी. हीरक कर्ज योजनेचे लोकार्पण याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनय दुनाखे यांनी या कर्ज योजनेची माहिती उपस्थित ग्राहक, सभासद, ठेवीदार, हितचिंतकांना दिली.

### संस्थापक सभासदांचा प्रातिनिधिक सत्कार

सोलापूर जनता सहकारी बँकेच्या स्थापनेपासून आजवर तब्बल ५९ वर्षांपासून बँकेचे सभासद असलेल्या प्रतिनिधिक संस्थापक सभासदांचा सत्कार याप्रसंगी करण्यात आला. यात सुभाष पाटील, राम सुरवसे, रमेश चव्हाण, वैजनाथ बसवंती यांचा समावेश होता. याप्रसंगी विविध सहकारी बँकांच्या अध्यक्षांचाही सत्कार करण्यात आला.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११०४

**होईल तैसें बळ ।**
**फजीत करावे ते खळ ।।**

प्रत्येक व्यक्ती सर्व गुण संपन्न असतोच असे नाही. अर्थात प्रत्येकाकडे कांही उणीवा, दोष, त्रुटी ह्या असतातच. आपल्यातील उणीवा कमी होऊन आपण सर्वगुण संपन्न व्हावे असे वाटणाऱ्याला प्रसंगानुरुप का होईना कोणाचे तरी मार्गदर्शन घ्यावे लागते. एवढेच काय दु:खातून बाहेर पडून प्रचंड सुखाची प्राप्ती व्हावी म्हणूनही अनेकांना मार्गदर्शन, आशीर्वाद घ्यावा लागतो. मनाभावातून मार्गदर्शन किंवा आशीर्वाद घ्यावा वाटत असला तरीही देणारा मनाभावातूनच देईल का? याबद्दल सांगता येणे अशक्य असते. कारण देणाऱ्याच्या मनात कसले भाव, व्यवहार चालू आहेत हे आपण ओळखू शकत नाही. यांचे भाव ओळखण्याची ताकद आपल्याकडे असती तर कदाचित आपण यांच्याकडे गेलोच नसतो. इतरांना मार्गदर्शन करण्यासाठी किंवा आशिर्वाद देण्यासाठी आपल्याकडे तेवढे असावे लागते. पण आपल्याकडे आहे की नाही याचा विचार न करता सर्व कांही असल्याचा आव आणून समाजाला लुटण्याचे काम अनेकांकडून उघडपणे चालू असते. समाजाला लुटणाऱ्या अशा भोंदूंची भोंदूगिरी आपल्या शक्तीप्रमाणे उघडी पाडून त्यांना फजित करायला हवे. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**होईल तैसें बळ। फजीत करावे ते खळ।।**

पिवळी जर्द दिसणारी लिंबोळी आकर्षक दिसत असली तरीही ती आतून कडूच असते. त्याप्रमाणे कांही लोक पेहरावावरून साधु दिसत असले व मनात केवळ स्वार्थ, व्यवहार, व्देष जोपासत असले तर ते दुष्टच असतात, हे लक्षात ठेवावे. वाईट पांघरुणाखाली वाईट चालले तर त्याच्या तेवढा खेद वाटत नाही,जेवढा खेद चांगल्या पांघरुनाखाली वाईट चालते त्याचा वाटतो. अशा खळांना, दुष्टांना फजित करण्याची, त्यांचे भांडे उघडे पाडण्याची आपली जबाबदारी आहे. अशा दुष्टांबद्दलचे माझे लेखन वाचून एक वयोवृध्द महिला माझ्याकडे आली. ती रडून सांगत होती, साहेब माझे कुटूंब... गुरुचे शिष्य आहोत. गुरुंच्या सांगण्यावरून त्यांच्या एका शिष्याशी माझ्या मुलीचे लग्न झाले. वर्षातच संसार मोडला. हे गुरु संसार जोडण्याऐवजी जावयाची बाजू घेतात आणि आम्हाला धमक्या देतात. जावई भागवतकार आहेत, ते गुरुचेच ऐकतात. हा गुरु आपल्या शिष्याचा संसार जोडू शकत नाही. हा भागवतकार स्वत:चा संसार मोडतो, तेव्हा त्यांच्याकडून इतरांचे संसार जोडले जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. अशा लोकांच्या पाया पडून आशीर्वाद घेण्यापेक्षा त्यांची कृत्ये समाजासमोर आणली पाहिजेत. संत, महात्म्यांना बदनाम करणाऱ्या व समाजाला फसविणाऱ्या अशा दुष्टांना फजित केले पाहिजे. आपल्या समाजाचा खरा आधारस्तंभ म्हणजे साधुसंत, किर्तन, प्रवचन, भागवतकार असल्याने त्यांच्या माध्यमातून फसवणूक करणाऱ्यांना फजित करणे योग्यच होईल.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. ३ मे २०२५ | श्री नृसिंह नवरात्रारंभ, श्री अनंत |
| विक्रम संवत् २०८१ | महाराज पुण्यतिथी - अकोला |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसू | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - वैशाख | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. षष्ठी (०७.५१) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पुनर्वसु (१२.३३) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - शूल (२५.३९) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - गर (१९.२८) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** दुसऱ्याच्या भरोशावर काम टाकू नका. कौटुंबिक जीवन आनंदमय राहणार आहे.आपल्या कामातील नियमीतपणाच आपल्याला यश देणार आहे.

**वृषभ :** आळस झटकून कामास लागा. शुभकार्यात भाग घेतल्या मुळे आनंदी रहाल. शत्रूवर विजय मिळवाल.

**मिथुन :** साहस, पराक्रमात वाढ होईल. धैर्यामुळे आपली सर्वात मोठ्यातली मोठी महत्वकांक्षा पूर्ण होईल. फुकटचा मोठेपणा स्तुतीपासून दूर रहा.

**कर्क :** वायफळ बडबड करू नका. व्यापार व्यवसायात प्रगती होईल. घराची समस्या दूर होईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे.

**सिंह :** स्वाध्याय व ज्ञानात भर पडणार आहे. गुंतवणूकीच्या योजना फायदेशीर ठरतील. तणावाकडे लक्ष न देता कामे करा.

**कन्या :** भावनेच्या आधारावर कोणताही निर्णय घेऊ नका.प्रतिष्ठीत व्यक्तिंचा संप होईल ज्यामुळे आपली प्रगती होणार आहे. कायद्याचा निकाल आपल्या बाजूने लागण्याचा योग आहे.

**तुळ :** आर्थिक कामात अडचणी निर्माण होतील. संकोच केल्या मुळे आपल्याला निष्कारण नुकसान होण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** अनोळखी व्यक्तिच्या सहकार्यामुळे आत्मविश्वासात वाढ होईल. खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करा. योजलेले कामे पार पडतील. कौटुंबिक वातावरण आनंदी राहील.

**धनु :** फायद्याच्या संधी मिळून कार्यक्षमता वाढल्यामुळे उत्साह वाढणार आहे. रागावर नियंत्रण ठेवून कामे पार पाडा.

**मकर :** मान सन्मान मिळण्याच्या संधी आल्यामुळे कार्यशील रहाल. वाद विवादापासून दूर रहा. व्यापारात वेळेवर निर्णय घेऊ न शकल्यामुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. मुलांच्या कामाच्या बाबतीत समाधानी रहाल.

**कुंभ :** स्थावर संपत्तीबाबतचे वाद मिटल्यामुळे आनंदी रहाल. आरोग्याच्या तक्रारी दूर होतील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. काही निर्णय चूकीचे ठरण्याची शक्यता आहे.

**मीन :** जवळच्या व्यक्तिची भेट झाल्यामुळे आनंदी वातावरण निर्माण होईल. आधिकारी लोकांचे सहकार्य मिळेल. मुलांच्या बाबतीत चांगल्या बातम्या ऐकावयास मिळतील.

# महाराष्ट्र, कामगार दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा / सोलापूर, दि. २ मे-**
**शहरातील विविध शाळा, संस्था, संघनांतर्फे महाराष्ट्र व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सामाजिक उपक्रमांचे आयोजन करुन ध्वजारोहण करण्यात आले.**



## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष

सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे महाराष्ट्र दिनानिमित्त शहराध्यक्ष सुधीर खरटमल व माजी महापौर मनोहर सपाटे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष सुधीर खरटमल, माजी महापौर मनोहर सपाटे, प्रदेश प्रवक्ता ॲड.यु.एन. बेरिया, सेवादल प्रदेश उपाध्यक्ष सिकंदर गोलंदाज, जनरल सेक्रेटरी चंद्रकांत पवार, सूर्यकांत शेरखाने, माजी नगरसेवक पीरअहमद शेख, शहरमध्य विधानसभा अध्यक्ष जावीद शिकलकर, महिलाध्यक्ष सुनीता रोटे, रेखा सपाटे, युवती अध्यक्षा प्रतिक्षा चव्हाण, शहर उपाध्यक्ष विजय भोईटे, प्रमोद भवाळ, व्ही. डी.गायकवाड, बळीराम एडके, विष्णू शिंदे, ओबीसी सेल अध्यक्ष बिरप्पा बंडगर, शहर सरचिटणीस सुरेश कुंभार, रामप्रसाद शागालोलू, ज्ञानेश्वर सोनवणे, सोशल मीडिया अध्यक्ष शक्ती कटकधोंड, सोशल मीडिया कार्याध्यक्ष दक्षिण मल्हार शिंदे, अल्पसंख्यांक प्रसिद्धीप्रमुख लाडजी नदाफ उपस्थित होते.

## श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे महाविद्यालय

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालय,श्री सिद्रामप्पा हत्तुरे प्राथमिक शाळा, श्री मल्लिकार्जुन बालक मंदिर या शिक्षण संकुलात महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रशालेचे पर्यवेक्षक रमेश दिंडोरे, ज्येष्ठ शिक्षक बसवराज कोरे, प्रमुख अतिथी मुख्याध्यापक सचिन जाधव,बालक मंदिरच्या मुख्याध्यापिका संगिता हुमनाबादकर उपस्थित होते. प्रमुख अतिथींच्या हस्ते महात्मा गांधीजींच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमास गंगाराम घोडके, अण्णाराव तुप्पद, गुरुसिद्धप्पा पाटील, विद्याधर हुलगेरी, अनिलकुमार गावडे, अनिता हौदे, सुकेशन गंगोडा, परमेश्वर चांदोडे, गणेश कोरे, संतोष स्वामी, लक्ष्मीकांत पनशेट्टी उपस्थित होते. सूत्रसंचालन मारुती माने यांनी केले. रमेश आगवणे यांनी आभार मानले.



## शहा कोठारी प्रशाला

श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी हायस्कूलमध्ये महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक रमेश यादवाड उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रशालेतील सेवक संजय जाधव, प्रमोद शेटे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे व इयत्ता ५ वी ते ९ वी वर्गातून प्रथम क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांच्या हस्ते ध्वज पूजन करून ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ शिक्षक एस. एस. दुर्गे, टी. एम. पवार उपस्थित होते. प्रशालेतील सहशिक्षिका श्रीमती जानापुरे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन श्रीमती एस.एस. शिंदे यांनी केले तर आभार बी.एस. पाटील यांनी मानले.



## जिल्हाधिकारी कार्यालय

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६६ व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते सकाळी ७.१० वाजता ध्वजारोहण झाले. यावेळी अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, उपजिल्हाधिकारी महसूल संतोषकुमार देशमुख, उपजिल्हाधिकारी रोहयो अंजली मरोड, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, तहसीलदार श्रीकांत पाटील उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना तंबाखू मुक्तीची शपथ दिली.

प्रारंभी ध्वजारोहण नंतर राष्ट्रगीत व राज्यगीत गायन झाले. दरम्यान, महाराष्ट्र राज्य दिनानिमित्त अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर यांच्या हस्ते जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतमध्ये ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला. यानंतर राष्ट्रगीत व राज्य गीत गायन झाले. यावेळी जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, तहसीलदार समीर यादव, तहसीलदार दिनेश पारगे उपस्थित होते.



## नागेश करजगी ऑर्किड स्कूल

नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे प्रमुख डॉ. कुमार करजगी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेच्या सचिवा वर्षा विभुते, स्कुलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी,प्राचार्या रुपाली हजारे,शाळेच्या मार्गदर्शिका मीना पारखे उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्या रुपाली हजारे यांनी महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने सर्वांना शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन व आभार तृप्ती चाटी यांनी केले.

## तेलुगु भाषाभिवृध्दी सार्वजनिक ग्रंथालय

पूर्वभागातील तेलुगु भाषाभिवृध्दी सार्वजनिक ग्रंथालयच्या वतीने मराठी राजभाषा दिन, महाराष्ट्र दिन, कामगार दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ग्रंथालयम्चे अध्यक्ष मल्लिकार्जुन कमटम म्हणाले, स्वातंत्र्यसैनिक पोट्टी श्रीरामलु यांनी भाषावार प्रांतरचनेसंदर्भात केलेल्या सत्याग्रहाची दखल घेऊन तत्कालिन पंतप्रधान पंडित नेहरु यांनी भाषावर प्रांतरचनेचा कायदा पारित करुन घेतला. कवी नरेंद्र गुंडेली यांनी महाराष्ट्र राज्याची निर्मिती, त्यासाठी करावा लागलेला संघर्ष आणि १०६ जणांना पत्करावे लागलेले हौतात्म्य याविषयी सविस्तर विवेचन केले. याप्रसंगी प्रभाकर भीमनाथ, बालराज बोल्ली, तिपण्णा गणेरी, विजयालक्ष्मी गुडुर, राजलक्ष्मी गाडपल्ली, सुरेखा सरवदे, सुनील भडंगे, हर्षवर्धन माणेकरी उपस्थित होते.



## सुरवसे शिक्षण संस्था

सोलापूर - होटगी रोडवरील सुरवसे शिक्षण संस्थेत महाराष्ट्र दिन संपन्न झाला. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे होते तर संस्थेच्या सचिवा विजयाताई सुरवसे सेवानिवृत्त पी. एस. आय. प्रदीप देशमुख प्राचार्या उज्वलाताई साळुंखे प्राथमिक विभागाचे दीपक डांगे बालक मंदिर विभागाच्या शुभांगी लोखंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्रक व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास महाराष्ट्र दिनानिमित्त संस्थेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. तर भारतीय जैन संघटनेच्या राज्य कार्यकारणीवर निवड झाल्याबद्दल श्याम पाटील यांचाही सन्मान करण्यात आला.

## एन.ए.बी. निवासी अंधकार्यशाळा

एन.ए.बी. निवासी अंधकार्यशाळेमध्ये महाराष्ट्र दिन व कामगार दिन कार्यक्रमाचे अध्यक्ष रामचंद्र कुलकर्णी व प्रमुख पाहुणे नॅब संस्थेचे उपाध्यक्ष अंकुश कदम होते. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. कामगार दिनानिमित्त अंधकार्यशाळेतील संजयकुमार कलाल, श्रीनिवास समदूर्ले, भागीरथी नाईकवाडे, शुभम वांझरे, संदेश कांबळे व अर्चना अंजनाळकर यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन व आभार रियाज मुल्ला यांनी मानले.



# आज राज्यस्तरीय बौद्ध साहित्य संमेलन

## श्रीलंकेचे भंते यश यांच्या हस्ते उद्घाटन

## समारोप सत्रात डॉ. भीमराव आंबेडकर यांचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे -**

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने क्रांतीप्रवण झालेल्या सोलापूर नगरीत शनिवार दि. ३ मे रोजी सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत हुतात्मा स्मृती मंदिरात( लुम्बीनी नगरीत) राज्यस्तरीय बौद्ध साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये भंते यश यांची धम्मदेसना, डॉ. भीमराव आंबेडकर यांचे मार्गदर्शन आणि विविध परिसंवादातून धम्म विचारांचा जागर होणार आहे, अशी माहिती संमेलनाचे स्वागताध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

बौद्ध साहित्य मंडळाच्या वतीने आयोजित या संमेलनाचे उद्घाटन शनिवारी सकाळी १० वाजता श्रीलंकेचे भंते यश यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी भंते यश यांची धम्मदेसना होणार आहे. ज्येष्ठ साहित्यिक तथा माजी शिक्षणाधिकारी योगीराज वाघमारे हे या संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत.यावेळी संमेलनाचे अध्यक्ष वाघमारे यांचे अध्यक्षीय भाषण होईल. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक धर्मादाय आयुक्त संजय पाईकराव पोलीस उपायुक्त डॉ. दिपाली काळे, जि.प.पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, जि.प. सोलापूर प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी कादर शेख, कुर्डूवाडी नगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी शाहू सतपाल आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. दुपारी १ वाजता पहिल्या परिसंवादात धर्मांतरोत्तर सामाजिक पुनर्बांधणीसाठी आंबेडकरी प्रेरणेच्या साहित्यिकांची भूमिका कितपत पोषक या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. आनंद देवडेकर तर प्रा.डॉ. सारीपुत्र तुपेरे प्रा. डॉ. एम. डी. शिंदे या वक्त्यांचा सहभाग राहणार आहे. दुपारी २ ते २.३० दरम्यान सर्वांसाठी भोजन व्यवस्था करण्यात आली आहे. दुपारी २.३० वाजता दुसरा परिसंवाद होणार असून यामध्ये बौद्ध म्माची आधुनिक काळात गरजया विषयावर प्रमुख वक्ते म्हणून मुंबई येथील सिद्धार्थ महाविद्यालयातील प्रा. डॉ. विजय मोहिते हे विचार मांडणार आहेत. यामध्ये प्रा. डॉ. संघप्रकाश दुड्डे (सोलापूर), उपप्राचार्य प्रकाश शिंदे या मान्यवरांचा सहभाग राहणार आहे. दुपारी ३.३० वाजता होणाऱ्या तिसऱ्या परिसंवादात राठी भाषेत बौद्ध साहित्य निर्मिती- काल - आज - उद्या या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ विचारवंत दत्ता गायकवाड तर साहित्यिक प्रा. डॉ. धम्मपाल माशाळकर, पत्रकार, लेखक दत्ता थोरे हे विचार मांडतील. सायंकाळी ४.३० वाजता धम्म चळवळीत महिलांचे योगदान या विषयावर चौथा परिसंवाद होणार आहे. यामध्ये प्रमुख वक्त्या प्रा. रेखा मेश्राम, प्रा. डॉ. अंजना गायकवाड, प्रा. अहिल्या गायकवाड-कांबळे,शारदा गजभिये, धम्मरक्षिता कांबळे या विचार मांडणार आहेत. दरम्यान, सायंकाळी ५.३० वाजता होणाऱ्या पाचव्या परिसंवादात पाली भाषेतील बौद्ध साहित्य या विषयावर प्रमुख वक्ते तथा विद्यापीठाचे पाली भाषा विभाग प्रमुख प्रा. डॉ. विजयकुमार झुंबरे आणि डॉ. औदुंबर मस्के, प्रा. डॉ. देविदास गायकवाड, डॉ. सुभाष कांबळे आदी विचार मांडणार आहेत. सायंकाळी सात वाजता समारोप सत्रात प्रमुख अतिथी म्हणून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू तथा भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भीमराव आंबेडकर हे मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी रिपाइं(ए)चे प्रदेशाध्यक्ष तथा माजी मंत्री राजाभाऊ सरवदे, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष राजाभाऊ इंगळे, ज्येष्ठ नेते सुभानजी बनसोडे, भीमशक्ती संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष सुबोध वाघमोडे, रिपाइंचे ज्येष्ठ नेते के. डी. कांबळे, बसपाचे प्रदेश महासचिव ॲड. संजीव सदाफुले, कामगार नेते अशोक जानराव, कामगार नेते जनार्दन शिंदे, माजी गटनेते आनंद चंदनशिवे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा सरचिटणीस अनिरुद्ध वाघमारे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. पत्रकार परिषदेस कोषाध्यक्ष किरण बनसोडे, समन्वयक डॉ. सुरेश कोरे, कार्यवाह भालचंद्र साखरे, प्रा. वशिष्ठ सोनकांबळे, अण्णासाहेब वाघमारे सदस्य उपस्थित होते.





### संमेलनाची ठळक वैशिष्ट्ये

* संमेलन विचार मंचाला सारनाथ तर ग्रंथदालनास नालंदा नाव
* एकूण ५ परिसंवाद तर एका लघुनाटिकेचा समावेश
* विविध महत्त्वपूर्ण विषयांवर होणार ठराव मंजूर
* शाक्य संस्था, सिदनाक ब्रिगेड, समता सैनिक दल या दलांची सलामी
* स्फूर्तीदायी गीतांचा कार्यक्रम

### 'मोहब्बत की किताब' नाटिकेद्वारे संविधान जागर

दरम्यान, सायंकाळी ६.३० वाजता प्रबोधनात्मक नाटिका' मोहब्बत की किताब' नाटिकेद्वारे संविधान जागर होणार आहे.राज्यकर निरीक्षक अभियंता बुद्धजय भालशंकर लिखित आणि भागवत कुवळेकर दिग्दर्शित या भारतीय संविधानाचे महत्त्व विशद करणार्या लघु नाटिकेचे सादरीकरण होणार आहे. यामध्ये बुद्धजय भालशंकर, भागवत कुवळेकर, शशिकांत जाधव, सविता कुवळेकर यांची प्रमुख भूमिका राहणार आहे, असे समन्वयक डॉ. सुरेश कोरे यांनी सांगितले.

## गवळी समाजाच्या २३ जोडप्यांचा सामुदायिक विवाह



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे -**

सोलापूर : श्री सिदाजीअप्पा प्रतिष्ठानतर्फे सोमवार दिनांक ५ मे रोजी गवळी समाजातील २३ जोडप्यांचा सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे संस्थापक सुरेश शहापूरकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

५ मे रोजी सायंकाळी ७ वाजता जुनी मिल कंपाऊंड येथे हा कार्यक्रम होणार आहे. संस्थेतर्फे सन २००२ पासून हा उपक्रम राबवण्यात येतो. आतापर्यंत ४९२ जोडप्यांचे विवाह करण्यात आले आहेत. महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, तेलंगणा येथील जोडप्यांचा या सोहळ्यात विवाह करण्यात येणार आहे. तत्पूर्वी चार वाजता गणपती घाट येथून वधू-वरांची सवाद्य मिरवणूक करण्यात येणार आहे या पत्रकार परिषदेला संस्थेचे अध्यक्ष अनिल गवळी, सचिव प्रभाकर परळकर, विजयदत्त लकडे आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### बालनाट्य शिबिरांमधून मुलांना स्वत:ची ओळख निर्माण होते : मोहिते-पाटील

**अकलूज, दि. २ मे-**

बालनाट्य शिबिरांमधून मुलांना अभिनयाची ओळख होते. त्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळते आणि आत्मविश्वास वाढतो. विविध विषयांवरील प्रात्यक्षिकं व चर्चांमुळे त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे प्रतिपादन शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते-पाटील यांनी केले. अकलूज येथे अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई शाखा अकलूजच्यावतीने सात दिवसीय नृत्य, नाट्य व अभिनय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. शिबिरात ७८ मुलांचा सहभाग प्रशिक्षण कार्यशाळेत झाला आहे. डिजीटल युगात नाट्य व नृत्यकला जपणे अवघड आहे, मात्र परिषद हे कार्य सातत्याने करत आहे, असेही मोहिते-पाटील यांनी सांगितले. या उद्घाटनप्रसंगी शिवरत्न शिक्षण संस्थेचे सचिव धर्मराज दगडे, नाट्य परिषद नियामक मंडळाचे सदस्य डॉ. विश्वनाथ आवड, संचालक श्रीकांत राऊत, सहकार्यवाह सुनील कांबळे, लालासाहेब मुजावर, प्रशिक्षक मनोज वर्दम, आशिकी चिंतामणी उपस्थित होते.




### शिंगोर्णी येथे भाजपाच्या शाखेचा शुभारंभ

**पिलीव, दि. २ मे-**

माळशिरस तालुक्यातील शिंगोर्णी येथे भाजपाच्या शाखेचे उद्‌घाटन माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी रामभाऊ सातपुते यांनी शिंगोर्णी गावच्या पाणीप्रश्नासह इतर विकास कामांसाठी कटीबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश पाटील, माळशिरस मंडल अध्यक्ष नितीन मोहीते, शिवराज पुकळे, राहुल मदने, डॉ. समीर साठे, शिंगोर्णी शाखेचे अध्यक्ष महादेव काळेल, उपाध्यक्ष बाळासो जाधव, कार्याध्यक्ष रतन आटपाडकर, सरचिटणीस दऱ्यापा गोडसे, सचिव बापू ऐवळे, खजिनदार नानासो गायकवाड, संघटक तानाजी मोरे, सहसंघटक निलेश जाधव, सदस्य बाबुराव दगडे, संजय काळेल, ब्रम्हदेव जाधव, दिलीप धांडोरे उपस्थित होते.




### सुभाष गुळमे मित्रमंडळाच्या वतीने पाणपोईचे उद्‌घाटन

**करकंब, दि. २ मे-**

करकंब थोरली वेस येथे सुभाष गुळमे मित्र मंडळाच्यावतीने पाणपोईचे उद्घाटन निवृत्त पोलीस अधिकारी बिरूदेव पारेकर, प्राध्यापक प्रदीप पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी पै. सुभाष गुळमे, अमोल शेळके, लक्ष्मण वंजारी, संतोष धोत्रे, जयंत टकले, पप्पू गायकवाड, नवनाथ नलावडे, अनिल शिंदे, अर्जुन शेटे, प्रविण गुळमे, सचिन गुळमे, अतुल अंभगराव, औदुंबर कुंभार, दत्तात्रय जाधव, धनंजय गुळमे, फिरोज तांबोळी उपस्थित होते.



### 'भगवंत'च्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना निरोप

**बार्शी, दि. २ मे-**

येथील भगवंत इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकॉम्म्युनिकेशनच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन संकुल संचालक ऋतुराज सावंत लाभले. समारंभाची सुरुवात विद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एन. शिराळ यांनी केली. त्यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या शेवटी, विद्यार्थ्यांनी आपल्या आठवणींना उजाळा दिला आणि शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमास विभाग प्रमुख प्रा. लिमकर एन.एस., प्रा बुद्रुक ए.व्ही., प्रा. सरवदे ए. एम. उपस्थित होते.



### वीरशैव संघटनेतर्फे बसव जयंती साजरी

**अक्कलकोट, दि. २ मे-**

अखिल भारतीय वीरशैव युवक संघटना वतीने महात्मा बसवेश्वर जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी महात्मा बसवेश्वर यांच्या मूर्तीचे पूजन श्री.ष.ब्र शांतवीर शिवाचार्य चलगेरी, माजी नगरसेवक सुनिल कटारे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. याप्रसंगी अरविंद भडोळे, परमेश्वर अरबळे, मल्लीनाथ पाटील, तालुका उपाध्यक्ष रविकांत कुरे, सरचिटणीस मल्लीनाथ महादेव, शांतेश्वर पाटील, शिवा जावळे, मल्लीनाथ घंटे, राजू भुशेट्टी, संदिप कटकधोंड उपस्थित होते.

# सामाजिक उपक्रमांनी महाराष्ट्र, कामगार दिन साजरा

## जिल्ह्यात शाळा, संस्था, संघटनांतर्फे ध्वजारोहण; विविध स्पर्धांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

**महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त जिल्ह्यातील विविध शाळा, संस्था, संघटनांतर्फे विविध सामाजिक उपक्रम घेण्यात आले. यावेळी विविध स्पर्धांचे आयोजन करुन मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.**



### पंढरपूर तहसील कार्यालय

महाराष्ट्र दिनानिमित्त तहसिल कार्यालय, पंढरपूर येथे प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तहसील कार्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या या ध्वजारोहण सोहळ्यास तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, नायब तहसिलदार बालाजी पुदलवाड, विजय जाधव, वैभव बुचके उपस्थित होते. यावेळी राष्ट्रगीत व राज्य गीत गायन झाले. तसेच पोलीस पथकाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. याप्रंसगी स्वांतत्र्यसैनिक, शासकीय अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी व नागरीक उपस्थित होते.

### श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्त निवास, पंढरपूर

महाराष्ट्र दिनानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास येथे मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या ध्वजारोहण सोहळ्यास मंदीर समितीच्या सदस्या शकुंतलाताई नडगिरे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख (जळगावकर) तसेच विभाग प्रमुख पृथ्वीराज राऊत, संजय कोकीळ, बलभीम पावले, राजेंद्र सुभेदार, पांडुरंग बुरांडे, राजेश पिटले, ज्ञानेश्वर कुलकर्णी, राजाराम ढगे, शंकर मदने, राजेंद्र घागरे, प्रशांत सर्वगोड, सावता हजारे, दादा नलवडे व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

### माळशिरस शहर व परिसर

माळशिरस शहर व परिसरात १ मे हा महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. येथील तहसिल कार्यालयात आमदार उत्तमराव जानकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळीतहसिलदार सुरेश शेजूळ नायब तहसिलदार अतुल म्हेत्रे, सिद्धेश्वर जावीर उपस्थित होते. पंचायत समिती कार्यालयात गटविकास अधिकारी आबासाहेब पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विविध विभागाचे प्रमुख अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. नगरपंचायत कार्यालयात नगराध्यक्ष नगराध्यक्ष विजय देशमुख यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी मुख्याधिकारी सुमित जाधव यांचेसह नगरसेवक,अधिकारी कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. तालुका कृषी कार्यालयात तालुका कृषी अधिकारी आबासाहेब रूपनवर यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. माळशिरस पोलीस ठाण्यात ए.पी.आय.संदीप गोसावी यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी पोलीस कर्मचारी उपस्थित होते. वनपरिक्षेत्र कार्यालय वनपरिक्षेत्र कार्यालय वनपरिक्षेत्र अधिकारी राजेंद्र आटोळे यांच्या ध्वजारोहण करण्यात आले. गोपाळराव देव प्रशाला व ज. च. आगाशे कनिष्ट महाविद्यालयात डी.एल. कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कन्या प्रशालेत अध्यक्ष अजय पाटील यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक दत्तात्रय वाघमोडे उपस्थित होते. श्रीनाथ विद्यालयात नगरसेवक वैभव जानकर यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक योगेश गुजरे उपस्थित होते. समीर गांधी कला महाविद्यालय व विष्णूपंत कुलकर्णी इंग्लिश स्कूल मध्ये मुख्याध्यापिका अपर्णा इनामदार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले विद्यालयात अध्यक्ष रघुनाथ बोराटे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी मुख्याध्यापक किसन म्हेत्रे उपस्थित होते. माळशिरस प्रशालेमध्ये मुख्याध्यापक शरद सावंत यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

### अनंत चैतन्य प्रशाला, अक्कलकोट

महाराष्ट्र दिनानिमित्त अनंत चैतन्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला, हन्नूर येथे प्रशालेचे प्राचार्य अशोक साखरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. स्वप्नाली जमदाडे यांनी १ मे महाराष्ट्र दिनाविषयी महती सांगितली. यावेळी पर्यवेक्षक ज्ञानेश्वर शिंदे, सांस्कृतिक विभाग प्रमुख अप्पासाहेब काळे, शहाजी माने, सरदार मत्तेखाने, रविंद्र कालीबत्ते, शशिकांत अंकलगे, धनंजय जोजन, मृदुलादेवी स्वामी उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग सहाय्यिका मल्लम्मा चप्पळगाव यांनी केले.



### मोडनिंब ग्रामपंचायत कार्यालय

मोडनिंब (ता.माढा) येथे मोडनिंब ग्रामपंचायत कार्यालय महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. यावेळी मोडनिंब गावच्या सरपंच लक्ष्मी पाटील, उपसरपंच अमित कोळी, ग्रामपंचायत सदस्य कैलास तोडकरी, बालाजी पाटील,दत्तात्रय सुर्वे, सदाशिव पाटोळे, बाबुराव सुर्वे, डॉ. नवनाथ मोहिते, संतोष पाटील, राहूल पाटील, विशाल मस्के, किरण खडके, अतुल गाडे, अनिल सावंत, उद्धव जाधव, किरण तोडकरी, चंद्रकांत गिड्डे, शिवाज्ञा फायनान्सचे आप्पा पाटील, विशाल पाटील, युवा उद्योजक शुभम पाटणे, राज पाटील, मयूर नामदे, गणेश महामुनी, प्रथमेश पवार, अरुण सुर्वे उपस्थित होते.

### स्वेरी महाविद्यालय, पंढरपूर

येथील स्वेरी महाविद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.एम. जी. मणियार यांनी भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण केले. राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीतानंतर प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी महाराष्ट्र व कामगार दिन का साजरा करायचा हे पटवून दिले. यावेळी उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, डॉ. महेश मठपती, डॉ. एम.पी. ठाकरे, डॉ. आर. आर. गिड्डे, डॉ. एस. बी.भोसले, डॉ. एस. पी. पवार, डॉ. एस. एस. वांगीकर, डॉ. कमल गलानी उपस्थित होते.



### अक्कलकोट नगरपरिषद

महाराष्ट्र दिनानिमित्त अक्कलकोट नगरपरिषद अक्कलकोट यांच्या वतीने घेण्यात आलेल्या निबंध व चित्रकला स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा प्रियदर्शिनी मंगल कार्यालय येथे पार पडला. श्रीमंत राणी निर्मलाराजे कन्या प्रशाला अक्कलकोट येथील सहा विद्यार्थिनींनी निबंध व चित्रकला स्पर्धेमध्ये पुरस्कार प्राप्त केला. प्रथम क्रमांकास: प्रशस्तीपत्रक, शिल्ड व रोख तीन हजार रुपये व द्वितीय क्रमांक: प्रशस्तीपत्र शील्ड व रोख दीड हजार रुपये, तृतीय क्रमांक प्रशस्तीपत्र शील्ड व रोख एक हजार रुपये प्रदान करण्यात आले. श्रावणी गवंडी प्रथम, भाग्यश्री नंदीकोले द्वितीय, श्रेया कुंभार हिने तृतीय क्रमांक पटकाविला. चित्रकलामध्ये धनेश्वरी मिराशे प्रथम, अंबिका कोरे द्वितीय, आर्या जामदार हिने तृतीय क्रमांक पटकाविला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थीनींचे मुख्याध्यापक जंगाले यांनी अभिनंदन केले.



### श्री स्वामी समर्थ शिशु विकास मंदिर, अक्कलकोट

महाराष्ट्र दिनानिमीत्त ए वन चौक येथील श्री स्वामी समर्थ शिशु विकास मंदिर येथे देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी देवस्थानचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्वलाताई सरदेशमुख, संतोष पराणे, श्रीशैल गवंडी, स्वामी लोणारी, गिरीश पवार, स्वाती गाडे, नारायणकर, काशिनाथ इंडे, संजय पवार, सागर गोंडाळ, संजय मोरे, दर्शन घाटगे, धनराज स्वामी उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर सर्व मान्यवरांना व विद्यार्थ्यांना देवस्थानच्या वतीने अल्पोपहाराची सोय करण्यात आली होती.

### कल्याणशेट्टी शिक्षण संकुल, अक्कलकोट

सौ. सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय तसेच गिरजामाता प्राथमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी उपस्थित होते. यावेळी संस्थेचे संचालक भीमराव साठे, सीनियर कॉलेजचे प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, प्रशालेचे मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुरेश आवटे, पर्यवेक्षक सूर्यकांत रुगे, राजकुमार गवळी, श्रीदेवी मायनाळे, सिद्रामप्पा पाटील, बाबूशा मंगरुळे व पालक मल्लिनाथ बोधले उपस्थित होते. सूत्रसंचालन कल्पना स्वामी त्यांनी केले तर आभार दिगंबर जगताप यांनी मानले.





### घोळसगाव जि.प. शाळा

अक्कलकोट येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा घोळसगाव येथे महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला.यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामेश्वर पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अध्यक्षांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. तसेच सन २०२४ -२५ या शैक्षणिक वर्षातील १ली ते ७ वी तील विद्यार्थ्यांचा निकाल अध्यक्षांच्या हस्ते जाहीर करण्यात आला. मुख्याध्यापक मोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन ठाकर यांनी केले. यावेळी शाळेतील शिक्षक गुंजोटी, दरेकर, वागदरकर, डाळे उपस्थित होते.



### कै. नामदेवराव जगताप उर्दू शाळा, करमाळा

करमाळा शहरातील कै.नामदेवराव जगताप न.प.उर्दु शाळेत आज महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने GTS राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत करमाळा येथील कै. नामदेवराव जगताप उर्दू शाळेतील विद्यार्थ्यांनी आलीना इलियास शेख हीने सोलापूर जिल्ह्यात पहिला क्रमांक पटकावला व राज्यात तेरावा क्रमांक मिळविल्या तसेच बरीरा सादिक शेख या विद्यार्थ्यांनीचा जिल्ह्यात तीसरा क्रमांक आल्याबद्दल शाळा व्यवस्थापन समितीतर्फे अध्यक्ष मजहर शेख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक जुबेर जनवाडकर, मौलाना मोहसीन, मौलाना सिकंदर, हाफीज अन्वर, शकुर शेख, अजहर शेख, आनिस कुरेशी, हाजी ख्वाजा हुसेन कुरेशी, हाफीज कादर सहाब, मुजावर, राजू नालबंद, मजहर पठाण, इम्रान शेख, इस्माईल सय्यद, अजहर शेख, इक्बाल शेख उपस्थित होते यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे, केंद्र समन्वयक दयानंद चौधरी, शिवदास कोकाटे, मुख्याध्यापक जुबेर जनवाडकर यांनी अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना निगार मुंडेवाडी यांचे मार्गदर्शन लाभले.

### श्री शंकरलिंग प्रशाला, वळसंग



वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत महाराष्ट्र दिन व कामगार दिन संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य श्री वीरेश थळंगे होते. मिस्त्री कामगार भिमाशंकर चौगुले यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले तर श्री स्वामी समर्थ सूतगिरणीचे कामगार बाबू घोडके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पर्यवेक्षक शिवानंद घोडके, संजयकुमार धनशेट्टी, सिध्दाराम भैरामडगी, बाळकृष्ण गुंड, निलकंठ कवटगी, श्रीमंत भोसले प्रा. संतोष शिंदे, विजयालक्ष्मी थळंगे, शैला निंबाळ उपस्थित होते. या दिनाचे औचित्य साधून प्रशालेतील इयत्ता पाचवी ते नववी व इयत्ता अकरावी या वर्गांचे वार्षिक निकाल जाहीर करण्यात आले. याप्रसंगी यावेळी सिद्धारूढ हिरेमठ, बसवराज दुधगी, वीरेश थळंगे, गंगाधर बिराजदार, संतोष कस्तुरे, मल्लिनाथ गौडगाव, विजय प्याटी, अजय माणकोजी, प्राध्यापक शरणय्या मसुती, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोदे, रुपाली कलशेट्टी, प्राध्यापिका प्रतिभा तांडुरे, वरिष्ठ लिपिका राजश्री दुधगी, कनिष्ठ लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, कर्मचारी कट्टेप्पा कोळी, विनोद दुधगी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार यांनी मानले.

### श्री संत दामाजी साखर कारखाना

श्री संत दामाजी साखर कारखाना कार्यस्थळावर महाराष्ट्र व कामगार दिन साजरा करण्यात आला. चेअरमन शिवानंद पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांचे प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी व्हाईस चेअरमन तानाजी खरात, संचालक सर्वश्री मुरलीधर दत्तू, गौरीशंकर बुरकूल, गोपाळ भगरे, राजेंद्र चरणुकाका पाटील, भारत बेदरे, दयानंद सोनगे, औदुंबर वाडदेकर, रेवणसिद्ध लिगाडे, भिवा दोलतडे, बसवराज पाटील, गौडाप्पा बिराजदार, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे, तानाजी कांबळे, तानाजी काकडे, सुरेश कोळेकर, रमेश जायभाय, चिफ अकौंटट रमेश गणेशकर, शेती अधिकारी कृष्णा ठवरे, कार्यालय अधिक्षक दगडु फटे, हेड टाईम किपर आप्पासो शिनगारे, स्टोअर किपर उत्तम भुसे, संदिप इंगोले, प्रकाश पाटील, विठ्ठल गायकवाड, विश्वास सावजी उपस्थित होते.



CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महाराष्ट्रदिनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दोन टन फुलांनी सजावट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ मे-**

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६६ व्या वर्धापन दिनानिमित्त गुरुवारी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात व गाभाऱ्यात विविध फुलांची आकर्षक सजावट करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

फुलांची ही सजावट पुणे येथील धायरीगावचे विठ्ठलभक्त चव्हाण परिवार यांनी सेवाभावी तत्त्वावर मोफत केली.

या सजावटीमुळे श्रींचा गाभारा मनमोहक व आकर्षक दिसत होता. यासाठी ब्लू डीजी १५०० गड्डी, स्टेटस १५०० गड्डी, कामिनी १५०० गड्डी, जिप्सो १०० गड्डी, ऑर्किड ५ गड्डी, जरवेरा २० गड्डी, दस गुलाब २० गड्डी, झेंडू भगवा ३०० किलो, झेंडू पिवळा ३०० किलो इत्यादी दोन टन फुलांचा वापर करण्यात आला होता.



## महत्वाचे...

### प्रा.कविता रुही यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पी.एचडी पदवी

**अक्कलकोट, दि. २ मे-**



अक्कलकोट तालुक्यातील प्रा.कविता राहुल रुही यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची हिंदी विषयातील पी. एचडी पदवी प्राप्त झाली असून त्यांनी हिंदी विषयात एकविसाव्या शतकातील प्रथम दशकातील प्रदर्शित नाटकांवर प्रबंध सादर केला होता. त्याला विद्यापीठाने विद्यावाचस्पती पदवी बहाल केली आहे. या यशाबद्दल त्यांचे केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले, सीमाताई आठवले, सोलापूर विद्यापीठ सिनेट सदस्य राजाभाऊ सरवदे, राज्यसभा खासदार चंद्रकांत हांडोरे, अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार जयदेव गायकवाड, पुण्याच्या उपमहापौर सुनीता वाडेकर, परशुराम वाडेकर, अधिष्ठाता डॉ.विजय खरे, खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, टी.जे.कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे, मीना मनचंदा, अविनाश कोल्हे, अविनाश मडीखांबे, चंद्रशेखर मडीखांबे, उत्तम गायकवाड, अमोलराजे भोसले, महेश इंगळे, अजय मुकणार यांनी अभिनंदन केले. तर या प्रबंधात मार्गदर्शक डॉ.विजयकुमार रोडे, हिंदी विभागाध्यक्ष डॉ.सदानंद भोसले, डॉ.शशिकला राय यांनी मार्गदर्शन केले.



### प्रभारी प्राचार्यपदी प्रा. डॉ. शिखरे

**बार्शी, दि. २ मे-**


येथील कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या प्रभारी प्राचार्यपदाची धुरा प्रा. डॉ. व्ही. पी. शिखरे यांना देण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदकुमार जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, संस्थेचे कार्यकारणी सदस्य, संस्थेचे सदस्य यांनी ही जबाबदारी त्यांच्याकडे दिली. याप्रसंगी विविध शाखांचे शाखाप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक यांनी डॉ. शिखरे यांचे अभिनंदन केले. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या विचारांचा वसा आणि वारसा घेऊन कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शीच्या नावलौकिकात भर घालण्याची जबाबदारी संस्थेने दिलेली आहे. ती प्रामाणिकपणे पार पाडण्याचा मी प्रयत्न करणार आहे, असे डॉ. शिखरे यांनी अभिवचन दिले.




### वक्तृत्व स्पर्धेत स्वराज दवणे प्रथम

**करमाळा दि.२ मे-**

दौंड येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत त्रिमूर्ती विद्यालय व रामराजे कोकाटे जुनिअर कॉलेज टाकळीचा इयत्ता पाचवीचा विद्यार्थी स्वराज रविंद्र दवणे याने इयत्ता पाचवी ते आठवी या गटात प्रथम क्रमांक मिळवला विद्यालयाचे प्राचार्य श्री राजेंद्र कोकाटे संस्थेचे अध्यक्ष रामभाऊ कोकाटे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व कोर्टी ग्रामस्थांनी स्वराज चे अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीस हार्दिक हार्दिक शुभेच्छा दिल्या. प्रा. रविंद्र दवणे यांनी याचं स्पर्धेत खुल्या गटामध्ये तृतीय क्रमांक मिळवला त्यांनाही संस्थेच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.



### कोर्सेगाव जि.प. शाळेचे शिष्यवृती परीक्षेत यश

**सोलापूर, दि. २ मे-**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे मार्फत घेण्यात आलेल्या शिष्यवृती परिक्षेत कोर्सेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा विद्यार्थी रविकांत संगपाळ यांनी १७६ गुण मिळवून तर दर्शन बसवराज डोंगरे या विद्यार्थ्याने १२२ गुण मिळवून पात्र झाले आहेत. तसेच नवोदय विद्यालय परीक्षेत रविकांत संगपाळ या विद्यार्थ्याने ९० गुण मिळवले आहेत. या दोन्ही विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक शंकर कोळी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक बसवराज पाटील, सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हा अध्यक्ष तथा सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेचे संचालक वीरभद्र यादवाड, मारुती जावीर, अशोक सदरखेड, महादेव राठोड, मल्लिकार्जुन पाटील, प्रवीण राठोड, प्राजक्ता कुलकर्णी, सुलभा लोखंडे, राजश्री राठोड, लक्ष्मण आळगी, माजी उपसभापती रामचंद्र अरवत, शिवानींगप्पा अरवत, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष उपाध्यक्ष अमोल अरवत यांनी अभिनंदन केले.

# कॉरिडॉरसाठी जबरदस्तीने भूसंपादन केले जाणार नाही

## जिल्हाधिकारी आशीर्वाद; स्थानिक नागरिक, व्यापारी, विक्रेते यांना विश्वासात घेणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२ मे-**

पंढरपुरात पायाभूत सुविधांसाठी विकास आराखडा तयार करताना लोकप्रतिनिधी, स्थानिक नागरिक, व्यापारी, वारकऱ्यांना विश्वासात घेणार आहे. तसेच कॉरिडॉरसाठी जबरदस्तीने भूसंपादन केले जाणार नसल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

पंढरपूर येथील कॉरिडॉरबाबत स्थानिक नागरिक व्यापारी विक्रेते यांच्याशी प्राथमिक चर्चा करून अडचणी जाणून घेण्यासाठी गुरुवारी केबीपी कॉलेज येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस उपजिल्हाधिकारी तथा भूसंपादन समन्वयक संतोष देशमुख, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांच्यासह मंदिर परिसरातील नागरिक, व्यापारी, विक्रेते उपस्थित होते.



### बैठकीस २१७नागरिकांची उपस्थिती

कॉरिडॉरबाबत बैठकीस दुपारी १ ते २ या वेळेत चौफाळा ते पश्चिमद्वार उत्तर बाजू (आतील) या ठिकाणच्या १२६ नागरिकांना बोलवण्यात आले होते. त्यातील १०१ नागरिक उपस्थित होते. दुपारी २.३० ते ३.३० वाजता पश्चिमद्वारा ते महाद्वार उत्तर बाजू (आतील) या ठिकाणच्या ६४ नागरिकांना बोलवण्यात आले होते त्यातील ४८ नागरिक उपस्थित होते. दुपारी ४ ते ५ वाजता दर्शन मंडप, पाण्याचा हौद ते महाद्वार घाट, शिंदे वाडा दक्षिण बाजू (आतील बाजू) या ठिकाणच्या ८७ नागरिकांना बोलवण्यात आले होते त्यातील ६८ नागरिक उपस्थित होते. असे एकूण २१७ नागरिक उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले, मंदिर परिसरातील सर्व्हे केबीपी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमार्फत केला जाईल. मालमत्ताधारक, व्यापारी, विक्रेते यांनी एकूण क्षेत्र, व्यवसाय त्यातून मिळणारे उत्पन्न याची माहिती द्यावी. या माहितीच्या आधारे डाटा तयार करण्यात येऊन त्याबाबत पॅकेज तयार करण्यात येईल. त्याबाबत नागरिकांचे मत घेऊनच शासनाला सादर केले जाईल. नगरपालिका व पोलीस प्रशासनाने पथक तयार करून तत्काळ शहरातील अतिक्रमणे काढावीत अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. कॉरिडॉरबाबत कोणाचेही नुकसान होऊ नये यासाठी नागरीवस्तीत करण्यात आलेल्या मुंबई मेट्रोच्या भूसंपादनाची पाहणी व माहिती घेण्यासाठी पथक पाठवण्यात आले होते. कॉरिडॉर झाला तर कमीत कमी जागा घेऊन जास्तीत जास्त लाभ कसा देता येईल याबाबत प्रयत्न करण्यात येईल. काशी विश्वनाथ येथे कॉरिडॉर झाल्यानंतर तिथे मोठ्या प्रमाणात भाविकांची संख्या वाढली आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी उपजिल्हाधिकारी तथा भूसंपादन समन्वयक संतोष देशमुख यांनीही मार्गदर्शन केले.

### १९८२ सालच्या विस्थापितांसाठी एक स्वतंत्र समिती स्थापन

१९८२ साली मास्टर प्लॅन करण्यात आला होता. त्यावेळी मंदिर परिसरातील मालमत्ता धारक, विक्रेते, व्यापारी यांना नुकसान भरपाई अथवा पर्यायी जागा मिळाली नसल्याचे सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी १९८२ सालच्या विस्थापितांसाठी स्वतंत्र एक समिती स्थापन करून योग्य त्या कागदपत्रांच्या आधारावर नागरिकांच्या प्रश्नांबाबतचा अहवाल शासनाला सादर केला जाईल असे सांगितले.

## लक्ष्मीटाकळीच्या सरपंचाचे महाराष्ट्र दिनी आंदोलन

### गावात दारूबंदी आणि पाणीपुरवठ्याचे काम पूर्ण करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ मे-**

गावातील विविध प्रश्नांबाबत लक्ष्मीटाकळी (ता.पंढरपूर) चे सरपंच संजय साठे यांनी १ मे अर्थात महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून पंढरपूर येथील तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले. जोपर्यंत गावाला सुरळीत पाणीपुरवठा होत नाही तसेच दारू आणि ताडीच्या आस्थापना बंद होत नाहीत तोपर्यंत ही लढाई थांबणार नाही असा इशारा त्यांनी दिला आहे.




राज्यात महायुतीचे सरकार असूनही शिवसेनेच्या सरपंचाला निष्क्रिय प्रशासनाच्या विरोधात आंदोलन करण्याची वेळ आली आहे. येथे अनेक वर्षांपासून भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असल्याने शिवसेनेचे नेते महेश साठे यांच्या प्रयत्नातून विशेष बाब म्हणून योजना मंजूर करून जलजीवन मिशन योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे काम गेल्या तीन वर्षांपासून हाती घेण्यात आली होती. मात्र गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी टाकण्यात येणाऱ्या पाईपलाईन काही नागरिकांनी अडविल्याने सदरचे काम संथ गतीने सुरू आहे. याबाबत सरपंच साठे यांनी संबंधित विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात असल्याने नागरिकांना भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. हे काम तात्काळ सुरू करावे. तसेच ग्राम पंचायत हद्दीतील दारूबंदी बाबत ग्राम पंचायतीचा ठराव करूनही बिअर शॉपी, ताडी दुकाने गेली चार महिन्यांपासून सुरूच आहेत. याबाबत उत्पादन शुल्क विभागाने कोणतीही कारवाई न केल्याने ग्रामस्थांचा विरोध वाढू लागल्याने तसेच महिलांमध्ये पसरत चाललेली अस्वस्थता जाणून घेऊन गावचा सामाजिक आणि नैतिक ऱ्हास होत असल्याने गावचा प्रथम नागरिक म्हणून शिवसेनेचे सरपंच साठे यांना निष्क्रिय प्रशासनाविरोधात आंदोलन करण्याची वेळ आली आहे. याबाबत प्रशासन काय भूमिका घेणार? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## अन्नछत्र मंडळातर्फे माजी खासदार राहुल शेवाळे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट : दि २ मे-**




अक्कलकोट संस्थानच्या राजघराण्यातील सुपुत्र अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले यांचे चिरंजीव, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (ट्रस्ट), अक्कलकोट या धर्मादाय न्यासाचे संस्थापक अध्यक्ष सन्मान श्री जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांचे सुपुत्र व न्यासाचे कार्यरत असलेले कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या कुशल नेतृत्वाखाली न्यासाकडून धार्मिक कार्याबरोबरच सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रात देखील उल्लेखनीयरित्या कार्यरत असल्याचे मनोगत माजी खासदार राहुल शेवाळे, मुंबई यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे सहपरिवार आले असता न्यासाचे सचिव शाम राव मोरे यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना राहुल शेवाळे म्हणाले श्री क्षेत्र अक्कलकोटच्या विकासात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळामुळे विकासात भर पडत आहे. तीर्थाटनातून पर्यटनात न्यासामुळे चालना मिळत असल्याचे यावेळी राहुल शेवाळे म्हणाले. यावेळी न्यासाचे बाळासाहेब पोळ, प्रवीण घाडगे, विजय गोटू माने, संभाजीराव पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, एस के स्वामी, महांतेश स्वामी, शिव स्वामी, श्रीकांत स्वामी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, धनंजय निंबाळकर, विशाल घाडगे, रोहित कदम, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.



## कामगार दिनी महाळुंग-श्रीपूर न.पं.च्या कर्मचाऱ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २ मे-**

महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून महाळुंग-श्रीपूर नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष भिमराव रेडे-पाटील यांनी नगर पंचायतीच्या सर्व कर्मचारी वर्गाचा फेटा, श्रीफळ देवून सत्कार केला तर महिला कर्मचाऱ्यांना साड्या देवून सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र दिना निमित्त राष्ट्र ध्वज फडकावून त्यास मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी नगरपंचायीचे मुख्याधिकारी सतीश चव्हाण, नगराध्यक्षा लक्ष्मीताई अशोक चव्हाण, नगरसेविका उज्वला लोखंडे, प्रकाश नवगिरे, जालिंदर लोखंडे, तानाजी भगत, सोमनाथ मुंडफणे, पै. अशोक चव्हाण, मंडल अधिकारी विजय लोखंडे, कृषी सहाय्यक अधिकारी शिन्दे, तेजस रेडे-पाटील, नागनाथ शिन्दे, आबा जाधव, संभाजी चव्हाण, किरण रेडे, नितीन रेडे, शब्बीर डांगे, आण्णा जाधव उपस्थित होते. भिमराव रेडे - पाटील यांच्या या उपक्रमाचे सर्व कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.

## मंगळवेढ्याला तब्बल १० वर्षांनी मिळाले गटशिक्षणाधिकारी

### नूतन गटशिक्षणाधिकारी दर्शन मेहता यांनी स्विकारला कार्यभार

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२ मे-**

तब्बल १० वर्षे प्रभारी गटशिक्षणाधिकारी असलेल्या मंगळवेढा पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी पदावर दर्शन मेहता यांची नियुक्ती झाली. त्यांनी मंगळवार दि.२९ रोजी आपल्या पदाचा कार्यभार स्विकारला. तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता वाढवत शिक्षकांना विश्वासात घेवून काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दि.१०/७/२०१६ पासून मंगळवेढा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारीपद रिक्त होते. तब्बल १० वर्षे प्रभारी शिक्षणाधिकाऱ्यावर येथील शिक्षणाचा गाडा चालत होता. याबाबत वारंवार वृत्तपत्रातून गटशिक्षणाधिकाऱ्याचे पद रिक्त असल्याच्या बातम्या छापल्यानंतर शासनाने याची दखल घेवून मेहता यांची नियुक्ती केली आहे. मेहता हे सन २०२० मध्ये राज्य लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. तब्बल ४ वर्षानंतर नियुक्ती आदेश पुणे विभागातून मिळाला आहे. ते कॉम्प्युटर इंजिनिअर असून त्यासोबत एमबीएची डिग्री त्यांनी प्राप्त केली आहे. प्रथमच शिक्षण क्षेत्रात इंजिनिअर डिग्री प्राप्त केलेले अधिकारी आले आहेत. प्रभारी गटशिक्षणाधिकारी डॉ. बिभिषण रणदिवे यांच्याकडून मेहता यांनी पदभार स्विकारल्यानंतर विविध शिक्षक संघटनांनी त्यांचा सत्कार केला. विस्तार अधिकारी पुरुषोत्तम राठोड व पत्रकार शिवाजी पुजारी यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व फेटा बांधून त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मरवडे केंद्र प्रमुख निवृत्ती सुर्यवंशी, राज्य समन्वयक दिगंबर तोडकरी, विशाल जाधव, सल्लागार सचिव दत्तात्रय सलगर, संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र कांबळे, जुनी पेन्शन संघटनेचे दिगंबर कुचेकर, जेष्ठ शिक्षिका अमृता कुलकर्णी उपस्थित होते.

# शाळांना जिओ टॅगिंग बंधनकारक

## शिक्षण आयुक्तांचे शिक्षणाधिकाऱ्यांना पत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

शासनाने राज्यातील सर्व शाळांना जिओ टॅगिंग बंधनकारक केल्याचे पत्र शिक्षण आयुक्त सचिन्द्र सिंह यांनी काढले आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत राज्यातील सर्व शाळांना जिओ टॅगिंग करावे लागणार आहे.

महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लीकेशन सेंटर संस्थेद्वारे शालेय शिक्षण विभागातील सर्व प्रकारच्या शाळांचे भौतिक ठिकाण छायाचित्रासह टॅग करुन माहिती भरण्यासाठी महास्कूल जीआयएस ॲप विकसित केले आहे. या ॲपवर माहिती भरावी लागणार आहे.

### बोगस शाळा समोर येतील

राज्यात अनेक शाळा बोगस आहेत. शिक्षक आणि भौतिक सुविधांची कमरता असल्याने जीआयएस मॅपिंगवरून फोटो काढण्याचे आदेश शिक्षण आयुक्तांनी दिले आहेत. सर्व शाळांनी जिओ टॅगिंगचा वापर करुन माहिती भरल्यास राज्यातील शाळांची परिस्थिती कळणार आहे.

दरम्यान, याआदीच शिक्षण आयुक्तांच्या सूचनेनुसार प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी गटशिक्षणाधिकारी यांची ऑनलाईन मिटींग घेऊन शाळांना जिओ टॅग बंधनकारक केल्याची माहिती दिली. तसेच १९ एप्रिलला सरावासाठी जिल्ह्यातील सर्व शाळांचे एकाच दिवशी जीआयएस मॅपिंग करुन घेतले. मात्र यावेळी अनेकवेळा सर्वर गायब झाल्याने फोटो अपलोड करताना मुख्याध्यापक, शिक्षकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले होते. शौचालये, मैदान, किचन शेड, पाण्याची सोय व शाळेची इमारत आदी फोटो शासनाच्या ॲपवर अपलोड करण्यात आले. अनेक शाळांमध्ये इंटरनेट सुविधा नसल्याने फोटो अपलोड करताना अडचणी आले होते.

### हे फोटो करावे लागणार अपलोड

शाळेचा नावासह फोटो, शाळेची संपूर्ण इमारत, किचन शेड, मुलींचे आणि मुलांचे स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याच्या सुविधांचे फोटो, मुख्याध्यापक शाळेच्या आवारात उभा राहून फोटो असे सर्व फोटो महास्कूल जीआयएस या ॲपवर अपलोड करावे लागणार आहेत.

## सोमवारपासून कन्नड भाषा वर्ग

**सोलापूर, दि. २ मे-**

नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण संकुलात सोमवारपासून कन्नड भाषा वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ५ ते १८ मे पर्यंत सकाळी ९ ते ११ या वेळेत कन्नड शिक्षक मंहातेश हिरेमठ यांचे मार्गदर्शन लाभणार आहे तरी कन्नड भाषा अध्ययन करु इच्छिणाऱ्यांनी नेताजी प्रशालेच्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन मुख्याध्यापक रविशंकर कुंभार यांनी केले आहे.